


"गण गण गणात बोते"!

संत गजानन महाराजांच्या प्रकट दिनानिमित्त शेगाव नगरी दुमदुमली

पुणे, शुक्रवार, २१ फेब्रुवारी २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 86 • वर्ष ४ थे, अंक ८६ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News



टिम इंडियाची विजयी सुरवात १२

## At a Glance

### दहावीची परिक्षा आजपासून

**१६ लाख ११ हजार ६१० विद्यार्थी आजमावणार नशीब**



**पुणे** : महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळाच्या माध्यमांतून राज्यभरात उद्या २१ फेब्रुवारी २०२५ पासून दहावीची परीक्षा सुरू होत आहे. तर परीक्षेला १६ लाख ११ हजार ६१० विद्यार्थी बसले आहेत. तर यामध्ये ८ लाख ६४ हजार १२० मुले, ७ लाख ४७ हजार ४७१ मुली, तर १९ ट्रान्सजेंडर परीक्षा देणार आहेत. अशी माहिती मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी पत्रकार परिषदेत दिली. तर २३ हजार ४९२ माध्यमिक शाळांमधून विद्यार्थ्यांची नोंदणी केली आहे. तर ५ हजार १३० मुख्य केंद्रांवर परीक्षा होणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी शरद गोसावी म्हणाले, "उद्या होणाऱ्या दहावीच्या परीक्षेतील गैरप्रकार टाळण्यासाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला » पान ७ वर

# एमआयडीसीतून जाणार महामार्गांचे रस्ते

## बाह्यवळणावरील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी पीएमआरडीएचा निर्णय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे:** गेल्या काही वर्षांच्या कालावधीत हिंजवडी आयटी पार्कसह जिल्ह्यातील एमआयडीसी चांगलाच 'बहर आला आहे, त्यातूनच स्थानिकांना रोजगार मिळाला आहे. मात्र; हे वास्तव असतानाच वाहतूक कोंडीने या भागाला विळखा घातला आहे. त्यातूनच प्रशासन आणि उद्योजकांचेही नुकसान होत आहे. त्यासाठी आता थेट 'पीएमआरडीए'ने आता मध्यस्थीचा मार्ग शोधला असून औद्योगिक क्षेत्रांमध्ये महामार्गांशी थेट जोडणारे विविध रस्ते प्रस्तावित केले आहेत.त्यासाठी २०३ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

त्यासाठी ४५ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. नांदे ते लवळे हा ३.९३ किलोमीटरचा विकसित केला जाणार असून, त्यासाठी ४५ कोटी रुपयांचा खर्च प्रस्तावित आहे. नांदे ते माण हा नवीन रस्ता बांधला जाणार असून, तो १.५ किलोमीटरचा आहे. या रस्त्यासाठी ३० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. अशा प्रकारे हिंजवडी आयटी पार्क, रांजगाव औद्योगिक क्षेत्र आणि पिरंगुट औद्योगिक क्षेत्रात एकूण ५९.९३ किलोमीटरचे रस्ते बांधले जाणार आहेत. यासाठी एकूण २०३ कोटी रुपयांचा खर्च येणार आहे. पीएमआरडीएने उचललेल्या या पावलामुळे आगामी काळात उद्योगांची वाहतूककोंडीतून सुटका होण्याची आशा आहे. मात्र, हे प्रकल्प वेळेत पूर्णत्वास नेण्याचे आव्हान पीएमआरडीएने पूर्ण केले, तरच खऱ्या अर्थाने उद्योगांची कोंडी सुटेल.

राष्ट्रसंचार EXCLUSIVE

हिंजवडीतील राजीव गांधी इन्फोटेक पार्कमधील वाहतूक कोंडीची समस्या कायम चर्चेत असते. याचबरोबर पुण्यातील विविध औद्योगिक क्षेत्रांमधील (एमआयडीसी) वाहतुकीची समस्याही वारंवार प्रकर्षाने समोर येते. आयटी पार्कसह औद्योगिक क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा दररोज सरासरी एक तास वाहतूककोंडीत वाया जातो. कर्मचाऱ्यांचा एक तास अनुत्पादक जातो ही एकमेव बाब नसून, त्याचे अनेक गंभीर परिणाम उद्योगांवर होत आहेत. उद्योगांना कच्च्या मालाचा पुरवठा होण्यास आणि त्यांचे उत्पादन बाजारपेठेत पोहोचण्यास विलंब या गोष्टींचाही फटका उद्योगांना बसत आहे. यामुळे एकूण उद्योगांच्या अर्थकारणालाच झळ बसविणारी ही कोंडी सोडविण्यासाठी आता पावले उचलली जात आहेत.

हिंजवडी आयटी पार्कसह पुण्यातील विविध एमआयडीसीमध्ये वाहतूककोंडीची समस्या दिवसेंदिवस बिकट होत आहे. वाढते नागरीकरण आणि उद्योगांचा विस्तार होऊनही पायाभूत सुविधा न वाढल्यामुळे वाहतुकीची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. अखेर ही समस्या सोडविण्यासाठी सकारात्मक पाऊल पडले आहे.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) औद्योगिक क्षेत्रातील वाहतूक समस्या सोडविण्यासाठी » पान ७ वर



"हिंजवडी आयटी पार्क, रांजगाव औद्योगिक क्षेत्र आणि पिरंगुट औद्योगिक क्षेत्रात एकूण ५९.९३ किलोमीटरचे रस्ते बांधले जाणार आहेत. यासाठी एकूण २०३ कोटी रुपयांचा खर्च येणार आहे. पीएमआरडीएने उचललेल्या या पावलामुळे आगामी काळात उद्योगांची वाहतूककोंडीतून सुटका होण्याची आशा आहे. मात्र, हे प्रकल्प वेळेत पूर्णत्वास नेण्याचे आव्हान पीएमआरडीएने पूर्ण केले, तरच खऱ्या अर्थाने उद्योगांची कोंडी सुटेल.

— **डॉ. योगेश म्हसे, आयुक्त, पीएमआरडीए**

**रस्त्याचे नाव | रस्त्याचे अंतर | अपेक्षित खर्च**


- **हिंजवडी** आयटी पार्कमध्ये म्हाळुंगे ते हिंजवडी पहिला टप्पा १ : **दीड किलोमीटर : १३ कोटी**
- **आयटी** पार्कमध्ये ठाकर वस्ती ते माण गावठाण रस्ता **२.४० किलोमीटर: २० कोटी**
- **सूर्या** हॉस्पिटल ते ठाकर वस्ती **३.५ किलोमीटर ३० कोटी**
- **पिरंगुट** औद्योगिक क्षेत्रात उरवडे ते हिंजवडी टप्पा **३ : ७.१० किलोमीटर ४५ कोटी**
- **नांदे** ते लवळे : **३.९३ किलोमीटर: ४५ कोटी**
- **नोदे** ते माण हा नवीन रस्ता **१.५ किलोमीटर : ३० कोटी**
- **पिंपरी** दुमाला राज्य मार्ग ते ढोकसांगवी ते शिरूर ग्रामीण: **१२ : १९.९० कोटी**
- **ढोकसांगवी** ते निमगाव भोगी ते मलठण राज्य मार्गाला जोडणारा प्रमुख जिल्हा मार्ग: **१०: १८ कोटी**
- **अहमदाबाद** राज्य मार्ग ते निमगाव भोगी ते सोनेसांगवी राज्य मार्ग: **९ : १८ कोटी**
- **करडे** ते निमोणे प्रमुख जिल्हा मार्ग: **९: १२ कोटी**






## शिवसूर्य छत्रपती जयंती

छायाचित्र: विजयकुमार हरिश्चंद्रे



**शिवसूर्य छत्रपती जयंती** -सर्वत्र शिवजयंती साजरी होत असताना सूर्य नारायणा सारख्या तळपणाऱ्या जाणता राजाची ही सूर्य मावळतानाची साकुर्डे पुरंदर मधील प्रख्यात जेष्ठ शिल्पकार दिनकर थोपटें यांनी साकारलेली प्रतिमा लक्ष वेधून घेत होती

## रायगड तालुक्यात भूकंपाचे धक्के

गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रायगड :** पेण तालुक्यातील हेटवणे धरणापासून काही अंतरावर असणाऱ्या तिलोर आणि महागाव परिसरात काल (बुधवारी) रात्रीपासून भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले. बुधवारी रात्री १० वाजण्याच्या सुमारास पहिला धक्का जाणवला. त्यानंतरही काही सौम्य धक्के जाणवल्याचं स्थानिकांनी माहिती दिली. भूकंपाचे धक्के जाणवले तेव्हा अनेक घरातील भांडी जमिनीवर पडली. तसेच भिंतीवर लटकलेल्या अनेक वस्तू पडल्याचं प्रत्यक्षदर्शींनी सांगितलं. सुदैवानं भूकंपात कोणतीही जीवितहानी आणि वित्तहानी झालेली नाही. भूकंपानंतर जिल्हा प्रशासन या सदर्भात अलर्ट मोड आहे. अधिक माहिती घेण्याचं काम चालू आहे. पेण तालुक्यातील तिलोरे तर सुधागड तालुक्यातील महागाव परिसरातील देऊळवाडी, कलाकाराई भोप्याची वाडी, कवेले वाडी, येथे भूगर्भातील आवाज येऊन पहाटे तीन वाजता जमीन हादरली, असा दावा स्थानिकांकडून करण्यात आला.

# नवा शंभर कोटीचा बाजार त्यावर मुंडेंचा आजार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** आज आमदार सुरेश धस यांनी धनंजय मुंडे व नवीन शंभर कोटीच्या घोटाळ्याचा आरोप केला कृषी अधिकाऱ्यांच्या बदली प्रकरणात त्यांनी शंभर कोटी रुपयांचा बाजार केल्याचा आरोप आमदार धस करत असताना त्याच वेळी धनंजय मुंडे यांनी आपण बेल्स पालसी या आजाराने ग्रस्त असून दोन मिनिटे देखील सलग बोलू शकत नाही त्यामुळे लोकांसमोर येऊ शकत नसल्याचे ट्विट केले आहे.

आमदार सुरेश धस यांनी गुप्त बैठकाव च्या प्रकरणावर पडदा पाडत आता मुंडे यांच्याविरुद्ध अधिक आक्रमक होण्याचे ठरवलेले दिसते यावरूनच त्यांनी आज धनंजय मुंडे यांचे बदल्यांचे रेट कार्ड जाहीर केले.

**आरोप-प्रत्यारोप**



**धनंजय मुंडे यांचे रेट कार्ड**

- उपविभागीय कृषी ....**७ लाख**
- तालुका कृषी ..............**५ लाख**
- गावाता बदली .......**५० हजार**
- उपसंचालक ...............**५ लाख**
- तंत्र अधिकारी ..........**४ लाख**
- कृषी अधिकारी...........**२ लाख**
- कृषी पर्यवेक्षक......**१.५ लाख**
- चौकशी बंद करणे **२५ लाख /१ कोटी**



# रेखा गुप्ता यांचा शपथविधी उत्साहात

## २७ वर्षांनंतर भाजपचे सरकार स्थापन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली** : दिल्ली विधानसभा निवडणुकीत दणदणीत विजय मिळवल्यानंतर भाजपसाठी आजचा दिवस ऐतिहासिक ठरला. तब्बल २७ वर्षांनंतर दिल्लीत भाजपचे सरकार स्थापन झाले आहे. रेखा गुप्ता यांच्यासह परवेश सिंह, आशिष सूद, मनजिंदर सिंग सिरसा, रवींद्र इंद्रज सिंह आणि डॉ. पंकज सिंह यांच्यासह सहा मंत्र्यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, अनेक राज्यांचे मुख्यमंत्री आणि इतर नेते या कार्यक्रमाला उपस्थित होते आणि या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होते. रेखा गुप्ता या दिल्लीच्या चौथ्या महिला मुख्यमंत्री असतील.



दिल्लीच्या नवव्या मुख्यमंत्री म्हणून रेखा गुप्ता यांनी शपथ घेतली. दिल्लीचे नायब राज्यपाल व्ही. के. सक्सेना यांनी शपथ घेतली. तब्बल २७ वर्षांनंतर दिल्लीत भाजपचे पुनरागमन झाले आहे. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

दिल्लीच्या नवनियुक्त मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी आपली जबाबदारी लोकांच्या सेवेसाठी समर्पित असेल, असे म्हटले आहे. लोकांच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी माझ्यावर सोपवलेली जबाबदारी पार पाडण्यासाठी मी अहोरात्र काम करेन. विकसित दिल्लीचा संकल्प मी माझ्या मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांसोबत प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न करेन, असे त्या म्हणाल्या. यमुना मातेच्या आशीर्वादाने मी आज ज्येष्ठ नागरिकांच्या उपस्थितीत दिल्लीच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. मी दिल्लीच्या जनतेला आश्वासन देतो की, माझ्या आयुष्यातील » पान ७ वर

## 23 फेब्रुवारीला पूनावाला ब्रिडर्स मल्टीमिलियन उत्साह

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे:** रविवारी 13 फेब्रुवारीला पूनावाला ब्रिडर्स मल्टी मिलियन 2025 हा सोहळा मोठ्या प्रमाणात साजरा होणार आहे. पुण्यातील सुप्रसिद्ध अशा महालक्ष्मी रेस कोर्स वर दुपारपासून या सोहळ्याची सुरुवात होईल . या दिवशी मोठा कार्निवल साजरा होणार असून त्यामध्ये मनोरंजन, फॅशन ,फूड कोर्ट ,बार अनेकविध बक्षिसे आणि लहान मुलांच्या खेळाचे अनेक पर्याय उपलब्ध असतील.

रेस कोर्स घोड्यांच्या शर्यतीसाठी प्रसिद्ध आहे त्यामुळे या शर्यतीच्या संबंधित कौशल्य स्पर्धांचे देखील » पान ७ वर



## फिल्म सिटी बाहेर भीषण आग

**मुंबई :** येथील गोरेगाव स्थित फिल्म सिटीच्या बाहेर रात्री आठच्या सुमारास भीषण आग लागली. एकापाठोपाठ एक सहा सिलेंडरचे स्फोट झाल्यामुळे ही आग लागली असल्याचे प्राथमिक अंदाजामध्ये समजले. या आगीत नेमकी किती जीवित हानी झाली याबाबत निश्चित माहिती समजू शकली नाही. मुंबई अग्निशामक दलाच्या सहा गाड्या तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या रात्री उशिरापर्यंत ही आग आटोक्यात आणण्याचे काम सुरू होते .

फिल्म सिटीच्या बाहेर चहा परिसर पूर्ण झोपड्याने व्याप्त आहे येथील अनेक झोपड्या या बेकायदेशीर आहेत त्यामध्ये तेथे असलेल्या सिलेंडर बबत देखील अनेक प्रतिवाद आहेत. येथे काही व्यावसायिक सिलेंडर देखील असल्याचे समजते या सर्व सिलेंडरचा आग कशी लागली आणि नेमके काय झाले याबाबतचे अंदाज समोर आले नाहीत लवकरात लवकर आग आटोक्यात आणून या परिसरात असलेले लोक लांब पांगवण्यासाठी अग्निशामक दलाचे प्रयत्न होते.



# उन्हाळा वाढल्याने लिंबू खातोय ‘भाव’



पुणे **उन्हाळ्याची चाहूल लागताच वाजु लागले रसवंती गृहाचे घुगंरु:** उन्हाळ्याची चाहूल लागल्याने सरबत विक्रेते तसेच रसवंतिगृह चालकांकडून लिंबांच्या मागणीत वाढ झाली असून, घाऊक आणि किरकोळ बाजारात लिंबांच्या दरात वाढ झाली आहे. किरकोळ बाजारात प्रतवारीनुसार एका लिंबाची विक्री तीन ते पाच रुपयांना केली जात आहे. उन्हाचा चटका वाढल्याने घरगुती ग्राहकांसह, रसवंतिगृहचालक सरबत विक्रेत्यांकडून लिंबांच्या मागणीत वाढ झाली आहे. गुलटेकडीतील बाजार आवारात मागणीच्या तुलनेत लिंबांची आवक कमी प्रमाणावर होत असून, गेल्या दहा दिवसांत घाऊक बाजारात लिंबांच्या दरात वाढ झाली आहे, अशी माहिती श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील लिंबू व्यापारी रोहन जाधव यांनी दिली.

## मदतनीस आणि अंगणवाडी सेविकांची रिक्त पदे भरणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे जिल्ह्यात चार हजाराहून अधिक अंगणवाड्या आहेत. यामध्ये अंगणवाडी सेविकांची २२८ पदे रिक्त आहेत तर मदतनीसांची ५३० पदे रिक्त आहेत. त्यानुसार लवकरच येत्या ३१ मार्चपर्यंत मदतनीस आणि अंगणवाडी सेविकांची रिक्त पदे भरली जाणार आहेत,’ अशी माहिती महिला व बालकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिली आहे. दरम्यान या भरतीसाठी शैक्षणिक अटींसह इतरही निकष तपासले जाणार आहेत.

गेल्या वर्षापासून पुणे जिल्ह्यातील अंगणवाड्यामध्ये सेविका आणि मदतनीसांच्या 758 जागा रिक्त आहेत. आता या रिक्त जागा भरण्याची प्रक्रिया जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाने सुरू केली असून किमान बारावी उत्तीर्ण असण्याची शैक्षणिक पात्रतेची अट अर्जदारांच्या समोर ठेवण्यात आली आहे.



**लक्षवेधक:** शिवजयंती सोहळ्यानिमित्ताने सरदार त्रिंबकजी नाईक निवंगुणे घराण्याचा स्वराज्य रथ काल पुण्यामध्ये काढण्यात आला होता यावेळी छत्रपती शिवरायांची लंडन येथील म्युझियममध्ये असलेल्या जगदंबा तलवारीचा देखावा सर्वांचे लक्ष वेधून घेत होता. या देखाव्यात पंचवीस फूट लांबीची तलवार लक्षवेधक होती.



## किल्लेदार मानाजीराव साबळे यांचा रथ आकर्षणाचा केंद्र ठरला

**पुणे :** शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने आयोजित स्वराज्यरथ उत्सवात पहिल्यांदाच सहभागी झालेला अंजिक्यतारावीर किल्लेदार मानाजीराव साबळे यांचा रथ आकर्षणाचा केंद्र ठरला. स्वत: छत्रपती खा. उदयनराजे भोसले यांनी स्वराज्यरथाचे उद्घाटन केले.
छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कालखंडात सातारा येथील अजिंक्यतारा किल्ल्याचे मानाजीराव साबळे किल्लेदार होते. बादशहा औरंगजेब याचा थोरला मुलगा शहजादा आजम याने अजिंक्यतारा किल्ल्यावर हल्ला केला होता. या हल्ल्याचा किल्लेदार मानाजीराव साबळे यांनी ताकदीने मुकाबला करून किल्ला वाचविण्यासाठी शर्थीचा लढा दिला होता. मात्र, शत्रूच्या ताकदीपुढे मानाजीराव यांना या लढाईत वीरमरण प्राप्त झाले होते. हजारो साबळे कुटुंबीय परिवारासह सहभागी झाले होते.



## दिव्यांगांच्या विवाह समारंभात ज्येष्ठ नागरिकांचा हातभार

**पिंपळे सौदागर:** येथील उन्नती सोशल फाउंडेशन आणि झुंज या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दिव्यांग जोडप्यांच्या सामुदायिक विवाह सोहळ्यात ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनच्या ज्येष्ठ नागरिकांनी पंचवीस हजार रुपयांच्या संसारोपयोगी वस्तुंचा आहेर देऊन सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त पिंपळे सौदागर परिसरातील लिनियर गार्डन येथे हा एक आगळावेगळा विवाह सोहळा सामाजिक कार्यकर्ते संजय भिसे, डॉ. कुंदाताई भिसे आणि राजू हिरवे यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात संपन्न झाला. समाजातील वंचित असलेल्या दिव्यांगांच्या या विवाह सोहळ्यास हातभार लावण्याच्या दृष्टीने ज्येष्ठ नागरिकांनी आपल्या संघटनेतील सदस्यांना आर्थिक मदतीचे आवाहन करुन पंचवीस हजार रुपये जमा केले.



## 'माहेर'च्या कार्यकर्तृत्वाला ताराचंद ट्रस्टच्या दातृत्वाचे अभिवादन

**पुणेः-** अनाथ आणि निराधार मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि शारीरिक-मानसिकदृष्ट्या दुर्बल व्यक्तींना आधार देणाऱ्या 'माहेर' संस्थेच्या संस्थापिका लुसि कुरियन यांच्या कार्यकर्तृत्वाला दातृत्वाची जोड देत येथील ताराचंद रामनाथ सेवा ट्रस्टतर्फे दोन कोटी रूपयांची भरीव मदत करून अभिवादन करण्यात आले. या निधीतून 'माहेर-ताराचंद रामनाथ वात्सल्यधाम' ही भव्य वास्तू आकाराला येणार असून माहेर आणि ताराचंद रामनाथ सेवा ट्रस्ट या दोन संस्थांमध्ये यासंदर्भात सामंजस्य करार करण्यात आला.
कार्यक्रमात ताराचंद रामनाथ सेवा ट्रस्टच्या आधारवड गीतादेवी श्रीकांत राठी यांच्या हस्ते लुसि कुरियन यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी ब्रह्म कुमारी सरितादीदी, ताराचंद रामनाथ सेवा ट्रस्टचे विश्वस्त नंदकिशोर राठी, रतन राठी, टीबीएल कन्सल्टन्सी सर्व्हिसेसचे दर्शन मुंदडा, श्री मुकुंद भवन ट्रस्टचे कार्यकारी विश्वस्त पुरूषोत्तम लोहिया आदी उपस्थित होते. यावेळी ब्रह्म कुमारी सरिता दीदी यांनी आशीर्वचन दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आशा भुतडा यांनी केले. तर ऋचिता राठी-गांधी यांनी आभार मानले.

# जुलैमधील पूर मानवी चुकीमुळे...!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** खडकवासला धरणातून २५ जुलै २०२४ पाणी सोडल्यानंतर नदीचे पाणी नागरिकांच्या घरात शिरले होते. नागरिकांचे संसार पाण्यात वाहून गेले होते. तसेच पुलाची वाडी या परिसरामध्ये तीन तरुणांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. या अनैसर्गिक पुराला आणि तरुणांच्या मृत्यूस जबाबदार असलेल्या खडकवासला पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता श्वेता कुऱ्हाडे आणि जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता हनुमंत गुणाले यांना सेवेतून बडतर्फ करत त्यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी आता होत आहे.

नदीपात्रात सोडलेला पाणी विसर्ग व संबधित कार्यकारी अभियंता श्वेता कुऱ्हाडे यांनी सांगितलेला खडकवासला धरणातून पाणी विसर्ग यामध्ये खूप मोठया प्रमाणावर तफावत आहे. कुऱ्हाडे यांनी त्यावेळी खडकवासला धरणातून ३५००० क्युसेक पाणी सोडल्याची माहिती प्रशासन आणि प्रसारमाध्यमांना दिली होती. वास्तविक पाहता त्यांनी ६१,१७८ क्युसेक पाणी सोडले गेले होते हे आता माहिती अधिकारातून मिळालेल्या माहितीतून सिद्ध होत आहे.

मुठा खोऱ्यामध्ये टेमघर, वरसगाव, पानशेत व खडकवासला ही मोठी धरणे आहेत. या धरणातील पाणी खडकवासला धरणात एकत्रित येते. खडकवासल्यातून सोडलेले पाणी पुणे शहरातुन जाऊन ६६ कि.मी. अंतरावर राहु ठीकाणी भीमानदीला मिळते. पुणे शहरामध्ये बंडगार्डन पाटीलवस्ती, विठ्ठलनगर ही महत्वाची पुरबाधित ठिकाणे आहेत. खडकवासला धरणाच्या सांडव्याची विसर्ग क्षमता ९७००० क्युसेक्स इतकी आहे. मात्र नदीपात्रातील अतिक्रमणांमुळे ५०००० क्युसेक्स विसार्गालाच पुर परिस्थिती निर्माण होते.

याबाबींवर लक्ष केंद्रीत करून पुणे शहरात कमीत कमी पूर येईल अशा दृष्ट पवना धरण, खडकवासला व त्याच्या वरच्या बाजुस असणाऱ्या धरणातून सोडावयाच् विसर्गाचे नियोजन करण्यात येते. पुर नियंत्रणाचे संबंधित सर्व यंत्रणांनी योग्य तऱ्हेने समन्वय राखुन काम केल्याने पुणे शहरातील पुर परिस्थिती सन २००६, २००७ व २००८ या तिन्ही वर्षात अतिवृष्टी होऊनदेखील नियंत्रणात ठेवण्या प्रशासनास यश आले आहे. पुणे शहरातील बंडगार्डन येथे धोका पातळी ५४५.८३ मी. व धोकापातळीचा विसर्ग १,६८,५५८ क्युसेक्स आहे.

### Analytical

“ नदीपात्रात टाकण्यात आलेला राडारोडा तसेच नदीसुधार प्रकल्पाचे काम जबाबदार असल्याचा आरोप करण्यात आला होता. तसेच अनेक नवनवीन कारणे पुढे आणली जात होती. मात्र माहिती अधिकारातून मिळालेल्या माहितीनुसार या पुरास हे दोन्ही अधिकारीच जबाबदार असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे यांच्या गलथान कारभारामुळे तीन होतकरू युवकांचा जीव गेला. हजारो नागरिकांचे करोडो रुपयांचे नुकसान झाले. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी मुख्यमंत्री, पालकमंत्री, जलसंपदामंत्र्यांकडे आणि पोलीस आयुक्तांकडे केली आहे. **— किशोर कांबळे, माहिती अधिकार कार्यकर्ता**



### नदीच्या पुर्विसार्गामुळे पुणे शहरातील बाधित होणारी ठिकाणे



**१८,०००**
**भिडे पुल (डेकन) पाण्याखाली जातो.**

**२८,०००**
**आबासाहेब गरवारे कॉलेजजवळील खिलारे वस्तीमध्ये पाणी शिरते..**

**३३,०००**
**शितळादेवी मंदीर (डेकन) पाण्याखाली जाते.**

**५४,०००**
**पुणे महानगरपालिके जवळील नवीन पुल पाण्याखाली जातो.**

**६०,०००**
**पाटील इस्टेट झोपडपट्टीमध्ये पाणी शिरते.**

## सुरक्षेसाठी स्थानकावर दोन बॅगेज स्कॅनर मशिन



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे रेल्वे स्थानक म्हणजे 'आओ जाओ घर तुम्हारा' याप्रमाणे झाले होते. त्यामुळे आता रेल्वे प्रशासनाने स्थानकावर दोन बॅगेज स्कॅनर मशिन बसवल्या आहेत. रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षेसाठी आणि रेल्वेतून कोणतीही अनुचित साहित्याची वाहतूक होऊ नये, याकरिता रेल्वे प्रशासनाने आता पुणे रेल्वे स्थानकावर दोन बॅगेज स्कॅनर मशिन बसविल्या आहेत.यामुळे आता स्थानकाच्या सुरक्षेत वाढ होत असल्याचे समोर आले आहे.

पूर्वी स्थानकात येणारे प्रवासी आपल्या बॅगा घेऊन सरळ आत प्रवेश करत होते, त्यांच्या बॅगांमध्ये काय आहे, रेल्वेतून बॅगांच्या माध्यमातून कोण काय घेऊन चाललंय, याची माहिती कोणालाही मिळत नव्हती. अखेर हे दोन बॅगेज स्कॅनर मशिन बसवल्यामुळे प्रवासी आपल्या बॅगांमध्ये काय घेऊन जाताहेत, हे समजल्यामुळे रेल्वे गाडीसह स्थानकावरील प्रवाशांची आता सुरक्षा भक्कम होणार आहे.

रेल्वे स्थानकावर बसवण्यात आलेल्या या दोन बॅग स्कॅनर मशिनमुळे येथील स्कॅनर मशिनची संख्या तीन झाली आहे. एक मशिन मुख्य प्रवेशद्वारावर (जुनी), दुसरी प्लॅटफॉर्म क्रमांक 1 वरील सरकत्या जिना चढल्यावर (नवीन) आणि तिसरी मशिन प्लॅटफॉर्म क्रमांक 6 जवळील जिना चढल्यावर ठेवण्यात आली आहे. या मशिनवर आरपीएफ जवानांमार्फत प्रवाशांच्या बॅगांची तपासणी केली जात आहे.

“ वाणिज्य व्यवस्थापक, मध्य रेल्वे, पुणे विभागप्रवाशांच्या सुरक्षेसाठी पुणे रेल्वे स्थानकावर दोन नव्या बॅगेज तपासणी मशिन बसवण्यात आल्या आहेत. या मशिनच्या माध्यमातून प्रवाशांच्या सामानाची तपासणी करूनच प्रवाशांना स्थानकात प्रवेश दिला जात आहेत. एकूण तीन मशिनच्या माध्यमातून प्रवाशांच्या बॅगांची तपासणी केली जात आहे. यामुळे प्रवाशांची सुरक्षा आता आणखी भक्कम झाली आहे.
**— डॉ. मिलिंद हिरवे, वरिष्ठ विभागीय**

## रेल्वे प्रवाशांना एक तास आधी समजणार ‘प्लॅटफॉर्म’

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे:** सध्या गाडी कोणत्या स्थानकावर येणार याची माहिती अर्धा तास अगोदर देण्यात येत आहे. तत्पूर्वी प्रवासी सामान घेऊन रेल्वे प्रवेशद्वाराबाहेरील बाजूस उभे राहतात. स्थानक निश्चित झाल्यानंतर तेथे जाण्यासाठी धावपळ करतात. असे घाईघाईने जाणे अनेकदा जिकिरीचे ठरते. ज्येष्ठ प्रवाशांची गैरसोय होते. त्या पार्श्वभूमीवर प्रवाशांची वाहतूक सुरळीत होण्यासाठी आणि ऐन वेळी गर्दी टाळण्यासाठी रेल्वे प्रशासनाने नियोजित गाड्यांचे 'प्लॅटफॉर्म' क्रमांक एक तास अगोदर जाहीर करण्यासाठी विशेष प्रणाली सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

रेल्वे स्थानकावरून प्रवास करताना निर्धारित वेळेनुसार येणारी गाडी कोणत्या 'प्लॅटफॉर्म'वर येणार आहे, याची कल्पना आता रेल्वे प्रवाशांना एक तास अगोदर समजणार आहे. मध्य रेल्वे विभागाच्या पुणे रेल्वे प्रशासनाने अचानक गर्दी होऊन चेंगराचेंगरीसारखी दुर्घटना होऊ नये, प्रवाशांची धावपळ होऊ नये, म्हणून व्यवस्थापनासाठी निर्णय घेण्यात आला आहे.यापूर्वी अर्ध्या तासापर्यंत किंवा पंधरा मिनिटे अगोदर अथवा अचानक स्थानक बदलण्यात आल्याची माहिती देण्यात येत होती. पुणे रेल्वे स्थानकावर सहा 'प्लॅटफॉर्म' आहेत. दिवसभरातून एक्सप्रेस, लोकल डेमू, पॅसेंजर अशा २०० गाड्या येथून धावतात.



पुणे **गण गण गणात बोते!** श्री संत गजानन महाराज यांचा प्रगटदिन सोहळा आज शहरामध्ये मोठ्या उत्साहात आणि भक्तीभावाने साजरा करण्यात आला, भोसलेनगर येथील श्री गजानन महाराजांच्या मंदिरात आज सकाळपासूनच भाविकांनी दर्शनासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. यानिमित्त मंदिरात अनेक धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

## राज्याला ‘उर्जा’ दिली, पण स्वत:च्या आयुष्यात अंधार कायम

# सत्तर वर्षानंतरही ‘कोयना’ बाधितांची फरफट कायम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे:** धरणाची निर्मिती करताना तेथील स्थानिक नागरिकांचे पुनर्वसन करावे, हा शासकीय नियम आहे. मात्र; तब्बल सत्तर वर्षांपूर्वी बांधलेल्या आणि संपूर्ण राज्यातील नागरिकांना ‘उर्जा’ दिलेल्या कोयना धरणाच्या बाधितांना अद्यापही न्याय मिळालेला नाही. धक्कादायक बाब म्हणजे एवढ्या प्रदीर्घ कालावधीनंतरही येथील नागरिकांना आजही न्यायालयाची पायरी चढावी लागत असून त्यांची आजही फरफट कायम सुरुच आहे.

न्यायालयाने १९७६ पूर्वी राज्यातील सर्व सिंचन प्रकल्पांमध्ये संपादित झालेली जमीन, त्यातील प्रकल्प बाधित, जमिनींचे निवाडे, मोबदला म्हणून दिलेल्या रकमा, तसेच काहींनी न्यायालयाच्या माध्यमातून दोनदा लाभ मिळवला का, याची पडताळणी करण्याचे आदेश मदत व पुनर्वसन विभागाला दिले होते. सुमारे ७० वर्षांपूर्वी पूर्ण झालेल्या सिंचन प्रकल्पांमधील बाधितांना अजूनही लाभ मिळत नसल्याचे उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आल्यानंतर अशा सर्व प्रकल्प बाधितांच्या लाभाची चौकशी करण्याचे काम जिल्ह्यातही सुरू आहे. त्यानुसार चार प्रकल्पांच्या बाधितांना वाटप केलेल्या ४ हजार आदेशांपैकी आतापर्यंत सुमारे ७० टक्के अर्थात दोन हजार आठशे आदेशांची चौकशी पूर्ण झाली आहे. उर्वरित आदेशांची पडताळणी महिनाभरात पूर्ण करून त्याचा अहवाल राज्य सरकारकडे पाठविण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली. सदर आदेशानुसार जिल्ह्यातील १९७६ पूर्वीच्या सहा प्रकल्पांपैकी पानशेत, वरसगाव, नाझरे आणि पवना या धरण प्रकल्पांमधील बाधितांना देण्यात आलेल्या मोबदल्यांची चौकशी जिल्हा पुनर्वसन विभागाकडून सुरू केली आहे. उजनी प्रकल्पातील बाधितांना सोलापूर जिल्ह्यात तर वीर धरणाच्या बाधितांना सातारा जिल्ह्यात मोबदला देण्यात आला होता.

जिल्ह्यातील या चार प्रकल्पग्रस्तांना एकूण ४ हजार २० वाटप आदेश अर्थात प्रकल्पग्रस्तांना जमिनीचा मोबदला देण्यात आला होता. न्यायालयाच्या निर्णयानंतर तत्कालिन निवाड्यानुसार या मूळ प्रकल्पग्रस्तांना देण्यात आलेल्या जमिनीच्या मोबदल्याची चौकशी सुरू करण्यात आली आहे. त्यानुसार आतापर्यंत सुमारे ७० टक्के अर्थात २ हजार ८०० आदेश तपासण्यात आले आहेत. त्यातील ३० टक्के अर्थात ९०० नावे जुळली आहेत.

- जिल्ह्यातील चार प्रकल्पग्रस्तांना एकूण ४ हजार २० वाटप
- ७० टक्के अर्थात २ हजार ८०० आदेश तपासण्यात आले
- ३० टक्के अर्थात ९०० नावे जुळली
- संबंधित तहसीलदारांकडून गावपातळीवर चौकशी सुरू करण्यात आली
- काही प्रकल्पग्रस्त मृत झाले असल्याने त्यांच्या वारसांची चौकशी करण्यात येत आहे.
- शिल्लक राहिलेल्या ३० टक्के आदेशांचीही पडताळणी करण्यात येत आहे.

“ **ही चौकशी पूर्ण करण्यासाठी राज्याच्या मदत व पुनर्वसन विभागाने फेब्रुवारीअखेरची मुदत दिली आहे. मात्र, या मुदतीत ही चौकशी पूर्ण होऊ शकणार नाही. त्यामुळे ही मुदत ३१ मार्च करावी, अशी विनंती जिल्हा प्रशासनाकडून विभागाला करण्यात आली आहे.**
**— स्वप्नील मोरे, जिल्हा पुनर्वसन अधिकारी, पुणे**




नळ स्टॉप मधील एसएनडीटी कॉलेजच्या समोरील बस स्टॉप जवळ अनअधिकृत फूड मॉल उभारण्यात आला होता . त्याच्यावर आज अतिक्रमण विभागाने कारवाई केली



## माजी उपसरपंचाने घरातच उभारला शिवरायांचा अश्वारुढ पुतळा

**वाघोली :** वाडेबोल्हाई(ता.हवेली) येथे राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस तथा वाडेबोल्हाईचे माजी उपसरपंच राजेश वारघडे यांच्या निवासस्थानी गेल्या काही वर्षांपूर्वी भव्य दिव्य छत्रपती शिवाजी महाराजांचे अश्वारूढ पुतळा वारघडे यांनी स्व:खर्च करीत उभारला आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचा जयंत्ती उत्सव राजेश उर्फ भाऊसाहेब वारघडे यांच्या निवासस्थानी उभारलेल्या अश्वारूढ पुतळ्याचे मान्यवरांच्या उपस्थितीत पूजन करून उत्साहात साजरी करण्यात आली.यामध्ये जिल्हा नियोजन समितीचे सदस्य तथा राष्ट्रवादी काँग्रेस(अजित पवार) पक्षाचे तालुकाध्यक्ष दिलीप वाल्हेकर,उद्योजक अनंता कटके,वाडेबोल्हाईच्या सरपंच वैशाली केसवड,उपसरपंच सोनाली रिकामे,माजी उपसरपंच तुकाराम शिंदे,युवा नेते प्रदिप शिंदे,वाघोलीचे स्वीकृत नगरसेवक शांताराम कटके,राष्ट्रवादी युवक काँग्रेस(शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रदेश सरचिटणीस प्रदिप कंद,तालुकाध्यक्षा सुरेखा भोरडे,माजी सरपंच कुशाभाऊ गावडे,चेअरमन बळीराम गावडे,माजी चेअरमन विठठल गावडे,ग्रामपंचायत सदस्य नंदकुमार भोर,आई ज्ञान विज्ञान संस्थेचे अध्यक्ष शहाजी शिंदे,चेअरमन सोमनाथ आव्हाळे यांच्या हस्ते महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला.याप्रसंगी माजी सरपंच दिपक गावडे,राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या तालुका उपाध्यक्षा संध्या भोर,संचालक पंडित पायगुडे, युवा नेते विनायक कोतवाल,राहुल इंगळे,ईश्वर गावडे,गोपीनाथ भोरडे,दादा इंगळे,आण्णासाहेब वारघडे,अनिल केसवड,सोमनाथ कंद आदी,उपस्थित होते.

## 'दगडूशेठ' तर्फे १९ हजार जणांची मोफत नेत्र शस्त्रक्रिया

**पुणे :** श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टच्या जय गणेश रुग्ण सेवा अभियानात विविध स्वयंसेवी संस्था आणि हॉस्पिटल्सच्या सहकार्याने सन २०२४ सालामध्ये ३७ हजार २२२ लोकांची नेत्रतपासणी मोफत करण्यात आली. त्यातील १९ हजार रुग्णांवर मोफत नेत्रशस्त्रक्रिया करण्यात आल्या, अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने यांनी दिली. ट्रस्टच्या जय गणेश रुग्ण सेवा अभियानाच्या अंतर्गत पुणे शहर, पिंपरी-चिंचवड शहर आणि पुणे जिल्ह्याचा ग्रामीण भाग तसेच शिर्डी तालुक्यातील साकोरी गाव येथे वर्षभरात २६८ ठिकाणी नेत्रतपासणी आणि चिकित्सा शिबीरे घेण्यात आली. तपासणीत नेत्रदोष आढळलेल्या रुग्णांवर मोतीबिंदू, काचबिंदू, नेत्रपटल यांच्या शस्त्रक्रिया मोफत करण्यात आल्या. डोळ्याचा चष्मा घालविणारी लॅसिक शस्त्रक्रिया माफक दरात करण्यात आली.

## स्वा. सावरकर वाड्मय वक्तृत्व स्पर्धेत अभिनव स्कूलचा प्रथम क्रमांक



**आंबेगाव बु :** येथील अभिनव एज्यूकेशन सोसायटीच्या इंग्लिश मिडीयम स्कूल आणि जुनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी आबासाहेब गरवारे महाविद्यालयात नुकत्याच झालेल्या राज्यस्तरीय आंतरशालेय स्वा. सावरकर वाड्मय वक्तृत्व स्पर्धेत मोठ्या गटात प्रथम क्रमांक पटकावला. या वक्तृत्व स्पर्धेत मोठ्या गटात नक्षत्रा भंडारी हिने प्रथम क्रमांक पटकावला तर आर्या मोरे आणि छोट्या गटात रेवंत कुमार यांनी उत्तेजनार्थ बक्षीस पटकावले. त्याचबरोबर महाविद्यालयीन गटातून साक्षी बोधे हीने द्वितीय क्रमांक मिळवला.यास्पर्धेचे पारितोषिक वितरण सुप्रसिद्ध गायक, संगीत दिग्दर्शक कौशल इनामदार यांच्या हस्ते झाले. विनोद बंगाळे, सुरेश उदमले, रमेश जोगदंड, ज्योती साळवी, शारदा बेलदरे आणि पूनम मोरे यांचे मार्गदर्शन लाभले.संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजीव जगताप, सेक्रेटरी सुनीता जगताप, सहसेक्रेटरी निर्मोही जगताप, प्राचार्या वर्षा शर्मा यांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले.

# विळखा जलपर्णीचा अन 'महावादा'चाही...!

## डेंगीचा थयथयाट; महापालिका, जलसंपदाच्या वादात रोगाला 'साथ'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** हडपसर परिसरातील बेबी कॅनॉलसह शहरातील महत्वाच्या नद्यांमध्ये जलपर्णीची मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे, त्यातूनच डासांची उत्पत्ती वाढली असून 'जीबीएस' च्या नंतर आता डेंगीने फास आवळला आहे. मात्र; ही जलपर्णी कोणी काढायची यासाठी महापालिका प्रशासन आणि जलसंपदा या दोन महत्वाच्या खात्यांमध्ये वाद उफाळला आहे. त्यातूनच डेंगीचा थयथयाट वाढला आहे, विशेष म्हणजे या वादात साथीच्या रोगांना अधिकच 'साथ' मिळत आहे.

मध्ये जलपर्णीची वाढ झाली आहे. यामुळे तिथे मोठ्या प्रमाणात डासोत्पत्ती होऊन साथरोगांचा धोका वाढला आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या आरोग्य विभागाने जलसंपदा विभागाला जलपर्णी काढण्याबाबत पत्र दिले होते. मात्र, बेबी कॅनॉलमधील जलपर्णी आणि कचरा हा महापालिकेमुळे झाला असल्याने त्यांनीच तो स्वच्छ करावा, अशी भूमिका जलसंपदा विभागाने घेतली आहे. यामुळे जलपर्णी काढायची कोणी, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

> "हडपसर परिसरातील बेबी कॅनॉलमध्ये मोठ्या प्रमाणात जलपर्णी असून, त्यामुळे डासांची उत्पत्ती वाढली आहे. यातून साथरोगांचा धोका निर्माण झाला आहे. याचबरोबर तेथील नागरिकांकडूनही वारंवार डासांच्या वाढत्या प्रादुर्भावाबाबत तक्रारी येत आहेत. जलसंपदा विभागाला दोन महिन्यांपूर्वी पत्र पाठवूनही कार्यवाही झालेली नाही."
>
> **— डॉ. राजेश दिघे,** सहायक आरोग्य अधिकारी, पुणे महापालिका

> "बेबी कॅनॉलमध्ये कचरा टाकला जाऊ नये, यासाठी पुणे महापालिकेने उपाययोजना करायला हव्यात. त्या परिसरात कचराकुंड्या ठेवल्यास कचरा कॅनॉलमध्ये टाकला जाणार नाही. याचबरोबर महापालिकेने कॅनॉलच्या दोन्ही बाजूला संरक्षक जाळी बसविण्यासाठी कार्यवाही करायला हवी. कॅनॉलची स्वच्छता आणि सुरक्षेची कार्यवाही महापालिकेनेच करावी."
>
> **— श्वेता कुऱ्हाडे,** कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग

हडपसर-मुंढवा क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत बेबी कॅनॉल आहे. हा बेबी कॅनॉल साडेसतरा नळी, अन्सारी फाटा, महादेवनगर, घुले वस्ती, कल्पतरू सोसायटी, अमर सृष्टी, लक्ष्मी कॉलनी, विठ्ठलनगर, मांजरी, फुरसुंगी, शेवाळवाडी आणि सायकरवाडी या परिसरातून जातो. या कॅनॉलमध्ये सध्या मोठ्या प्रमाणात जलपर्णी वाढली आहे. कचराही मोठ्या प्रमाणात साचला आहे. जलपर्णीमुळे परिसरात डास वाढल्याच्या तक्रारी आरोग्य विभागाकडे सातत्याने येत आहेत. साथरोगांचा धोकाही त्यामुळे वाढला आहे.



आरोग्य विभागाने कीटकनाशक औषधांची फवारणी बेबी कॅनॉलमध्ये सुरू केली. मात्र, जलपर्णीमुळे औषधफवारणीचा फारसा उपयोग होत नसल्याचे निदर्शनास आले. या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाने जलसंपदा विभागाला २ जानेवारी रोजी पत्र पाठविले. त्यात बेबी कॅनॉलमधील जलपर्णी काढावी, अशी मागणी करण्यात आली. यावर जलसंपदा विभागाने कॅनॉलमधील जलपर्णी न काढण्याची भूमिका घेतली आहे.

जलसंपदा विभागाने महापालिकेला पत्र लिहिले असून, त्यात तेथील वस्तुस्थितीदर्शक अहवाल मांडला आहे. त्यात म्हटले आहे की, कॅनॉलच्या दोन्ही बाजूला मोठ्या प्रमाणात नागरीकरण झाले आहे. त्यामध्ये जास्त प्रमाण झोपड्यांचे आहे. नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात कचरा व राडारोडा कॅनॉलमध्ये टाकला जात आहे. त्यामुळे त्यात घाणीचे प्रमाण मोठे आहे. कॅनॉलच्या दोन्ही बाजूंनी यापूर्वी केलेली संरक्षण जाळीही नागरिकांनी तोडली आहे. जलसंपदा विभागाकडे कॅनॉल स्वच्छतेसाठी आवश्यक मनुष्यबळ व यंत्रे उपलब्ध नाहीत. महापालिकेकडून कचरा व्यवस्थापनाचे नियोजन नसल्याने कालवा कायमस्वरूपी सुस्थितीत आणि स्वच्छ ठेवणे शक्य नाही

# 'शहाणपण' सुचले पण उशीराने!

## स्वारगेट ते कात्रज मेट्रो मार्ग 'वळणावळणा'चा

Analytical




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** स्वारगेट ते कात्रज हा मेट्रोचा मार्ग पुन्हा पहिल्यापासूनच 'वळणावळणा'चा बनत चालला आहे; या मार्गावर आणखी एका स्थानकाचा समावेश करण्याचा 'शहाणपणा' महामेट्रो प्रशासनाला सुचला आहे. त्यासाठी सुधारीत सुधारित आराखडा मंजुरीसाठी राज्य आणि केंद्र सरकारकडे पाठविला जाणार आहे. त्यामुळे या प्रकल्पाच्या कामाला विलंब होणार आहे. बिबवेवाडी येथे नवीन मेट्रो स्टेशन उभारले जाणार आहे. मात्र; त्यामुळे या मार्गाला विलंब तर होणारच आहे पण याचा खर्चही काही कोटींनी वाढणार आहे.

पिंपरी-चिंचवड ते स्वारगेट हा मेट्रो मार्ग सुरू करण्यात आला आहे. त्यानंतर हाच मार्ग पुढे कात्रजपर्यंत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. स्वारगेट ते कात्रज हा सुमारे साडेपाच किलोमीटरचा मेट्रोचा विस्तारित मार्ग असणार आहे. या मूळ आरखड्यात मार्केट यार्ड, पद्मावती आणि कात्रज अशा तीन स्थानकांचा समावेश होता.

मात्र, तीन स्थानकांमध्ये अंतर अधिक असल्याने तसेच धनकवडी परिसरातील नागरिकांना याचा फायदा व्हावा, यासाठी एक स्थानक वाढविण्याची मागणी केली जात होती. त्यानुसार संपूर्ण अभ्यास करून महामेट्रोने दोन महिन्यांपूर्वी बालाजीनगर या नवीन स्थानकाला मान्यता दिली होती.

उपमुख्यमंत्री आणि पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी काही दिवसांपूर्वी या मेट्रो मार्गाचा आढावा घेतला. त्या वेळी या मार्गावर बिबवेवाडी येथेही स्थानक करण्याच्या सूचना केल्या. त्यानुसार महामेट्रोने पुन्हा एक स्थानक वाढविण्याचा आराखडा तयार केला आहे. त्याचा tसुधारित प्रस्ताव महापालिकेसमोर मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता.

याला महापालिकेच्या मुख्य सभेत नुकतीच मान्यता देण्यात आली आहे. या दोन नवीन स्टेशनमुळे मेट्रो प्रकल्पाचा खर्च ६८३ कोटींनी वाढणार आहे. तसेच, या वाढीव खर्चास पुन्हा राज्य आणि केंद्र सरकारची मान्यता घ्यावी लागणार आहे. यामध्ये वेळ जाणार असल्याने या मेट्रोला उशीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### खर्च ६८३ कोटींनी वाढला

- स्वारगेट ते कात्रज या विस्तारित मेट्रो मार्गाच्या जुन्या आराखड्यानुसार या प्रकल्पासाठी २ हजार ९५४ कोटींचा खर्च येणार होता. मात्र, नव्याने प्रस्तावित करण्यात आलेल्या दोन स्थानकांमुळे हा खर्च ६८३ कोटींनी वाढून ३ हजार ६३७ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. या विस्तारित मार्गासाठी महापालिकेला या प्रकल्पासाठी १८१ कोटी रुपयांचा खर्च द्यावा लागणारा होता. त्यामध्येही ६८ कोटींनी वाढ झाली आहे. त्यामुळे महापालिकेला आता २५० कोटी होणार आहे.

# अहो पोलीसदादा तुम्हीसुध्दा!

## पोलीसाचीच तक्रार घेण्यास टाळाटाळ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सर्वसामान्य नागरिकांची तक्रार घेण्यास पोलीस नेहमीच टाळाटाळ करतात, त्यामुळे त्यांना नाहक मनस्ताप सहन करावा लागतो. मात्र; चक्क एका पोलीसालाच आपल्याच समाजबांधवाकडे तक्रार दाखल करुन घेण्यास विनवणी करावी लागली. धक्कादायक बाब म्हणजे ड्युटीवर असलेल्या पोलीसाने त्याची ही विनवणी धुडकावून लावली. अखेर पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी खरडपट्टी केल्यानंतर या पोलीसाची तक्रार नोंदवून घेण्यात आली

कामावरून रात्री घरी जाताना रस्त्यावर गोंधळ घालणाऱ्या मद्यपी टोळक्याला हटकले म्हणून एका पोलीस कर्मचाऱ्यावर हल्ला करून बेदम मारहाण केल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेनंतर तक्रार देण्यासाठी पोलीस कर्मचारी चतु:श्रृंगी पोलीस ठाण्यात गेला. मात्र राजकीय दबावापोटी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांची तक्रार घेण्यास टाळाटाळ केली.

याप्रकरणी पोलीस हवालदार चंद्रकांत जाधव (वय ४२, रा. रामोशीवाडी) यांनी चतु:श्रृंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार रुपेश मांजरेकर (वय २५), अनिकेत राजेश चव्हाण (वय २१), अनिकेत घोडके (वय २४ ), अभि डोंगरे (वय २४, सर्व रा. रामोशीवाडी, वडारवाडी) यांना पोलिसांनी अटक केली आहे.



फिर्यादी चंद्रकांत जाधव हे सहकारनगर पोलीस ठाण्यात पोलीस हवालदार आहेत. गुरुवारी रात्री ते कामावरून घरी निघाले होते. सेनापती बापट रस्त्यावरील रत्ना हॉस्पिटल जवळ त्यांच्या घरापाशी रस्त्याच्या कडेला चौघे आरोपी दारू पिऊन गोंधळ घालत होते. यावेळी जाधव यांनी त्यांना हटकले. तेव्हा आरोपींनी जाधव यांना शिव्या घालण्यास सुरूवात केली. त्यानंतर आरोपींनी जाधव यांना मारहाण करण्यास सुरुवात केली. जाधव यांना ओढून एका रिक्षात नेले. त्यांच्या डोक्यात, तोंडावर व छातीवर लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच त्यांच्या कपाळावर दगडाने मारले. जाधव यांनी दोनतीनदा वार चुकवले. त्यानंतर ते जखमी अवस्थेत रिक्षातून बाहेर आले.

जाधव यांनी आरोपींचे मोबाइलद्वारे छायाचित्र काढले. आरोपींनी त्यांच्या हातातील मोबाईल जबरदस्तीने हिसकावला. सर्व जण दुचाकीवरुन पळून गेले. जाधव यांनी त्यांचे मित्र आणि भाऊ घटनास्थळावर आले.

# महादजी शिंदे एक्सप्रेसमध्ये मराठी साहित्ययात्री संमेलन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महादजी शिंदे एक्सप्रेसमधून (पुणे ते दिल्ली साहित्ययात्रा) : संत ज्ञानेश्वर महाराज यांची ओवी, संत तुकाराम महाराज यांचे अभंग, मोरोपंतांची आर्या, आणि तरुणाईची आधुनिक मराठी गीते, मराठी रॅप अशा विविधांगी कार्यक्रमांनी महादजी शिंदे एक्सप्रेसमध्ये उल्हासित वातावरण आहे.

९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी निघालेल्या पुणे ते दिल्ली प्रवासादरम्यान महादजी शिंदे एक्सप्रेसमध्ये मराठी साहित्ययात्री संमेलनाचे आयोजन करण्यात आले असून संमेलनाचा आजचा दुसरा दिवस आहे.

देवा चांगभलं रं..., जय जय महाराष्ट्र माझा या महाराष्ट्र गीतापासून गण, गवळण, अभंग, भक्तीगीते, भावगीते, लावणी, हिंदी चित्रपट गीते आणि अगदी मंगलाष्टकांपर्यंत विविध प्रकारांचे सादरीकरण सुरू आहे. मोठ्या उत्साहात साहित्यिक आणि साहित्य रसिक या फिरत्या चाकांवरील संमेलनात सहभागी झाले आहेत. साहित्य संमेलनात महाराष्ट्र आणि साहित्य या संदर्भात घ्यायच्या प्रश्नमंजुषेची तयारी देखील उत्साहात सुरू आहेत. जयश्री माजगावकर यांनी अहिल्याबाई होळकर यांची वेशभूषा साकारली आहे.



पुणे | गर्जा महाराष्ट्र माझा; जय जय महाराष्ट्र माझा...!: ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी निघालेल्या पुणे ते दिल्ली प्रवासादरम्यान महादजी शिंदे एक्सप्रेसमध्ये मराठी साहित्ययात्री संमेलनाचे आयोजन करण्यात आले असून संमेलनाचा आजचा दुसरा दिवस आहे.देवा चांगभलं रं..., जय जय महाराष्ट्र माझा या महाराष्ट्र गीतापासून गण, गवळण, अभंग, भक्तीगीते, भावगीते, लावणी, हिंदी चित्रपट गीते आणि अगदी मंगलाष्टकांपर्यंत विविध प्रकारांचे सादरीकरण सुरू आहे.

# सभासदांकडून वसूलीसाठी निबंधकांकडे मागता येणार दाद




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** अपार्टमेंटमधील एखादा सदनिकाधारक देखभाल-दुरुस्ती (मेंटेनन्स) खर्च देत नसेल, तर पूर्वी न्यायालयाचे दरवाजे ठोठावावे लागत होते. आता मात्र तसे करण्याची वेळ येणार नाही. कारण अशा सभासदांकडून मेंटेनन्स वसुली करण्यासाठी सहकार खात्याच्या रजिस्ट्रारकडेही (निबंधक) अर्ज करता येईल आणि वसुली आदेश प्राप्त करून घेता येतील.त्यामुळे अपार्टमेंटधारकांची डोकेदुखी कमी होणार आहे. मात्र या प्रस्तावास मान्यता देण्यास सरकारला वेळ मिळत नसल्याचे समोर आले आहे.

महाराष्ट्र अपार्टमेंट अॅक्ट १९७० (महाराष्ट्र वेश्म मालकी अधिनियमात) मध्ये बदल करण्याची शिफारस सहकार आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने राज्य सरकारला केली आहे. या कायद्यात बदलासंदर्भात अनेक शिफारशी केल्या आहेत. त्यापैकी वसुलीचे अधिकार रजिस्ट्रारला देण्याच्या महत्त्वपूर्ण शिफारशीचा त्यामध्ये समावेश आहे. याचा अहवाल गृहनिर्माण विभागाकडे सहा महिन्यांपासून प्रलंबित आहे. त्यास मान्यता मिळाली, तर अपार्टमेंटमधील रहिवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

अपार्टमेंट कायद्यातील तरतुदीनुसार, एखादा सभासद मेंटेनन्स देत नसेल, तर सध्याच्या कायद्यातील तरतुदीनुसार न्यायालयात अर्ज करावा लागतो. ही सर्व प्रक्रिया खर्चिक आणि वेळखाऊ आहे. त्याचा त्रास अन्य सभासदांना सहन करावा लागतो. मध्यंतरी राज्य सरकारने या कायद्यात बदल करण्यासाठी सहकार आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली १२ जणांची सदस्यीय समिती नेमली होती.

### असे असेल कामकाज

- अपार्टमेंटमधील तक्रारींचे निवारण करण्यासाठी तक्रार निवारण पॅनेल सुरू करण्याची शिफारस
- पॅनेलमध्ये अधिकाऱ्यांसह एक वकील आणि एक सनदी लेखापालाचा सदस्य म्हणून समावेश
- आर्थिक स्वरूपाची तक्रार आल्यानंतर सनदी लेखापालाकडे पाठविणार
- कायदेशीर बाबीच्या स्वरूपाची तक्रार वकिलाकडे पाठविणार
- या पॅनेलच्या माध्यमातून तक्रारीची छाननी करून निर्णय घेतला जाणार
- सभासदांचे समाधान झाले नाही, तर त्यांना सहकार न्यायालयात अपील दाखल करता येणार

#रा



हर हर गंगे .. नमामि गंगे .. !!: भारतीय संस्कृतीचे मानचिन्ह आणि हिंदू बांधवांच्या श्रद्धेचे प्रतीक असलेल्या गंगामातेच्या आशीर्वादाने प्रयागराज येथे सुरू असलेल्या महाकुंभ पर्वणीचे औचित्य साधून आज त्रिवेणी संगमामध्ये खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी आज श्रद्धापूर्वक स्नान केले.

## डॉ. कुमार सप्तर्षी यांना बाबा आमटे जीवनगौरव पुरस्कार



**पुणे :** बाबा आमटे एकता अभियान ट्रस्टतर्फे दिला जाणारा 'बाबा आमटे जीवनगौरव राष्ट्रीय पुरस्कार २०२५' ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि युवक क्रांती दलाचे संस्थापक डॉ. कुमार सप्तर्षी यांना जाहीर झाला असल्याची माहिती ट्रस्टचे सचिव डॉ.अशोक बेलखोडे, समन्वयक डॉ.सोमनाथ रोडे यांनी पत्रकाद्वारे दिली.हा पुरस्कार वितरण सोहळा रविवार,दि.२३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४ वाजता गांधी भवन (कोथरूड, पुणे) येथे होणार आहे.

जेष्ठ स्वातंत्र्यसैनिक जी.जी.पारीख आणि जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या सुहिता थत्ते, रुकय्या जोशी यांच्या हस्ते ज्येष्ठ लेखक डॉ.अच्युत गोडबोले यांच्या उपस्थितीत पुरस्कार वितरण होणार आहे. महारोगी सेवा समिती, आनंद वन चे अध्यक्ष डॉ विकास आमटे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील. याच कार्यक्रमात 'बाबा आमटे सामाजिक कार्यकर्ता राष्ट्रीय पुरस्कार' देवून ओरिसा येथील सामाजिक कार्यकर्ते मधुसूदन दास आणि कोल्हापूर येथील हसन फत्तेखान देसाई यांना संयुक्तपणे गौरविण्यात येणार आहे. देसाई हे बाबा आमटे यांच्या दोन्ही भारत जोडो सायकल अभियानातील सायकल यात्री आहेत.

## "राष्ट्रसमर्पित कलासाधना" या वार्तापत्राच्या विशेषांकाचे प्रकाशन



**पुणे :** "सांस्कृतिक वार्तापत्रा"च्या कर्वेनगर येथील कार्यालयाला विष्णूजी की रसोईचे संस्थापक जागतिक कीर्तीचे सुप्रसिद्ध शेफ,मराठी उद्योजक,दूरचित्रवाणी सूत्रसंचालक विष्णू मनोहर यांनी २० फेब्रुवारी रोजी भेट दिली.सांस्कृतिक वार्तापत्राने तयार केलेल्या 'राष्ट्रसमर्पित कलासाधना' या विशेषांकाचे प्रकाशन विष्णूजी मनोहर यांच्या हस्ते करण्यात आले.
या कार्यक्रमास राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम प्रांत कार्यकारिणी सदस्य दिलीप क्षीरसागर,पुणे महानगर प्रचार मंडळाचे माध्यम आयाम प्रमुख प्रकाश देशपांडे, सांस्कृतिक वार्तापत्राचे संपादक मिलिंद शेटे,व्यवस्थापिका सुनीता पेंढारकर,सह संपादक मेघना घांग्रेकर यांची मुख्य उपस्थिती होती.

## सुनेला पेटवून देणाऱ्या सासू आणि नणंदेला जन्मठेप

**पुणे :** स्वयंपाक करण्यावरुन झालेल्या वादातून सुनेला शिवीगाळ, तसेच अंगावर रॉकेल ओतून पेटवून देणाऱ्या सासू आणि नणंदेला अतिरिक्त सत्र न्यायाधीश प्रभाकर जाधव यांनी जन्मठेपेची शिक्षा सुनावली. मृत्यूपूर्व जबाब, तसेच साक्ष, पुरावे ग्राह्य धरुन न्यायालयाने सासू आणि नणंदेला दोषी ठरविले. ममता विजय चव्हाण (वय ४८, रा. श्रमिकनगर, मंगळवार पेठ) आणि रिटा उर्फ गौरी संतोष वाल्मिके (वय ३४, रा. जयजवाननगर) अशी शिक्षा सुनावलेल्यांची नावे आहेत. स्वयंपाक करण्यावरुन झालेल्या वादातून सासू ममता आणि नणंद रिटा यांनी दीपाली अमित चव्हाण (वय २८) हिच्या अंगावर रॉकेल ओतून पेटवून दिल्याची घटना १ नोव्हेंबर २०२३ रोजी घडली होती. गंभीर भाजलेल्या दीपालीला पती अमितने ससून रुग्णालयात दाखल केले होते. त्या वेळी ससून रुग्णालयात फरासखाना पोलीस ठाण्यातील सहायक निरीक्षक परशुराम शिंदे यांनी तिचा वैद्यकीय तज्ज्ञांच्या उपस्थितीत जबाब नोंदवून घेतला होता. उपचारादरम्यान दीपालीचा ३ नोव्हेंबर रोजी ससून रुग्णालयात मृत्यू झाला होता.

त्यानंतर पोलिसांनी सासू ममता आणि नणंद रिटा यांना अटक केली होती. दीपालीचा पेटवून देऊन खून केल्याप्रकरणी फरासखाना पोलिसांनी दोघींविरुद्ध गुन्हा दाखल करुन त्यांना अटक केली होती. या खटल्यात सरकार पक्षाकडून अतिरिक्त सरकारी वकील नामदेव तरळगट्टी यांनी बाजू मांडली. सरकार पक्षाकडून आठ साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली.

## चोरट्यांनी ३ रिक्षांची चाकेच चोरली

**पुणे :** पुणे शहरात मागील काही दिवसांपासून चोरीच्या घटनांमध्ये वाढ होताना दिसत आहे. दिवसाढवळ्या घरफोड्या, चेन स्नॅचिंग, रस्त्यात अडवून लुटणे अशा घटना सातत्याने घडतायेत. अशातच चोरांनी चोरी करण्याचा मोठा पराक्रम केलाय. चोरट्यांनी पार्किंगमध्ये उभ्या केलेल्या तीन रिक्षांची चाकेच चोरून नेली आहेत. अशा महान चोरांचं काय करावं असा सवाल उपस्थित होऊ लागला आहे.

मार्केटयार्ड भागातील विचित्र प्रकारची चोरी पाहून रिक्षाचालकांनी डोक्याला हातच लावला. हे चोर चाकं घेऊन पुढं त्यांचं काय करणार? असा सवाल चालकांनी उपस्थित केला आहे. पोलीस तरी त्या चोरांना पकडून काय करणार? अशी प्रतिक्रिया चालकांनी दिली आहे. पुण्यातील मार्केटयार्ड मधून हा चोरीचा प्रकार उघडकीस आला आहे. चोरट्यांनी पार्किंगमध्ये उभा केलेल्या तीन रिक्षांची चाके चोरून नेली. रात्रीच्या वेळी ही घटना घडल्याचे समोर आले आहे.

## जय भवानी जय शिवाजी...!



**पुणे** 'शिवसृष्टीच्या तिसऱ्या टप्प्याचे काम वेगाने व्हावे यासाठी राज्य शासनाकडून ५० कोटी रुपयांचा निधी दिला जाईल,' अशी घोषणा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे केली. महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठानच्या वतीने आंबेगाव बुद्रुक येथे उभारण्यात येत असलेल्या शिवसृष्टीच्या दुसरा टप्प्याचे लोकार्पण शिवजयंतीच्या निमित्ताने मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले.

## व्यवस्थित शिजवलेले चिकन खाल्ल्यास धोका नाही - डॉ. देवरे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** व्यवस्थित शिजवलेले चिकन खाल्ल्यास जीबीएस जिवाणूचा संसर्ग होत नाही. त्यामुळे चिकन खाण्यास हरकत नाही," असे आवाहन राज्याचे पशुसंवर्धन आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवरे यांनी केले आहे.

पुणे शहराजवळील खडकवासला धरणाच्या नजिकच्या लोकवस्त्यांमध्ये गुलियन बॅरी सिंड्रोम या आजाराचा प्रादुर्भाव झाला आहे. हा आजार कोंबड्यांचे मांस खाल्ल्याने तसेच तसेच दूषित पाण्यातून पसरत असल्याची शक्यता वर्तविण्यात येत होती. त्यामुळे चिकन खाणारांची संख्या रोडावली. त्यामुळे कुक्कुट पालकांच्या व्यवसायावर विपरीत परिणाम झाला असून नागरिकांमध्येही संभ्रम निर्माण होत आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे पशुसंवर्धन आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवरे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी चिकन खाण्याबाबतची माहिती दिली. याबाबत पोल्ट्री व्यावसायिक शरद गोडांबे तसेच राज्यातील कुक्कुट पालक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी डॉ. देवरे यांची भेट घेऊन चर्चा केली होती.

# टेकड्यांवर आता कॅमेऱ्यांची 'पाळत'

### शहरातील २२ टेकड्यांच्या सुरक्षेसाठी निधी मिळणार

शहरातील टेकड्यांवर फिरायला जात असलेल्या नागरिकांसाठी राज्य शासनाने कडक उपाययोजना करण्याचा निर्णय घेतला आहे; त्यासाठी या टेकड्यांवर कॅमेर्यांची कडक 'पाळत' ठेवण्यात येणार आहे. त्यासाठी प्रायोगिक तत्वावर २२ टेकड्यांची निवड करण्यात आली असून राज्य शासनाने पुणे पोलीसांना पहिल्या टप्प्यात ८० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे, त्यानुसार येत्या काही दिवसांतच बारा टेकड्यांवर प्रत्यक्षात कामाला सुरुवात करण्यात येणार आहे. येत्या सहा महिन्यात ही मोहिम फत्ते करण्याचा राज्य शासन आणि पुणे पोलीसांचा मानस आहे.

**Analytical**



"या कामासाठी राज्य शासनाच्या वतीने मिळणारा ८० कोटी रुपयांचा निधी पुणे पोलीसांना मिळाला आहे, त्यानुसार या कामाला लवकरच सुरुवात करण्यात येणार आहे. त्यातूनच टेकड्यांवर अधिक सुरक्षित वातावरण ठेवण्याचा आमचा प्रयत्न असणार आहे, त्यामुळे पुणे पोलीस यापुढील काळात अधिक सक्रीय राहणार आहेत."
— **अमितेश कुमार,** पोलीस आयुक्त पुणे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** बोपदेव घाटातील सामूहिक बलात्काराच्या घटनेनंतर शहरातील टेकड्यांच्या सुरक्षिततेचा विषय ऐरणीवर आला होता. तत्कालीन गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शहरातील सात नव्या पोलिस ठाण्यांच्या उद्घाटनावेळी शहरातील टेकड्या व अन्य ब्लॅकस्पॉट सुरक्षित केले जावेत, त्यासाठी लागणारा वेगळा निधी देखील देण्यात येईल, असे जाहीर भाषणात सांगितले होते.

त्यानंतर पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील संवेदनशील टेकड्या आणि ब्लॅकस्पॉट निश्चित करण्यात आले होते. त्या ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून कोणकोणत्या उपायोजना करण्यात याव्यात, याबाबत पाहणी करण्यात आली होती. त्यासाठी आता निधीसुद्धा उपलब्ध करून देण्यात आला आहे.

मिळालेल्या निधीच्या माध्यमातून टेकड्यांवर सीसीटीव्ही कॅमेरे, आय. पी. स्पीकर, पॅनिक बटन, स्मार्ट फ्लडलाइट, इंटरनेट, या सर्वांचा एकत्रित तांत्रिक समन्वय ठेवणारी यंत्रणा ही कामे होणार आहेत. टेकड्यामध्ये हनुमान टेकडी, जुना बोगदा घाट, तळजाई, सुतारदरा, एआरएआय टेकडी, अरण्येश्वर मंदिर, बाणेर टेकडी, बोलाईमाता मंदिर, जोगेश्वरी मंदिर, वेताळबाबा टेकडी, चतु:शृंगी टेकडी, बोपदेव घाट, पारसी ग्राउंड, पर्वती, कॅनॉल रोड या टेकड्यांसह अन्य ठिकाणांचा समावेश असणार आहे.



### अशी असणार 'नजर'

- टेकड्या आणि निर्धारित केलेल्या ब्लॅकस्पॉटवर ६०० अत्याधुनिक कॅमेरे
- २०० पीटीझेड (फिरते) कॅमेरे, ४००फिक्स कॅमेरे, १०० एएनपीआर कॅमेरे यांचा समावेश असणार आहे.
- रेकॉर्डवरील गुन्हेगारांसाठी फेसरीडिंग कॅमेरे बसविणार
- ब्लॅकस्पॉटवर कॅमेऱ्यांसह पॅनिक बटन असणार
- या भागांमध्ये टू वे पीए सिस्टिम देखील (माइक आणि स्पीकर) लावले जाणार
- रात्रीच्या वेळी स्पष्ट दिसावे म्हणून १७७ पेक्षा अधिक फ्लड लाइट्स बसविणार
- सिटी सर्वेलन्सचे बेस्ट फीचर्स यामध्ये समाविष्ट करण्यात आले आहेत.
- संवेदनशील ठिकाणी पोचण्यासाठी सात विशेष मोबाईल सर्वेलन्स व्हेईकल
- पोलिसांच्या या सातही वाहनांमध्ये ड्रोन कॅमेरे असणार आहेत.
- रेंज नाही त्या ठिकाणी यंत्रणा कार्यान्वित राहण्यासाठी रेडिओ फ्रिक्वेन्सीद्वारे कनेक्टिव्हिटी देणार

श्रीधर धुमाळ यांच्या पुण्यतिथी निमित्त

## गुडविलला धान्य व साड्यांची अनोखी भेट



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोथरुड :** रामबाग कॉलनी भागातील रहिवासी कै. श्रीधर धुमाळ यांच्या पहिल्या पुण्यनिमित्त त्यांचे नातेवाईकांनी गुडवीलला गहू, डाळी, तेल, कडधान्य व पंचवीस नवीन साड्यांची भेट दिली. या याप्रसंगी कन्यारत्न विवाह मदत योजने अंतर्गत वडिलांचे छत्र हरविलेल्या कू.प्रियंका अलकुंटे, रा. कोपरे या गरजवंत मुलीला तिच्या विवाहप्रीत्यर्थ संपूर्ण भांड्यांचा संच, साडी व चप्पल महेश विद्यालयाचे सेक्रेटरी ओमप्रकाश कासट, श्रीकांत कुलकर्णी व त्यांच्या पत्नी मीनाक्षी कुलकर्णी यांच्या हस्ते भेट देण्यात आली.

याप्रसंगी श्री. कासट म्हणाले गुडविलने गेल्या 13 वर्षात लाखो गरजू लोकांना कपडे, जेवण, महिलांना नोकरी, मुलींना भांडण्याचा संसार अशी अनेक प्रकारची मदत केली आहे. शिलाई युनिटचे अत्याधुनिक मशिन्स पाहून अजून अनेक महिलांना रोजगार मिळेल अशी आशा श्री.कुलकर्णी यांनी व्यक्त केली.

यावेळी गुडविल चे कालिदास मोरे,संपदा अलाटे व प्रसाद घारे उपस्थित होते.

## ग्राहकांना उत्तम सेवा देऊन विश्वास संपादन करा

### कार्यकारी संचालक एम. कार्तिकेयन यांचे आवाहन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** बँक ऑफ इंडियाच्या कर्मचारी वर्गाने ग्राहकांना उत्तम व चांगली सेवा देऊन त्यांचा विश्वास संपादन करावा. बँकेतर्फे ग्राहकांसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध योजनासाठी प्रोत्साहन देऊन बँकेचा व्यवसाय व गुंतवणूक वाढविण्यासाठी कर्मचारी वर्गाने प्रयत्न करण्याचे आवाहन बँक ऑफ इंडियाचे कार्यकारी संचालक एम. कार्तिकेयन यांनी आज गुरुवारी पुण्यात केले.

कार्तिकेयन आज बँकेच्या पुणे विभागाच्या दौऱ्यावर आले होते. त्यांनी आज बँकेच्या गणेशखिंड रस्त्यावरील बँकेच्या विभागीय कार्यालयास भेटू दिली. बँकेच्या ग्राहक व कर्मचारी वर्गाशी मनमोकळेपणाने संवाद साधला. ग्राहक व कर्मचार्याकडून बँकेच्या कामकाजात ग्राहकांसाठी कोणत्या उपाययोजना व उपक्रम राबविता येतील याच्या सूचना समजावून घेतल्या. त्यानंतर त्यांनी पत्रकार परिषदेत पत्रकारांना बँकेच्या विविध योजना व उपक्रमाविषयी माहिती दिली.ह्या कार्यक्रमात फिल्ड जनरल मॅनेजर दीपक गुप्ता, अंचलिक प्रबंधक संजय कदम, विपणन विभाग व इतर कर्मचारी उपस्थित होते.



**पुणे** संवाद: बँक ऑफ इंडियाचे कार्यकारी संचालक एम. कार्तिकेयन आज बँकेच्या पुणे विभागाच्या दौऱ्यावर आले होते. त्यांनी आज बँकेच्या गणेशखिंड रस्त्यावरील बँकेच्या विभागीय कार्यालयास भेट दिली. बँकेच्या ग्राहक व कर्मचारी वर्गाशी मनमोकळेपणाने संवाद साधला.

# सात वर्षांत जिल्ह्यातील पीडितांना नऊ कोटींची मदत




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** अत्याचाराला बळी पडलेल्या महिलेच्या मानसिक आरोग्य, तसेच भावनिक सुरक्षिततेवर परिणाम होतो. अशा घटनांमध्ये पीडित महिला कोलमडून पडतात. लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यांना वाचा फोडणे, तसेच पोलिसांकडे तक्रार नोंदविणे पीडित महिलांसाठी वेदनादायी असते. बदनामीची भीती, महिलेलाचा दोषी ठरविण्याच्या प्रवृत्तीमुळे अनेक प्रकरणात महिला तक्रार देण्यास पुढे येत नाहीत. पीडित महिला आणि तिच्या कुटुंबीयांना न्याय देण्यासाठी न्यायव्यवस्थेने त्यांच्या पाठीशी राहण्याचा निर्णय घेतला आहे.

मनोधैर्य योजनेअंतर्गत गेल्या सात वर्षांत जिल्ह्यातील एक हजार १२६ पीडितांना नऊ कोटी १३ लाखांची मदत शासनाकडून देण्यात आली आहे. पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडून पीडितांना मदत करण्यासाठी पाठपुरावा करण्यात आला असून, बलात्कार, लैंगिक अत्याचार, ॲसिड हल्ल्यात बळी पडलेल्या महिलांना या योजनेअंतर्गत मदतीचा हात दिला जातो.

पीडितांना नुकसानभरपाई देण्यासाठी राज्य शासनाने ३० डिसेंबर २०१७ रोजी मनोधैर्य योजना लागू केली. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाकडून ही योजना राबविण्यात येत आहे. बलात्कार पीडित, लैंगिक अत्याचाराला बळी पडलेली बालके, ॲसिड हल्ला, तसेच अल्पवयीनांना वेश्याव्यवसायास प्रवृत्त केल्याप्रकरणात सुटका करण्यात आलेल्या युवतींना शासनाकडून मनाधैर्य योजनेअंतर्गत मदत केली जाते.

बोपदेव घाट सामूहिक बलात्कार प्रकरणातील पीडित युवती, तसेच राजगुरूनगर भागात घडलेल्या बालिकांवर अत्याचार आणि खून प्रकरणात विधी सेवा प्राधिकरणाकडून मनाधैर्य योजनेअंतर्गत मदत करण्यात आली. बोपदेव घाट प्रकरणातील पीडित युवतीला दहा लाख रुपये, तसेच राजगुरुनगर प्रकरणातील बालिकेच्या कुटुंबीयांना दहा लाख रुपयांची मदत देण्यात आली.

"गेल्या सात वर्षांत पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडे एक हजार ५२९ पीडितांनी मदतीसाठी अर्ज केले. त्यापैकी एक हजार १२६ पीडितांना मनोधैर्य योजनेअंतर्गत नऊ कोटी १३ लाख रुपयांची मदत करण्यात आली."
— **सोनल पाटील,** न्यायाधीश, सचिव, पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण

## सुंदरबाई मराठे विद्यालयात शिवजयंती उत्साहात साजरी



**येरवडा :** गेनबा सोपानराव मोझे संस्थेच्या सुंदरबाई मराठे विद्यालयात शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष रामभाऊ मोझे, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर मोझे, आणि संचालिका श्रीमती अलका पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शिवछत्रपती महाराजांच्या प्रतिमेची मिरवणूक ढोल-ताशांच्या गजरात काढण्यात आली. शाळेतील विद्यार्थ्यांनी मावळ्यांच्या वेशभूषेत, हाती भगवे झेंडे घेऊन, "राजे आले, राजे आले" च्या घोषणांनी संपूर्ण परिसर शिवमय केला. विद्यार्थ्यांनी झुलवा पाळणा, शिवसोहळा, पोवाडे, आरत्या यांसारख्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे शिवरायांच्या कार्याला वंदन केले. या वेळी छत्रपती शिवाजी महाराजांचे आदर्श, शिस्तप्रियता, नेतृत्वगुण आणि स्त्रियांप्रती असलेला आदर या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. शिवरायांच्या विचारांवर मुलांनी चालल्यास भविष्यात स्वराज्याचे स्वप्न साकार होईल, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले. तसेच, पालकांनी आपल्या मुलांवर जिजाऊंसारखे संस्कार करावेत, असे आवाहनही करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक अनिल खांदवे, माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संजय सोमवंशी, पर्यवेक्षक . सुनील वळसे, सांस्कृतिक विभाग प्रमुख विद्या कव्हेकर, तसेच समाजशास्त्र विभागातील सर्व शिक्षकांनी विशेष प्रयत्न केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी केले, तर आभार प्रदर्शन श्रीमती माया आगरकर यांनी केले.संपूर्ण मैदान भगवेमय झाल्याने विद्यालयात एक अभूतपूर्व शिवमय वातावरण अनुभवायला मिळाले.

## 'आंतरराष्ट्रीय फार्मा ई-सिम्पोजियम २०२५' ला चांगला प्रतिसाद



**कात्रज :** भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाचे पूना कॉलेज ऑफ फार्मसी आणि इंडियन फार्मास्युटिकल असोसिएशन विद्यार्थी मंच पुणे (आयपीएएसएफ पुणे) यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या ६ व्या 'आंतरराष्ट्रीय फार्मा ई-सिम्पोजियम २०२५'चे आयोजन केले.दि.१५,१६ फेब्रुवारी २०२५ रोजी सुश्रुत सभागृह(भारती विदयापीठ,धनकवडी) येथे झालेल्या या परिषदेला चांगला प्रतिसाद मिळाला.

या फार्मा ई-सिम्पोजियमचे उद्घाटन ब्रिंटन फार्मास्युटिकलचे अध्यक्ष राहुलकुमार दर्डा यांच्या हस्ते करण्यात आले. पूना कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. आत्माराम पवार, उप-प्राचार्य डॉ. एल. साथीयानारायणनन, आयपीए पुणेचे माजी अध्यक्ष डॉ. चंदकांत कोकरे, सचिव डॉ. रवींद्र कांबळे, आयपीए विद्यार्थी मंच पुणेचे अध्यक्ष देव डांगी व इतर मान्यवर या कार्यक्रमात उपस्थित होते. पूना कॉलेज ऑफ फार्मसीचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. अमरजितसिंग राजपूत यांनी या परिषदेचे संयोजन केले.

या परिषदेत औषधनिर्माण शास्त्रामध्ये उद्योजकता विकास, स्टार्टअप्स, इन्व्हेस्टमेंट अँड फायनान्स, मार्केटिंग व आर्टिफिशियल इंटेलिजन्स यांसारख्या विषयांवर विचार मंथन करण्यात आले. राज्याच्या विविध कोपऱ्यातून ४५० हून अधिक फार्मसी आणि फार्मा मॅनेजमेंट विद्यार्थी उपस्थित राहिले.

यावेळी बोलताना ब्रिंटन फार्मास्युटिकलचे राहुल कुमार दर्डा म्हणाले,'भारत हा फार्मास्युटिकल कंपन्यांसाठी ४ लाख कोटींचे केंद्र आहे आणि पुढील ५ वर्षांत या क्षेत्राचा विस्तार १० लाख कोटींपर्यंत होईल, असा मला विश्वास आहे. नवीन पिढीत नेतृत्व व उद्योजकीय क्षमता वाढवण्याचे काम या सिम्पोजियम द्वारे होत आहे, जे मी माझ्या विद्यार्थीजीवनात यापूर्वी कधीच अनुभवले नाही.

## शिवनेरी हे राष्ट्रीय स्मारक व्हावे - गोपाळ तिवारी

**पुणे :** हिंदूस्थानचे अराध्य दैवत, श्रीमंत छत्रपती



शिवाजी महाराजांनी स्वराज्याची निर्मिती करून “रयतेच्या जनकल्याण राज्य व्यवस्थेची” स्थापना केली, त्याचा प्रत्यय शिवमुद्रेची प्रतीमा संविधानात प्रतिबिंबित होतअसल्याने देशवासीयांना येतो. उत्तम राज्यकारभाराचा आदर्श जगासमोर ठेवणारे, प्रजाहितदक्ष व लोककल्याणकारी राज्यकर्ते छत्रपती शिवाजी महाराज होते. सत्ता पक्षाने, शिवाजी महाराजांना अपेक्षीत ‘रयते प्रती, महीला - भगींनींचे प्रती, सुरक्षा पुरवुन व बळीराजा शेतकऱ्यां प्रती त्यांच्या पिकास योग्य भाव देण्याचा व राजकीय उत्तरदायीत्वाचा कृतीशील राजधर्म निभवण्याची आज गरज आहे. तरच ते शिव छत्रपतींना खरोखरचे अभिवादन व खरी सुमनांजली ठरेल अशी अपेक्षा काँग्रेस राज्य प्रवक्ते गोपाळ तिवारी यांनी केली. तसेच पुणे जिल्ह्यातील शिव छत्रपतींचे जन्मस्थान असलेला शिवनेरी किल्ला हे राष्ट्रीय स्मारक व्हावे. पुणे मेडीसीन असो व डीलीव्हरी बॉईज तर्फे सदाशीव पेठेत “श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस” पुष्पहार अर्पण व अभिवादन कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते. या प्रसंगी संयोजकप्रसन्न पाटील, पप्पू गुजर, डॉ शैलेश गुजर, संजय बिबवे, अनिल पाटोळे, भंडारे, दिवाकर राठी , धनंजय भिलारे, गणेश शिंदे, अँड स्वप्नील जगताप इ सह मेडीसीन डीलीव्हरी बॉईज मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

## गुंडांना पोलीसी खाक्या



## वाहनांची तोडफोड; गुंडाची धिंड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** हवेत कोयते फिरवून दहशत निर्माण करणाऱ्या आणि रिक्षांची तोडफोड करणाऱ्या गुंडांची दापोडी पोलिसांनी भर वस्तीमधून धिंड काढली आहे. नुमान खान, मुजफ्फर कुरेशी आणि सिपटेन खान अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. तोडफोड प्रकरणी फिरोज इर्षात शेख यांनी दापोडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती.

१५ फेब्रुवारी रोजी तिन्ही आरोपींनी मदरसा परिसर आणि पवार वस्ती परिसरात रस्त्यावर पार्क केलेल्या दोन रिक्षांची तोडफोड केली होती. पाच ते सहा दुचाकींच मोठं नुकसान केलं होतं. तसेच हवेत कोयते फिरवून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. ही घटना १५ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी घडली होती. याप्रकरणी दापोडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. नुमान खान, मुजफ्फर कुरेशी आणि सिपटेन खान यांना बेड्या ठोकल्या. घटनास्थळी पवार वस्ती आणि तोडफोड केलेल्या परिसरातून पोलिसांनी आरोपींची धिंड काढली. गुंडांवर पोलिसांचा वचक राहावा म्हणून ही कारवाई करण्यात आल्याने नागरिकांमधून पोलिसांचं स्वागत करण्यात येत आहे.

# बाबा कांबळे यांनी मुंबईत घेतली दलित पिडित कुटूंबाची भेट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** आमच्या तक्रारींचे निवारण करा. आम्हाला लवकर न्याय द्या.न्याय देऊन तुमच्या लाडक्या बहिणीला मानापानाने घरी जाण्याची व्यवस्था करा, असे साकडे पिंपरी-चिंचवडमधील थेरगाव येथील अन्यायग्रस्त चव्हाण कुटुंबियांनी घातले आहे. पाण्यापासून वंचित ठेवत जातीवाचक शिविगाळ प्रकरणी न्याय मिळावा म्हणून थेरगाव येथील रेश्मा चव्हाण आपल्या दोन मुले आणि बहिणीसह मुंबईपर्यंत चालत गेले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेण्यासाठी हे कुटुंब मुंबईत पोचले आहे.



कष्टकरी कामगार पंचायतीचे अध्यक्ष बाबा कांबळे यांनी त्यांची मुंबई येथे भेट घेऊन विचारपूस केली. या वेळी बाबा कांबळे यांच्या आवाहनानंतर चव्हाण यांनी सोशल मिडियाच्या माध्यमातून आपले गाऱ्हाणे मांडले आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात कायदा सुव्यवस्थेचा बोजवारा उडत आहे. सावकारी पाश वाढल्याने रिक्षा चालक आणि एका कुटुंबियाने आत्महत्या केली. त्यांना न्याय देऊन थेरगाव येथील कुटुंबाला देखील न्याय देण्याची मागणी बाबा कांबळे यांनी पोलिस आयुक्तांना दिलेल्या निवेदनात केली. दरम्यान पिंपरी ते मुंबई १३४ किलोमीटर पेक्षा अधिकचे अंतर दोन लहान मुलांसोबत चालत जाणाऱ्या कुटुंबियांची बाबा कांबळे यांनी मुंबई येथे भेट घेतली.

या बाबत बाबा कांबळे म्हणाले की, लहान लेकरांना घेऊन न्याय मागण्यासाठी संबंधीत कुटुंबियांना मुंबईपर्यंत चालत यावे लागत असेल तर हे दुर्दैव आहे. मुलांची अवस्था बिकट झाली आहे. या प्रकरणाची पोलिस प्रशासनाने दखल घेणे अपेक्षित होते. मात्र पोलिस आपले काम करत नाहीत, हा आरोप मी केला होता. तो या कुटुंबियांच्या आंदोलनाने सिद्ध झाला असल्याचे हे चित्र आहे. या कुटुंबियांना आझाद मैदानावर देखील आंदोलन करू दिले नाही. त्यामुळे सध्या हे मुंबई रेल्वे स्टेशनवर थांबले आहेत. न्याय मिळाला नाही तर ते दिल्लीला चालत जाऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना न्याय मागणार असल्याचे सांगत आहेत.

या प्रकरणाची दखल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, यांनी त्वरीत त्या कुटुंबाला भेट देऊन न्याय द्यावा. यांना दिल्लीला जाण्याची वेळ येऊ देऊ नये, या बाबत खबरदारी घ्यावी. अन्यथा आम्ही देखील संघटनेच्या माध्यमातून तीव्र आंदोलन छेडू, अशाच प्रकारच्या असंख्य घटना पिंपरी चिंचवड शहरांमध्ये घडत आहेत या सर्व प्रश्नांवरती आवाज उठवण्यासाठी व या प्रकरणी शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मंगळवारपासून बाबा कांबळे यांनी आत्मक्लेश सत्याग्रह करून उपोषण करण्याचे जाहीर केले आहे, असे बाबा कांबळे म्हणाले.

## बालकांनी अनुभवले 'छावा' चे शौर्य !



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** छोटे व्यावसायिक असोसिएशन तुळशीबाग, तुळशीबाग परिवाराकडून शेठ हिरालाल सराफ प्रशाला आणि स्वाधार मोहर आश्रमातील बालकांना 'छावा' हा चित्रपट आर डेक्कन चित्रपट गृहात २० फेब्रुवारी रोजी दाखवण्यात आला.धर्मरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांचा आदर्श नव्या पिढीपर्यंत नेण्यासाठी हा उपक्रम करण्यात आला.

या मुलांबरोबर कसबा विधानसभा मतदारसंघाचे आमदार हेमंत रासने,पुणे शहर हॉकर्स आघाडी अध्यक्ष सागर दहीभाते , सूरज दवे, अरविंद तांदळे, बिरजू ननावरे, परमेश्वर पवार, सोपान उमाजी, प्रविण सोनार,सिद्धार्थ ठक्कर,प्रतीक ओझा उपस्थित होते.या कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांना भगव्या टोप्या तसेच,महाराजांच्या जीवनावर आधारित रयतेचे राजे हे पुस्तक भेट देण्यात आले. आमदार हेमंत रासने म्हणाले,'छत्रपती संभाजी महाराज हे संपूर्ण हिंदू समाजाच्या अस्मितेचे प्रतिक आहेत. त्यांच्या पराक्रमाची, त्यागाची आणि धर्मरक्षणाच्या महान लढ्याची शिकवण प्रत्येक हिंदुस्थानी मुलापर्यंत पोहोचावी, यासाठीच हा उपक्रम राबवण्यात आला '.

यावेळी सागर दहीभाते म्हणाले मुलांना केवळ चित्रपट दाखवणे एवढाच उद्देश नसून, संभाजी महाराजांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन त्यांच्या मनात राष्ट्रभक्ती, धर्मनिष्ठा आणि स्वाभिमान रुजवण्याचा प्रयत्न आहे.संभाजी महाराजांची गाथा ऐकताना अंगावर काटा येतो, आणि तीच भावना या मुलांच्या मनातही रुजावी, यासाठी हा छोटासा प्रयत्न आहे.

### पिंपरी - चिंचवड अॅडव्होकेटस् बार असोसिएशनतर्फे

## शिवजयंती उत्साहात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी न्यायालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या थाटात साजरा करण्यात आली. आज बुधवार, दिनांक १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ वी जयंती आहे. छत्रपती शिवाजी महाराज जयंती किंवा शिवजयंती महाराष्ट्रात एखाद्या सणाप्रमाणे साजरी केली जाते. हा सण स्वराज्याचे संस्थापक शिवाजी महाराज यांच्या जन्मदिवसानिमित्त महाराष्ट्र सरकारने निश्चित केल्याप्रमाणे १९ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्रभर साजरा केला जातो. इ.स. १८६९ साली महात्मा जोतिराव फुले यांनी रायगडवरील शिवाजी महाराजांची समाधी शोधून काढली आणि शिवाजी महाराजांचे कार्य लोकांपर्यंत पोहचावे यासाठी महात्मा फुलेंनी इ.स. १८७० साली शिवजयंती सुरू केली, जी पहिली शिवजयंती होती, आणि शिवजयंतीचा पहिला कार्यक्रम पुणे येथे पार पडला.

पिंपरी न्यायालयात पिंपरी - चिंचवड अॅडव्होकेटस् बार असोसिएशनतर्फे पारंपरिक वाद्याच्या गजरात श्रींच्या पालखीची न्यायालय परिसरात मिरवणूक काढण्यात आली. यावेळी उपस्थित वकिलांनी पारंपरिक वेषभूषा करीत भगव्या टोप्या परिधान केल्या होत्या; तसेच



मिरवणुकीदरम्यान पालखीवर पुष्पवृष्टी करीत फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. यावेळी जय भवानी, जय शिवाजी या घोषणांनी न्यायालय परिसर दुमदुमून निघाला होता.

सदर कार्यक्रमासाठी पिंपरी - चिंचवड अॅडव्होकेटस् बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष अॅड. विलास कुटे, अॅड. रामराजे भोसले, अॅड. दिनकर बारणे, अॅड. सुशील मंचरकर, अॅड. मदनलाल छाजेड, अॅड. राजेश पुणेकर, ज्येष्ठ विधिज्ञ अॅड. संगीता परब आदी उपस्थित होते.

# २३ फेब्रुवारीपासून शिवशंभो महाशिवरात्री महोत्सव




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** शिवशंभो फाउंडेशनच्या वतीने रविवार, दिनांक २३ फेब्रुवारी ते गुरुवार, दिनांक २७ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत पाच दिवसीय शिवशंभो महाशिवरात्री महोत्सव २०२५चे शाहूनगर, चिंचवड येथे आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये तीन दिवसीय शिवशंभो व्याख्यानमाला, शिवशंभो कार्यभूषण आणि कार्यगौरव पुरस्कार वितरण सोहळा, चित्रकला - रांगोळी - विविध गुणदर्शन आणि समूहगान स्पर्धा, भजन - कीर्तन, शिवलीलामृत ग्रंथ पारायण, ओंकार संगीत संध्या-अभंग व भक्तिगीते, महाप्रसाद अशा वैविध्यपूर्ण कार्यक्रमांची पर्वणी आयोजित करण्यात आली आहे.

खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेश लांडगे, शंकर जगताप, अण्णा बनसोडे, उमा खापरे, अमित गोरखे, सदाशिव खाडे, अभय कोटकर, आयुक्त शेखर सिंह, बापूसाहेब बांगर, राजेश खन्ना, नितीन काकडे, अनुराधा गोखले, तुषार हिंगे, मंगला कदम, योगिता नागरगोजे, नारायण बहिरवाडे, महेश चांदगुडे, शिवाजी आखाडे, सुप्रिया चांदगुडे, डॉ. जयकुमार गुंजकर, आबासाहेब नागरगोजे, भाऊसाहेब पाटील, योगेश बाबर, किशोर सोमवंशी, शिशुपालसिंह तोमर, नंदकुमार साळुंखे, सोमनाथ खेडेकर अशा राजकारण, समाजकारण, प्रशासन आणि औद्योगिक क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

शिवशंभो व्याख्यानमालेत रविवार, २३ फेब्रुवारी रोजी आशिष कलावार आणि रिता कलावार दाम्पत्य'विज्ञान व अध्यात्म'या विषयावरील प्रथम पुष्प गुंफतील. सोमवार, २४ फेब्रुवारी रोजी निवृत्त ब्रिगेडियर हेमंत महाजन'भारतापुढील संरक्षणाची आव्हाने'या विषयावर ऊहापोह करतील; तर मंगळवार, २५ फेब्रुवारी रोजी डॉ. संजय कळमकर 'जगण्याच्या आनंदी वाटा'या विषयावर श्रोत्यांशी हितगुज साधतील. तिन्ही व्याख्याने सायं. ७.३० वाजता सुरू होतील. दिनांक २६ फेब्रुवारी २०२५ रोजी माजी आमदार अॅड. गौतम चाबुकस्वार यांना शिवशंभो कार्यभूषण तसेच उद्योजक महेंद्र पाटील आणि सिंधू बंडगर यांना शिवशंभो कार्यगौरव पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. दिनांक २७ फेब्रुवारी रोजी सायं. ६ ते रात्री १० वाजेपर्यंत महाप्रसादाचा लाभ घेता येईल. या महाशिवरात्री महोत्सवात सर्व नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन शिवशंभो फाउंडेशनचे संस्थापक केशव घोळवे आणि अध्यक्ष संजय तोरखडे यांनी केले आहे.

संपादकीय विशेष

# नवे संमेलन, पाढा मागील ठरावांचा

देशाच्या राजधानीत पार पडत असल्यामुळे 98 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला वेगळे महत्त्व आहे. पूव संमेलनाच्या व्यासपीठावरुन तर्कतीर्थांनी मराठी साहित्यासंदर्भात काही मूलभूत विचार मांडले होते. मात्र तेव्हा मांडलेले ते विचार आजही त्याच पद्धतीने जवळपास प्रत्येक संमेलनामध्ये मांडले जाताना दिसतात. दर वष संमेलने पार पडतात, मात्र तर्कतीर्थांनी व्यक्त केलेल्या तेव्हाच्या मूलभूत प्रश्नांवर आजही काम झालेले नाही. परिणामी ते वारंवार त्याच पद्धतीने मांडावे लागतात ही बाब आपण समजून घ्यायला हवी. इथे कामे होत नाहीत, असे म्हणता येणार नाही, मात्र ती अतिशय संथ गतीने होतात, हेदेखील नाकारुन चालणार नाही. उदाहरणादाखल बघायचे तर अनेक साहित्य संमेलनांमध्ये लिपी सुधारण्यासारखी विधेयके मांडली गेली आणि तसे ठराव केले गेले. याच धतवर शुद्धलेखनाचे, सीमा प्रश्नाच्या संदर्भातील वा अशा अनेक स्वरुपाचे ठराव केले गेले. एखादा ठराव मांडल्यावर वर्षभर मंथन होऊन ती बाब एखाद्या निष्कर्षापर्यंत पोहोचणे अभिप्रेत असते. कारण यासाठीच ही योजना केलेली असते. यात शासनाकडे केलेली मागणी असते आणि प्रशासनाने त्यावर काम करावे, या हेतूने तो विषय पुढे मांडलेला असतो. या अर्थानेच पूवपासून मराठी साहित्य संमेलनांमध्ये विमानतळांवर मराठीत पाट्या लावा, पोस्ट ऑफिसमध्ये मराठीचा वापर वाढला पाहिजे असे ठराव अनेकदा मांडले गेले. मात्र यासंदर्भात काहीही झालेले दिसत नाही. नामांतरासारख्या प्रश्नांसंबंधीही ही स्थिती बघायला मिळते. म्हणजेच बरीच वर्षे पाठपुरावा केला तेव्हा कुठे काही प्रश्न माग लागलेले दिसतात. तेव्हा प्रत्येक प्रश्नाचा असा पाठपुरावा करण्याची जबाबदारी मंडळाने उचलायला हवी. हे झाले तर त्याच्याशी संलग्न असणाऱ्या प्रत्येक क्षेत्रामध्ये वेगाने आवश्यक ते बदल घडताना दिसतील.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाबरोबरच वर्षभर अनेक विभागीय संमेलने होत असतात. विदर्भ, पुणे, मुंबई वा राज्याबाहेरच्या गावा-शहरांमध्येही अशी संमेलने आयोजित होतात. साहित्य महामंडळ या सर्वांचे प्रमुख आहे. मात्र महामंडळातील मंडळी आणि या घटक संस्थांमध्ये काम करणारी मंडळी केवळ संस्थेतील शोभेसाठी असल्यासारखी वागतात. नाव, प्रसिद्धी मिळावी एवढ्यासाठीच जणू ती तिथे असतात. वर्षभर जवळपास 200 संमेलने भरत असल्याचे लक्षात घेता खरे तर या प्रत्येक ठिकाणी होणारे ठराव महामंडळाला माहिती असायला हवेत. उदाहरणार्थ पुण्यातील मसापअंतर्गत येणाऱ्या जिल्ह्यांमध्ये आयोजित होणाऱ्या संमेलनांमध्ये झालेले ठराव आपला निरीक्षक पाठवून महामंडळाकडे समजून घेतले पाहिजेत. पुढे त्यावर महामंडळाने काम करणे अपेक्षित आहे. किंबहुना, मराठीच्या उद्धारासाठी तसेच प्रचार-प्रसारासाठी हे काम आवश्यक असल्याचे घटनेत म्हटले आहे. मात्र इतक्या मूलभूत गोष्टी होत नसतील तर ते मराठीच्या संवर्धनासाठी, प्रचार-प्रसारासाठी नेमके काय करतात, हा प्रश्न उरतो. इथे जमणाऱ्या मंडळींनी, साहित्य वर्तुळात वावरणाऱ्यांनी केवळ संमेलनाला उपस्थित राहून आणि वृत्तपत्रात येणाऱ्या फोटो वा बातमीवर समाधान मानले तर हे लक्ष्य साध्य करणे केवळ अशक्य आहे. कारण साहित्य संमेलनाचे व्यासपीठ ही केवळ मिरवण्याची जागा नाही. ही जागा जमलेल्या लोकांना शहाणपणा शिकवण्याचीही नाही. या भूमिकेतून बाहेर पडून होणारे कामच मराठीच्या उद्धाराला पोषक आणि कारक ठरेल.

महामंडळातील पदाधिकाऱ्यांनी मांडलेले ठराव सरकारदरबारी पाठवून त्याचे पुढे काय झाले, हे जाणून घेतले पाहिजे. दर तीन, सहा, नऊ वा बारा महिन्यांनी त्याची आठवण करुन दिली पाहिजे. कारण यासंदर्भात काम करणारी विशिष्ट खाती त्यांच्याकडे असतात. त्यासाठी निधी राखून ठेवला जातो, दिला जातो. पण राजकारणी मंडळी आपल्या मजतील लोकांना निधीचे वाटप करुन मोकळी होतात आणि वाचनालय काढून वा मराठीची एखादी कार्यशाळा घेऊन आपण काही तरी केल्याचे दाखवत ही मंडळीही थांबतात. इथेच विषय संपतो पण मूलभूत प्रश्न अनुत्तरितच राहतात. खरे तर अनेक मोठ्या मंडळींना ही कामे कशी माग लावायची वा करुन घ्यायचे याचे ज्ञान, अक्कल, शहाणपण, हुशारी सगळे आहे. मात्र ते आज प्रत्यक्ष उतरुन काम करण्यास तयार नाहीत. म्हणूनच मराठीचा दरबार देखणा करायचा असेल तर सर्व पातळ्यांवर काम होणे गरजेचे आहे. त्यासाठी महामंडळाच्या लोकांनी घटक संस्थांच्या लोकांना जबाबदार धरले पाहिजे तर घटक संस्थांच्या लोकांनी जिल्ह्यातील संस्थांना तर त्यांनी शाखांना जबाबदार धरले पाहिजे. अशा पद्धतीने एकमेकांकडून कामाकाजाची माहिती एकत्रित झाली तरच कामामध्ये सूसुत्रता येईल आणि अनेक प्रश्न माग लागतील.

दर वष वेगळ्या ठिकाणी साहित्य संमेलन पार पडते. आता दिल्लीत असले तर पुढल्या वष ते वेगळ्या ठिकाणी असेल. मात्र या दोन ठिकाणांचा एकमेकांशी काहीही संबंध नसतो. म्हणजेच 'सरहद'वाले आपल्या पद्धतीने हे काम करुन मोकळे होतील तर उद्याचे संमेलन नवे आयोजक आपल्या पद्धतीने संमेलन पार पाडतील. आता तर पैसा आणि मनुष्यबळ असल्यामुळे राजकीय मंडळींचे वर्चस्व दिसते. खरे तर महामंडळाकडे साहित्य संमेलने घेण्याइतका स्वतःचा फंड असायला हवा. हे झाले तर सरकारकडे हात पसरण्याचा प्रश्नच निर्माण होणार नाही. मात्र महामंडळ कधीच हा विचार करताना दिसत नाही. मग हेच लोक पुरेसा फंड नसल्यामुळे पुढाऱ्यांच्या मागे लागतात आणि तेदेखील आपल्या अध्यक्षतेखाली हा सोहळा करुन घेतात. हे टाळण्यासाठी आधी साहित्यिकांनी कणा असल्याचे दाखवून द्यायला हवे. तो केवळ मंचीय भाषणातून नव्हे तर एकूण वर्तनातून, देहबोलीतून दिसायला हवा.

साहित्य संमेलनाला येणाऱ्या निमंत्रितांनीही आपल्या मागण्यांचे भान राखणे गरजेचे आहे. अनेकजण कोणत्या भागात साहित्य संमेलन आहे, तिथे कोणती आणि किती सोय असेल याचे भान न राखता अवाजवी अपेक्षा ठेवतात आणि तशा मागण्या रेटत राहतात. खरोखरच मराठीला चांगले दिवस दाखवायचे असतील तर हे व्रत हाती घेऊन काम केले पाहिजे. मागे एका साहित्यिकाने आपला धडा शाळेत जाऊन शिकवण्याचा निश्चय केला होता. यायोगे तो साहित्यिक मुलांसमोर येतो, विचार पोहोचतात आणि त्यांना प्रत्यक्ष पाहण्याचा वेगळा प्रभावही जाणवतो. अशा पद्धतीचे उपक्रम वर्षभर सुरू ठेवणे आणि त्यायोगे मराठीचा जागर करणे गरजेचे आहे.

# भारतीय संघाला शुभेच्छा!

रणसंग्राम

श्याम ठाणेदार

जगातील आठ सर्वोत्तम संघात खेळली जाणारी क्रिकेटची चॅम्पियन ट्रॉफी अर्थात मिनी वर्ल्डकप स्पर्धा पाकिस्तान आणि दुबई येथे १९ फेब्रुवारी पासून सुरू झाली असून या स्पर्धेतील पहिला सामना यजमान पाकिस्तान व न्युझीलंड या दोन देशात पार पडला. या स्पर्धेतील भारताचा पहिला सामना २० फेब्रुवारी रोजी बांगलादेशाशी दुबईत झाला.



भारताचा दुसरा सामना पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानशी रविवारी अर्थात २३ फेब्रुवारी रोजी दुबईत होईल. केवळ भारत पाकिस्तानमधील क्रिकेट रसिकांचेच नव्हे तर जगभरातील क्रिकेट रसिकांचे लक्ष या सामन्याकडे लागले आहे. भारत पाकिस्तान हा हाय व्होल्टेज सामना दुबईत रंगणार असून नेहमीप्राणेच हा सामना अटीतटीचा होईल यात वाद नाही. भारताचा न्युझीलंडशी १२ मार्च रोजी मुकाबला होईल. भारताच्या गटात बांगलादेश, पाकिस्तान आणि न्युझीलंड हे देश आहेत. यातील भारत पाकिस्तान आणि न्युझीलंड हे तिन्ही देश या स्पर्धेतील माजी तसेच संभाव्य विजेते म्हणूनही गणले जातात त्यामुळेच या ग्रुपला ग्रुप ऑफ डेथ असे म्हंटले जाते. भारताला उपांत्य फेरी गाठायची असेल तर किमान दोन सामने जिंकावे लागतील ते ही चांगल्या धावगतीने कारण ग्रुप मधील तीन संघाने जर प्रत्येकी दोन विजय मिळवले तर ज्यांची धावगती चांगली आहे अशाच दोन संघाला उपांत्य फेरीत प्रवेश मिळेल. भारताला खरा धोका आहे तो पाकिस्तान आणि न्युझीलंड या दोन देशांशी कारण हे दोन्ही देश धोकेदायक समजले जातात. अलीकडच्या काळात भारताने पाकिस्तानवर वर्चस्व गाजवले असले तरी मागील म्हणजे २०१७ च्या चॅम्पियन ट्रॉफी मधील अंतिम सामन्यात पाकिस्ताननेच भारताला नमवले होते हे विसरून चालणार नाही. न्युझीलंड हा आयसीसी ट्रॉफी स्पर्धेत कायम भारताला जड गेलेला देश आहे. आयसीसी ट्रॉफी स्पर्धेत न्यूझीलंडचा भारताविरुद्धचा रेकॉर्ड चांगला आहे म्हणून भारताने या दोन्ही देशांशी खेळताना सतर्क राहायला हवे. जर भारताने या दोन देशांना नमवले तर भारत उपांत्य फेरीत पोहचेल. भारत उपांत्य फेरीत पोहचला तर अंतिम फेरीत नक्की पोहचेल इतकेच नाही तर भारत चॅम्पियन ट्रॉफीवर नाव देखील कोरेल असा विश्वास अनेक दिग्गज आजी माजी क्रिकेटपटुंना आहे त्याचे कारणही तसेच आहे भारतीय संघ सध्या फॉर्मात आहे. नुकत्याच झालेल्या इंग्लंड विरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत भारताने एकतर्फी विजय मिळवत इंग्लंडला व्हाईट वॉश दिला. विशेष म्हणजे या मालिकेत भारताच्या सर्वच खेळाडूंनी चांगली कामगिरी केली. भारताचा कर्णधार रोहित शर्मा याने इंग्लंड विरुद्ध शतक झळकावून फॉर्मात आल्याचे दाखवून दिले. ऐन चॅम्पियन ट्रॉफीच्या तोंडावर रोहित शर्मा फॉर्मात आला हे भारतासाठी शुभचीन्ह आहे. रोहित शर्मा फॉर्मात असला की तो भारताला एकहाती विजय मिळवून देतो. रोहित शर्मा सोबतच भारताचा मॅच विनर आणि जगातील सर्वोत्तम फलंदाज विराट कोहली हा देखील फॉर्ममध्ये आला आहे. हे दोघे भारताचे जय विरू आहेत. हे दोघे फॉर्मात येणे म्हणजे भारताचे निम्मे काम फत्ते होणे. या दोघांना शुभमन गिल, श्रेयस अय्यर आणि के एल राहुल यांची साथ मिळेल. यातील गिल आणि श्रेयस हे दोघेही फॉर्मात आहेत. राहुलने मोठी खेळी केली नसली तरी मोठ्या स्पर्धेत तो आपला खेळ उंचावतो. हार्दिक पांड्या आणि रविंद्र जडेजा हे भारतचे अष्टपैलू खेळाडू फलंदाजी आणि गोलंदाजीत कमाल करू शकतात तसेच त्यांचे क्षेत्ररक्षण ही उत्तम आहे. कुलदीप यादव आणि अक्षर पटेल हे फिरकीची तर मोहंमद शामी आणि अर्षदीप सिंग हे वेगवान गोलंदाजीची धुरा सांभाळतील. जसप्रीत बुम्राची उणीव जाणवणार असली तरी शामी आणि अर्षदीप आपल्या वेगवान गोलंदाजीने प्रतिस्पर्धी फलंदाजांना जेरीस आणतील यात वाद नाही. भारताप्रमाणेच ऑस्ट्रेलिया, न्युझीलंड, दक्षिण आफ्रिका आणि पाकिस्तान या संघाकडे संभाव्य विजेते म्हणून पाहिले जात असले तरी भारतीय संघ या स्पर्धेतील सर्वात बलाढ्य संघ आहे. जर भारताच्या खेळाडूंनी त्यांच्या क्षमतेनुसार खेळ केला तर २०१३ नंतर प्रथमच भारत चॅम्पियन ट्रॉफीवर नाव कोरेल आणि १४४ कोटी देशवासीयांना जल्लोष करण्याची संधी मिळवून देईल यात शंका नाही. भारतीय संघाला चॅम्पियन ट्रॉफीसाठी मनापासून शुभेच्छा!

# सकारात्मक विचार करुन परीक्षा द्या!

फेब्रुवारी मार्च महिना म्हटलं की परीक्षांचा हंगाम. दरवर्षी याच दोन महिन्यात परीक्षा होतात. दहावी बारावी या बोर्डाच्या परीक्षाही याच काळात असतात. इतकेच काय तर शिष्यवृत्ती, नवोदय यासारख्या स्पर्धा परीक्षाही याच काळात होतात. इयत्ता ५ वि आणि ८ वी च्या शिष्यवृत्ती परीक्षा नुकत्याच पार पडल्या. दहावीची बोर्ड परीक्षा आजपासून म्हणजे २१ फेब्रुवारी पासून सुरू होत असून ती १७ मार्च पर्यंत असणार आहे. बारावीची परीक्षाही ११ फेब्रुवारी रोजी सुरू झाली असून ती ११ मार्च पर्यंत चालणार आहे. या परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील मैलाचा दगड असतो. विद्यार्थ्यांच्या आयुष्याला कलाटणी देणाऱ्या या परीक्षा असतात म्हणूनच या परीक्षा विद्यार्थ्यांच्या जीवनात अतिशय महत्वाच्या असतात. दहावी - बारावीची बोर्ड परीक्षा म्हणजे






विद्यार्थी आणि पालकांसाठी कमालीचे टेन्शन. करियरच्या दृष्टीने आणि पुढील अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी बोर्ड परीक्षेच्या गुणांना खूप महत्व असते. त्यामुळे विद्यार्थी वर्षभर भरपूर अभ्यास करत असतात. पण प्रत्यक्ष जेंव्हा परीक्षा जवळ येते तेंव्हा मात्र विद्यार्थ्यांचे टेन्शन वाढते. ते साहजिकच असले तरी या काळात विद्यार्थ्यांनी टेन्शन फ्री राहणे महत्वाचे आहे कारण नकारात्मक विचार घेऊन जर विद्यार्थी परीक्षेला गेला तर त्याचा विपरीत परिणाम होऊन वर्षभर केलेल्या मेहनतीवर पाणी पडू शकते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी परीक्षा कालावधीत प्रसन्न रहावे. सतत अभ्यास करण्याऐवजी मध्येमध्ये ब्रेक घेऊन थोडा वेळ टीव्ही पाहणे, संगीत ऐकणे, लहान मुलांशी खेळणे, बाहेर फिरून येणे, मित्रांशी अभ्यासाव्यतिरिक्त इतरही विषयांशी चर्चा करणे, गप्पा मारणे, चित्र काढणे, आवडती पुस्तके वाचणे अशा गोष्टी कराव्यात. रात्री जागरण करणे टाळावे. विद्यार्थ्यांनी परीक्षा कालावधीत मोबाईलपासून दूरच राहावे. वेळेवर झोपून वेळेवर उठावे. अभ्यासाचा खूप ताण आल्यास विश्रांती घ्यावी. या काळात शक्यतो बाहेर खाणे टाळावे. घरी बनवलेले जेवण वेळेवर करावे. पालकांनीही याकाळात सकारात्मक राहावे. आपल्या पाल्यांवर अभ्यासासाठी दबाव आणू नये. त्याला सतत परीक्षेची आठवण करून देऊ नये. त्याच्याशी हसून खेळून प्रेमाणे वागावे. पालकांनी स्वतःही परीक्षेचे टेन्शन घेऊ नये आणि मुलांनाही देऊ नये. जर विद्यार्थी परिक्षेचे टेन्शन न घेता सकारात्मक विचार घेऊन परीक्षेला गेला तर यश निश्चित मिळेल. दहावी बारावीच्या परीक्षा आयुष्यातील महत्वाचा टप्पा असला तरी शेवटचा टप्पा नाही त्यामुळे टेन्शन फ्री राहा. मन शांत ठेवून प्रश्नपत्रिका सोडवा. यश नक्की मिळेल. सर्व विद्यार्थी मित्रांना या बोर्ड परीक्षांसाठी मनापासून शुभेच्छा! ऑल दि बेस्ट.....!!

समुपदेशन

## दुरावा दूर करावा

तीन वर्षांपूर्वी एका मुलाची भेट झाली. त्यावेळी माझं नुकतंच ब्रेक अप झालं होतं. या धक्क्यातून सावरण्यासाठी या मुलाशी मैत्री केली. तो खूप चांगला आहे. पण भावना व्यक्त करत नाही. या नात्याबद्दल काय वाटतं हे सांगत नाही. प्रत्येक परिस्थिती नीट हाताळतो. पण कशावरही प्रतिक्रिया देत नाही. यामुळे खूप अस्वस्थ होते. या नात्यात रस उरला नाही. मध्यंतरी ऑफिसमधल्या एका मुलाशी ओळख झाली. मला तो आवडतो. त्याला माझ्याबद्दल आणि या मित्राबद्दल माहीत आहे. या पार्श्वभूमीवर मी कोणत्या मित्राकडे भविष्यातला साथीदार म्हणून पाहू?



– तुमच्या दोघांमधला संवाद खुंटला आहे. यामुळे दुरावा निर्माण झाला आहे. तुझा हा मित्र प्रत्येक परिस्थिती सहज हाताळू शकतो. पण प्रत्येक वेळी इतकं सक्षम होण्याची गरज नाही, याची जाणीव त्याला दे. त्याने तुझ्याशी साधासरळ व्यवहार करावा, तुझ्या काही गोष्टी खटकल्या तर त्याची जाणीव करून द्यावी या अपेक्षा त्याला सांग. कदाचित त्याला तुला त्रास द्यायचा नसेल. मनावर ताण यावा, असं वागायचं नसेल. पूर्वी त्याने भावना कोणाकडे व्यक्त केल्या असतील. पण म्हणावा तसा प्रतिसाद मिळाला नसेल. त्यामुळे तो जपून पावलं टाकत असेल. सध्याच्या नकारात्मक परिस्थितीमुळे तुला ऑफिसमधला नवा मित्र भावत असावा. म्हणून तू मूळ मित्राशी संबंध सुधारलेस तर नव्या नात्यात रस वाटणार नाही.

खेचाखेची

## आपसातील मामला

एके दिवशी मध्यरात्री रामरावांची पत्नी उठली आणि अचानक मोठमोठ्याने ओरडायला लागली. या आवाजाने जाग्या झालेल्या रामरावांनी पत्नीला ओरडण्याचं कारण विचारलं तेव्हा ती म्हणाली, 'घरात चोर घुसले आहेत'.

**रामवराव** : मग त्यात इतकं ओरडण्यासारखं काय आहे? आपसातील मामला आहे, तुम्ही दोघं मिळून सोडवा. गाव का गोळा करताय?


वेगळं काही

समुद्रात ३३० फुट खोलवर 'हेयरी फ्रॉगफिश' या केसाळ माशाचं वास्तव्य आढळतं. तळाशी असणारी माती, दगड आणि वनस्पतींमध्ये तो लपून बसतो. इंडोनेशियातल्या इंडो–पॅसिफिक समुद्रात या जलचरांच्या अनेक प्रजाती पहायला मिळतात. हेयरी फ्रॉगफिशची लांबी एक ते पंधरा इंचांपर्यंत असते. त्यांच्या शरीरावर केसांप्रमाणे दिसणारे काटे असतात. त्यांना 'स्पिन्यूल' म्हटलं जातं. हे जलचर रंगही बदलतात. त्यामुळे ते पटकन ओळखता येत नाहीत. गरज असेल तरच हे मासे पोहतात अन्यथा निवांत पडून राहतात. त्यांच्या काही प्रजाती पाण्याने शरीर फुगवू शकतात. असं करून शत्रूला चकवण्याचा त्यांचा प्रयत्न असतो.


व्हा टेक सॅव्ही

## ठावठिकाणा कळू नये म्हणून...

सध्याच्या स्मार्टफोनच्या जमान्यात या तंत्रज्ञानाचे विविध लाभ दिसून येत आहेत. खरं तर स्मार्टफोनचं तुमच्या प्रत्येक हालचालीकडे लक्ष असतं. यातल्या लोकेशन फीचरमुळे तुमचा ठावठिकाणा कळतो. फोनमधली बरीच ॲप्स तुमचं 'रिअल टाईम लोकेशन' टिपत असतात. फोनमधलं लोकेशन ऑन ठेवल्याने 'गुगल मॅप' किंवा इतर सुविधा वापरता येत असल्या तरी आपली माहिती इतरांपर्यंत पोहोचू नये असं वाटत असेल तर 'लोकेशन फीचर' ऑफ करू शकता.



अँड्रॉइड फोनवर 'लोकेशन ऑफ' करण्यासाठी 'फोन सेटिंग्ज'मध्ये जाऊन गुगलवर टॅप करा. नंतर 'गुगल अकाउंट' मध्ये जा. 'डेटा अँड पर्सनलायजेशन' पर्याय निवडा. नंतर 'लोकेशन हिस्ट्री'वर टॅप करून 'स्वीच ऑफ' करा. या 'लोकेशन हिस्ट्री'खाली दिलेल्या 'डिलिट लोकेशन हिस्ट्री'वर टॅप करून हिस्ट्री डिलिट करून टाका. 'वेब अँड ॲप ॲक्टिव्हिटी' ऑफ करण्यासाठी कॉम्प्युटरच्या 'ॲक्टिव्हिटी कंट्रोल' पेजवर जा. गुगल अकाउंटमध्ये लॉग इन करावं लागेल. इथून 'वेब अँड ॲप ॲक्टिव्हिटी' ऑफ करता येईल. काही ॲप्स लोकेशनच्या परवानगीशिवाय नीट काम करत नाहीत. अशाच ॲप्सना लोकेशनची परवानगी द्या. सर्व ॲप्सना परवानगीची गरज नाही.




राशीभविष्य

- **मेष** : सहकार्य आणि चांगले संबंध यामुळे आर्थिक लाभ होईल. रेंगाळलेली कामं होतील. समाधानी रहाल.
- **वृषभ** : आपल्या बुद्धिमत्तेची, दूरदर्शीपणाची स्तुती होईल. कार्यक्षेत्राचा विस्तार होईल. पैसा हाती येईल.
- **मिथुन** : नोकरीत पदोन्नती मिळेल. स्थावर मालमत्तेपासून फायदा होईल. जुनी येणी वसुल होणार आहेत.
- **कर्क** : प्रभाव वाढल्याने शत्रू अस्वस्थ होतील. सर्व कामं वेळेत पूर्ण करुन घ्यावी. छंदात मन रमवू शकाल.
- **सिंह** : मुलांच्या भविष्याची चिंता राहील. वाडवडिलांचं मार्गदर्शन घ्यावं. अविचाराने गुंतवणूक करू नये.
- **कन्या** : आर्थिक कामकाज मध्यम स्वरुपाचं राहील. नवीन संबंध प्रस्थापित होतील. व्यवसायात प्रगती.
- **तूळ** : अडचणीतून मार्ग निघेल. कौटुंबिक जीवनात मतभेद टाळावे. कला–गुणांचा उत्तम विकास होईल.
- **वृश्चिक** : आपल्या प्रयत्नांमुळे स्थिती मजबूत होईल. आर्थिक फायदा मनासारखा होईल. सौख्य लाभेल.
- **धनु** : अपूर्ण राहिलेली कामं पूर्ण करुन घ्यावी. घरगुती वाद मिटणार आहे. स्थावर, वाहनसौख्य लाभेल.
- **मकर** : कुटुंबातली कटुता टाळावी. रचनात्मक कामाचं चांगलं फळ मिळेल. भागिदारीत लाभ होईल.
- **कुंभ** : कौटुंबिक तणाव वाढेल. अनोळखी व्यक्तींवर विश्वास ठेवू नये. नोकरीत वरिष्ठांची मर्जी राखावी.
- **मीन** : संपत्तीसंबंधी प्रश्न मार्गी लावावे लागतील. उत्साहवर्धक घटना घडतील. ज्येष्ठांचा सल्ला घ्यावा.

सल्ला मोलाचा

## पार्टीला जाताना...

अनेक कंपन्या आपल्या कर्मचारीवर्गासाठी पार्टीचं आयोजन करतात. तुम्हीही अशा पार्टीमध्ये सहभागी होणार असाल तर काही बाबी ध्यानात ठेवायला हव्या. ✻ वेळेवर जा – ऑफिसमधील पार्टीसाठी जात असाल तर उशिरा पोहोचू नका. पंधरा मिनिटांपेक्षा जास्त उशिरा पोहोचणं उद्धटपणाचं लक्षात समजलं जातं. ✻ पेहरावाचं भान ठेवा – पार्टीसाठी आवडता पेहराव परिधान करा पण पेहराव वातावरणाशी सुसंगत असेल याची काळजी घ्या. या दिवसात लो कट ड्रेस किंवा मिनी स्कर्ट शक्यतो टाळा. हिल्स घालणार असाल तर चार इंचापेक्षा जास्त उंच असणार नाहीत याची काळजी घ्या. ✻ शेरेबाजी करण्यापूर्वी विचार करा – मजेच्या मूडमध्ये असताना ऑफिसमधील सहकाऱ्यांसोबत मर्यादेपलिकडचे विनोद केले जातात. पण पार्टीमध्ये सहकाऱ्यांसोबत तुमचे वरिष्ठही असतात हे लक्षात ठेवा. कोणावर शेरेबाजी करण्यापूर्वी विचार करा. ✻ वरिष्ठांशी अदब पाळा – पार्टीमधला माहोल हलका–फुलका असतो. वरिष्ठही मित्रत्वाने वागत असतात. पण असं असलं तरी त्यांच्या पदाचा मान ठेवा. त्यांच्याशी बोलताना अदब ठेवा.

## २१ फेब्रुवारी

दिनविशेष

- **१९९९** : पन्नास वर्षांपासून बंद पडलेली दिल्ली–लाहोर बससेवा सुरू झाली.
- **२०१३** : शक्तिशाली बॉंबस्फोटांच्या मालिकेने हैदराबाद हादरले. दिलसुखनगरमध्ये ३ स्फोट. २० जण ठार तर ८० जखमी. काही जखमींची प्रकृती गंभीर असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता. मुंबईसह राज्यात हाय ॲलर्ट.
- **२०१८** : पीएनबी गैरव्यवहारातील मुख्य आरोपी नीरव मोदीची अलिबागमधील मालमत्ता सीबीआयकडून जप्त.

महत्त्वपूर्ण काही...

## तंत्रज्ञानतील संधी

पुढील काळात आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या क्षेत्रात नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध होणार आहे. अर्थात यासाठी तरूणांकडे काही कौशल्य असणं गरजेचं आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स तसंच तंत्रज्ञानाशी संबधित काही अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. ते पूर्ण करून तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात करीअर करता येईल. हे अभ्यासक्रम ऑनलाईन उपलब्ध आहेत.

✻ यासंदर्भात मशीन लर्निंगचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. ✻ स्टॅटिस्टिकल मशीन लर्निंग अभ्यासक्रमात इंटरमिडिएट स्टॅटिस्टिक्स आणि मशीन लर्निंगबाबत शिकवलं जातं. हा अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांकडे गणित, कॉम्प्युटर सायन्स आणि स्टॅटिस्टिक्सचं ज्ञान असणं गरजेचं असतं. ✻ इंट्रो टू आर्टिफिशियल इंटेलिजन्स या अभ्यासक्रमात कृत्रिम बुद्धीमत्तेची प्राथमिक माहिती दिली जाते. ✻ आर्टिफिशियल इंटेलिजन्स फॉर रोबोटिक्समध्ये रोबोटिक कारच्या प्रोग्रामिंगचं शिक्षण दिलं जातं. ✻ आर्टिफिशियल इंटेलिजन्स या अभ्यासक्रमात डाटा स्ट्रक्चर, गेम्स याबाबत माहिती दिली जाते.

पंचांग

**शुक्रवार, २१ फेब्रुवारी २०२५**
क्रोधीनाम संवत्सर, शके १९४६,
माघ कृ. ०८, नक्षत्र : अनुराधा,
चंद्रराशी : वृश्चिक, व्याघात योग,
सूर्योदय : ७.०५, सूर्यास्त : ६.३९

फॉरवर्डस


प्रेमातली उत्कटता, ओढ आणि आर्तता कशी असते पहा...

**जिंदगी रही तो हर दिन**
**तुम्हे याद करते रहेंगे,**
**भूल गया तो समझ लेना**
**खुदा ने हमें याद कर लिया**

आरोग्यमंत्र

## नको चहा–कॉफीचा अतिरेक

आपल्याकडे चहाच्या शौकीनांची संख्या कमी नाही. विशिष्ट वेळी चहा घेतल्याशिवाय चालतच नाही, असंही अनेकांचं मत असतं. काही जणांना दर दोन–तीन तासांनी अशी दिवसात किमान तीन–चारदा चहा वा कॉफी पिण्याची गरज वाटते. निवांतपणी टीव्ही पाहताना, आवडीची मालिका किंवा चित्रपट पाहताना, सहज काही तोंडात टाकल्यावर, राग आला तर, मनाविरुद्ध काही घडलं तर, तणाव असला तर अशी कारणं शोधूनही काही जण चहा–कॉफी घेताना दिसतात. ही दोन्ही पेयं आरोग्यासाठी किती चांगली किंवा वाईट याविषयी उलटसुलटं निष्कर्ष असलेली संशोधनं वेळोवेळी छापून येत असली तरी चहा–कॉफीचा अतिरेक वाईटच. त्यामुळे ॲसिडिटीचा त्रास होतो आणि त्यापाठोपाठ इतर आजारांनाही ती आमंत्रण देतात.



मधुमेहासारख्या आजारात तर साखर न घालताच चहा–कॉफी घेण्याचा सल्ला आवर्जून दिला जातो. मात्र सर्वसामान्यांनीही दिवसात दोन छोटे कप चहा किंवा कॉफी पिणं भरपूर असतं हे लक्षात घेतलं पाहिजे. त्यानुसार चहा–कॉफीचं प्रमाण शक्य तितकं कमी करत आणलं पाहिजे. कारण चहा–कॉफी ही गरज नव्हे; सर्जनशीलतेला चालना देणारी शक्ती नव्हे तर ते आरोग्याला घातक व्यसन आहे. या पदार्थांमधील टॅनिन आणि कॅफेन या द्रव्यांचे परिणाम उत्तेजक असले तरी ते आरोग्यदायी नाहीत. त्यामुळे चहाचे शौकीन असाल तर या साऱ्या बाबींचा विचार करायला हवा.

वाचा तर खरं

✻ आपल्याच शहरात वेगळी आणि हटके ठिकाणं असतात. म्हणूनच भटकंतीसाठी गावाबाहेरची लेणी, बाग, राष्ट्रीय उद्यानाची निवड करता येईल. शहरातल्या रस्त्यांवर गाडीतून फिरता येईल. नेहमीचे, ओळखीचे रस्ते वेगळ्या नजरेने टिपता येतील. ✻ स्ट्रीट फूडची चव चाखता येईल. रस्त्यावर उभं राहून मस्तपैकी पाणीपुरी, रंगीबेरंगी गोळ्याचा आस्वाद घेता येईल. तुमच्या शहरातल्या प्रसिद्ध खाऊगल्लीची सफर करत जुन्या आठवणी जागवता येतील. कट्ट्यावर बसून बुढ्ढी के बाल खाता येतील. स्वस्तात मस्त असं बरंच काही करता येईल.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

## At a Glance

### छावाने ओलांडला २०० कोटींचा टप्पा

**मुंबई :** विकी कौशल, रश्मिका मंदान्ना आणि अक्षय खन्ना यांच्या भूमिका असलेला ऐतिहासिक विषयावरील 'छावा' या चित्रपटानं छत्रपती शिवाजी जयंती दिनी एक नवा विक्रम रचला आहे. 'छावा' आता अधिकृतपणे २०० कोटींच्या क्लबमध्ये सामील झाला आहे. हा चित्रपट २०२५ मधील २०० कोटी रुपयांचा टप्पा ओलांडणारा पहिला आणि सर्वात वेगवान चित्रपट ठरला आहे.

### रायगड तालुक्यात भूकंपाचे धक्के

**रायगड :** पेण तालुक्यातील हेटवणे धरणापासून काही अंतरावर असणाऱ्या तिलोर आणि महागाव परिसरात काल (बुधवारी) रात्रीपासून भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले. बुधवारी रात्री १० वाजण्याच्या सुमारास पहिला धक्का जाणवला. त्यानंतरही काही सौम्य धक्के जाणवल्याचं स्थानिकांनी माहिती दिली. भूकंपाचे धक्के जाणवले तेव्हा अनेक घरातील भांडी जमिनीवर पडली.

### श्री गजानन महाराजांचा प्रकटदिन थाटामाटात

**बुलढाणा :** विदर्भातील प्रति पंढरपूर म्हणून ओळख असलेल्या 'श्री संत गजानन' महाराजांच्या शेगावात आज गजानन महाराजांचा १४७ वा प्रगट दिन सोहळा मोठ्या थाटामाटा साजरा केला जात आहे. यासाठी मोठ्या संख्येत भाविक शेगाव नगरीमध्ये दाखल झाले आहेत. तर संपूर्ण राज्यभरातून तब्बल १००१ दिंड्या शेगावात दाखल झाल्या आहेत.

# ओटीटीसाठी केंद्राची नियमावली सादर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**नवी दिल्ली :** पॉडकास्टर रणवीर अलाहाबादियाने एका ऑनलाइन कॉमेडी शोमध्ये केलेल्या "अश्लील" वक्तव्यावरून वाद निर्माण झाल्यानंतर काही दिवसांनी केंद्र सरकारने ओटीटीसाठी नियमावली सादर केली आहे. ओटीटी (ओव्हर-द-टॉप) मीडिया प्लॅटफॉर्मना कंटेंटचे वय-आधारित वर्गीकरण करण्यास आणि स्वयं-नियमन (चेतावणी देण्याबाबत) सुनिश्चित करण्याचे आदेश देण्यात आले आहे.

माहिती आणि तंत्रज्ञान विषयक संसदीय स्थायी समितीने माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू उपस्थित असलेल्या बैठकीत अलाहबादिया भोवतीचा मुद्दा उपस्थित केला होता. १९ फेब्रुवारी रोजी जारी केलेल्या एका निवेदनात, मंत्रालयाने सोशल मीडिया चॅनेल्स आणि ओटीटी प्लॅटफॉर्मना आयटी नियम २०२१ मध्ये नमूद केलेल्या आचारसंहितेचे पालन करण्यास आणि मुलांना अनुचित सामग्री वापरण्यापासून रोखण्यासाठी "ए-रेटेड सामग्रीसाठी प्रवेश नियंत्रण" लागू करण्यास सांगितले.

अधिसूचनेत म्हटले आहे की "ओटीटी प्लॅटफॉर्म आणि सोशल मीडियाच्या काही प्रकाशकांकडून अश्लील कंटेंट पसरवल्याबद्दल तक्रारी आल्या आहेत". सरकारने यावर भर दिला की कायद्यानुसार ओटीटी प्लॅटफॉर्म्सने "कायद्याने प्रतिबंधित असलेली कोणताही कंटेंट प्रसारित करू नये (आणि) कंटेटचं वय-आधारित वर्गीकरण करावे".

"पुढे, नियमांमध्ये अशी तरतूद आहे की ओटीटी प्लॅटफॉर्मच्या स्वयं-नियामक संस्था देखरेख करतील आणि ओटीटी प्लॅटफॉर्मद्वारे आचारसंहितेचे संरेखन आणि पालन सुनिश्चित करतील", असे अधिसूचनेत म्हटले आहे. त्यात "महिला अश्लील प्रतिनिधित्व कायदा, १९८६, भारतीय न्याय संहिता (बीएनएस), २०२३, लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण (पोस्को) कायदा आणि माहिती तंत्रज्ञान (आयटी) कायदा, २००० च्या तरतुदींचा उल्लेख केला आहे, ज्यामध्ये अश्लील/अश्लील सामग्रीचे प्रकाशन हा दंडनीय गुन्हा आहे".

अलाहाबादियाविरुद्ध दाखल केलेल्या पोलिस खटल्यांना एकत्र करण्याच्या याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने केलेल्या तीव्र निरीक्षणांनंतर हे आदेश देण्यात आले. इंडियाज गॉट लेटेंट दरम्यान केलेल्या टिप्पण्यांबद्दल न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती एन. कोटिश्वर सिंह यांच्या खंडपीठाने अलाहाबादियावर कडक टीका केली आणि केंद्राला ऑनलाइन अश्लील कंटेट नियंत्रित करण्यासाठी पावले उचलण्याबाबत विचारणा केली. केंद्राला न्यायालयाने विचारलेल्या प्रश्नांनंतर, संसदीय समितीने इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाला अशा प्रकरणांना हाताळण्यासाठी ऑनलाइन प्लॅटफॉर्मना कायदेशीर तपासणीखाली आणण्यासाठी आवश्यक असलेल्या सुधारणा सुचवण्यास सांगितले.


### मंत्रालयाला विशेष पत्र

● भाजपा खासदार निशिकांत दुबे यांच्या अध्यक्षतेखालील माहिती तंत्रज्ञानावरील स्थायी समितीने या मुद्द्यावर मंत्रालयाचे सचिव एस. कृष्णन यांना पत्र लिहिले. "डिजिटल आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्मच्या गैरवापराच्या वरील आणि वाढत्या घटना लक्षात घेता, इलेक्ट्रॉनिक्स आणि आयटी मंत्रालयाला विनंती आहे की त्यांनी अशा प्रकरणांना हाताळण्यासाठी विद्यमान कायद्यांच्या प्रभावीतेबद्दल आणि अशा प्लॅटफॉर्मना कायदेशीर तपासणीखाली आणण्यासाठी विद्यमान कायदे/आयटी कायदा, २००० मध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता यावर या समितीला एक संक्षिप्त नोंद पाठवावी," असे पत्रात म्हटले आहे.

# अमेरिकेचा भारतातील निवडणुकात हस्तक्षेप

## भाजपचा काँग्रेसवर कडाडून हल्ला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



राजकारण

**नवी दिल्ली :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी बायडन प्रशासनावर भारतीय निवडणुकांमध्ये हस्तक्षेप केल्याचा आरोप करून मोठा वाद निर्माण केला आहे. या आरोपांनंतर आता भाजपने राहुल गांधी यांच्यावर निशाणा साधला आहे. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांच्या ताज्या वक्तव्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर केलेल्या दाव्याला पुष्टी मिळाली असून त्यांना सत्तेत येण्यापासून रोखण्यासाठी काही परकीय शक्तींकडून प्रयत्न केले जात आहेत, असे भाजपने म्हटले आहे. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांच्या वक्तव्यानंतर भाजपचे आयटी विभागप्रमुख अमित मालवीय यांनी काँग्रेसवर जोरदार हल्ला चढवला आहे.

काँग्रेस नेते राहुल गांधी हे जागतिक नेटवर्कशी हातमिळवणी करून भारताचे सामरिक आणि राजकीय हित संबंध बिघडवत आहेत. तो परदेशी एजन्सीजसाठी एक साधन म्हणून काम करत आहे. मालवीय पुढे म्हणाले की, पंतप्रधान मोदी यांनी २०२४ च्या लोकसभा निवडणुकीदरम्यान निवडणुकांमध्ये परदेशी शक्तींच्या हस्तक्षेपाविरोधात एकदा नव्हे तर अनेकदा इशारा दिला होता.

आता अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय निवडणुकांवर प्रभाव पाडण्यासाठी आणि पंतप्रधान मोदींना सत्तेत येण्यापासून रोखण्यासाठी खऱ्या अर्थाने प्रयत्न करण्यात आल्याची पुष्टी केली आहे. काँग्रेसवर टीका करताना मालवीय म्हणाले की, २०२४ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी राहुल गांधी मार्च २०२३ मध्ये लंडनमध्ये होते. भारताच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप करण्यासाठी ते अमेरिकेपासून युरोपपर्यंतच्या परकीय शक्तींना विनवणी करत होते, असे ते म्हणाले.

तत्पूर्वी, मियामीयेथे एका कार्यक्रमाला संबोधित करताना ट्रम्प यांनी मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी भारताला देण्यात येणारा दोन कोटी डॉलरचा निधी रद्द करण्याच्या निर्णयाचा बचाव केला. ट्रम्प यांच्या 'यूएसएआयडी'च्या निधीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करताना ते म्हणाले, 'भारताच्या मतदानासाठी २१ दशलक्ष डॉलर खर्च करण्याची गरज का आहे? मला वाटते की जो बायडेन यांना निवडणूक जिंकण्याची इच्छा होती. हे आपल्याला भारत सरकारला सांगावे लागेल. हा मोठा मुद्दा आहे. याआधी मंगळवारी ट्रम्प म्हणाले होते की, आजच्या काळात भारत स्वत: खूप सक्षम आहे आणि भारताकडे पैशांची कमतरता नाही. अशा परिस्थितीत भारताला निधी देण्याची गरज नाही, असेही ते म्हणाले.

# मी धक्कापुरुष झालोय: उद्धव ठाकरे

## मतदारसघातील कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांशी मातोश्रीवर संवाद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** काही दिवसांपूर्वी कोकणातील शिलेदार राजन साळवी यांनी उद्धव ठाकरेंची साथ सोडून एकनाथ शिंदेंना समर्थन दिलं. त्यानंतर कोकणातील अनेक कार्यकर्ते आणि पदाधिकारीही उद्धव ठाकरेंना सोडून गेले. उद्धव ठाकरे गटातील अनेक नेते सातत्याने पक्षाला रामराम ठोकून जात असल्याने उद्धव ठाकरेंना धक्क्यांवर धक्के बसत आहेत. अशा धक्क्यांमुळे मी आता धक्कापुरुष झालोय, असं उद्धव ठाकरे म्हणालेत. कलीना मतदारसघातील कार्यकर्ते आणि पदाधिकारी आज मातोश्रीवर जमले होते. त्यावेळी ते बोलत होते.

उद्धव ठाकरे म्हणाले, माझी जपानसारखी परिस्थिती झाली आहे. जपानमध्ये असं म्हणतात की एखाद्या दिवशी भूकंपाचा धक्का बसला नाही की त्यांना आश्चर्य वाटतं. उद्धव ठाकरेंना एवढे धक्क्यावर धके बसले आहेत की मी आता धक्कापुरुष झालोय. कोण किती धक्के देतंय ते पाहूयात. आपण असा धक्का देऊया पुन्हा हे दिसता कामा नये.

ते म्हणाले, एखादा निर्णय घेतल्यावर नाराजी असतेच. पण सैनिक म्हटल्यावर शिस्त आली पाहिजे. लढाई एकट्या दुकट्याची नाही ही लढाई आपली आहे. सगळ्यांनी छावा सिनेमा आवर्जून बघा. जे जे लोक बाहेर येतात ते डोळे पुसत बाहेर येत आहेत. डोळे उघडून सर्वांनी हा पिक्चर बघा, असेही ते म्हणाले.

> संघटनात्मक बांधणी करण्याचे आताचे दिवस आहेत. सुप्रीम कोर्टातील निकाल लागण्याची शक्यता आहे. २७७ किंवा २३६ चा निकाल लागेल. मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुका एप्रिल-मे मध्ये लागण्याची दाट शक्यता आहे. मग सर्वांना दिलेले ती काम सर्वांनी करा. शाखेनुसार काम करा. विधानसभेत जो अनुभव आला तो अनुभव लक्षात घेता जी चूक झाली ती आता चूक होणार नाही"
> — उद्धव ठाकरे

# महाराष्ट्रातील शासकीय नोकरदारांच्या संख्येत घट

**मुंबई :** मागच्या काही दशकांपासून महाराष्ट्र राज्य शासनातील नोकरदारांची संख्या कमालीची घटली असून अल्पसंख्याक समुदायातील कर्मचाऱ्यांचीही संख्या रोडावली आहे. त्यामुळे नोकरवर्गातील वैविध्य कमी झाल्याचे सांगितले जात आहे. तर विविध सामाजिक घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आखलेल्या धोरणांमुळे २०१५ ते २०२३ या काळात आरक्षित गटातील कर्चमाऱ्यांची संख्या ६८.४ वरून वाढून ७१.१ टक्क्यावर पोहोचली आहे. तर ख्रिश्चन, मुस्लीम आणि जैन या अल्पसंख्याक समुदायातील कर्मचाऱ्यांची संख्या या काळात ४.७४ टक्क्यावरून ४.०८ टक्क्यावर आली आहे.

महाराष्ट्र सरकारच्या अर्थ व सांख्यिकी संचालनालयाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार २०१५ ते २०२३ या काळात महाराष्ट्र सरकारमध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या ५.७१ लाखांवरून कमी होऊन ४.७८ लाखावर आली आहे. राज्य सरकारच्या एकूण जागा ७.२४ लाख इतक्या आहेत. याचा अर्थ राज्य सरकारकडे सध्या ३४ टक्के जागा रिक्त आहेत. प्रति लाख लोकसंख्येमागे ५७० पदे मंजूर असताना सध्या प्रति लाख लोकसंख्येमागे फक्त ३७७ कर्मचारी काम करत आहेत.

सरकारमधील सूत्रांचे म्हणणे आहे की, कर्मचाऱ्यांचे वेतन आणि पेन्शन यांचा खर्च जास्त असल्याने राज्याच्या ६.१५ लाख कोटी अर्थसंकल्पापैकी जवळपास ३५ टक्के निधी यावरच खर्च करावा लागतो. त्यामुळेच गेल्या काही वर्षांपासून राज्य सरकारने टप्प्याटप्प्याने कर्मचारी कपात करण्याचे धोरण अवलंबले.

राज्य सरकारच्या एकूण कर्मचारी संख्येत घट झाली असली तरी उपेक्षित घटकांना नोकरीत स्थान दिल्यामुळे त्या वर्गाची संख्या वाढली आहे. ज्यामध्ये महिला, अनुसूचित जाती आणि जमाती, भटक्या जमाती, विशेष मागासवर्ग आणि इतर मागासवर्गाचा समावेश आहे. राज्य सरकारच्या नोकऱ्यांमध्ये महिला वर्गाचे प्रतिनिधित्व २०१३ साली १८.३२ टक्के होते, ते वाढून आता २०२३ साली २३.४७ टक्के झाले आहे.


### पुण्यामध्ये संपन्न होणार विधिलिखित ज्योतिष त्रिदशकोत्तर सोहळा'

**पुणे, दि. १८ फेब्रुवारी :** सुप्रसिद्ध विधिलिखित ज्योतिष कार्यालयाचे संचालक **श्री. आदिनाथ मच्छिंद्र साळवी** आणि ॲडव्होकेट **सौ. वैशाली आदिनाथ साळवी** यांच्या वतीने **विधिलिखित ज्योतिष त्रिदशकोत्तर सोहळा – २०२५** आयोजित केला जाणार असून हा सोहळा दिनांक २२ ते २४ फेब्रुवारी २०२५ दरम्यान म्हात्रे पूलाजवळ असलेल्या डी. पी. रोड येथील गोल्डन लिफ बँक्वेट्स लॉन्स येथे पार पडेल अशी माहिती या सोहळ्याचे कार्याध्यक्ष **डॉ. दत्तप्रसाद चव्हाण** यांनी दिली.

या आगळ्या वेगळ्या सोहळ्याचे उदघाटन महाभारतातील **'भीष्माचार्यांची भूमिका** साकारलेले **मुकेश खन्ना** यांच्या हस्ते शनिवार, दिनांक २२ फेब्रवारी रोजी सकाळी १०:०० वाजता होणार आहे. दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमासाठी महाभारतामध्ये **अर्जुनाची भूमिका** केलेले **फिरोज खान** यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे तर दिनांक २४ फेब्रुवारी रोजी समारोपाच्या सोहळ्यास महाभारतातील **कृष्णाच्या भूमिकेमुळे** घराघरांत पोचलेले **नितीश भारद्वाज** हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असणार आहेत. या शिवाय अनेक मान्यवर या तीन दिवसीय सोहळ्यामध्ये उपस्थित असणार आहेत.

या कार्यक्रमा दरम्यान संपूर्ण भारतभरातील ३३ नामवंत वक्त्यांचे मार्गदर्शन उपस्थितांना लाभणार आहे. या सोहळ्या दरम्यान मरणोत्तर विधिलिखित ज्योतिष महर्षी पुरस्कार आणि विधिलिखित ज्योतिष महर्षी पुरस्कार उपस्थित सन्माननीय मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहेत. तसेच कै. मच्छिंद्र नामदेव साळवी स्मृती निबंध स्पर्धेचे बक्षीस वितरण **श्रीमती रंगुबाई मच्छिंद्र साळवी** यांच्या शुभहस्ते करण्यात येणार आहे.

हा सोहळा ज्योतिष शास्त्राचे अभ्यासक, जाणकार व रसिकांसाठी एक सुवर्णसंधी ठरणार आहे.


पान १ वरून

### एमआयडीसीतून जाणार महामार्गांचे रस्ते

दीर्घकालीन उपाययोजना करण्याच्या दिशेने पाऊल टाकले आहे. पीएमआरडीएचे आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी औद्योगिक क्षेत्रांना राष्ट्रीय आणि राज्य महामार्गांशी जोडण्याचा प्रस्ताव मांडला आहे. यात हिंजवडी आयटी पार्क, रांजणगाव औद्योगिक क्षेत्र आणि पिरंगुट औद्योगिक क्षेत्राचा समावेश आहे. या तिन्ही औद्योगिक क्षेत्रांमध्ये महामार्गांशी थेट जोडणारे विविध रस्ते प्रस्तावित केले आहेत.

### 23 फेब्रुवारीला पूनावाला ब्रिडर्स...

विविध बंपर पारितोषिके यावेळी जाहीर करण्यात येतील आणि पहिल्या चार क्रमांकांना नामांकित करण्यात येईल. पहिल्या पाच हजार प्रवेश पत्रिका विनामूल्य असतील तर पहिल्या इंक्लोजर मध्ये प्रत्येक कार्यकर्त्याला मोफत रिफ्रेशमेंट कुपन दिले जाईल. असे देखील जाहीर करण्यात आले आहे.

### रेखा गुप्ता यांचा शपथविधी उत्साहात

प्रत्येक क्षण त्यांच्या सेवेसाठी समर्पित असेल, असे त्या म्हणाल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपच्या वरिष्ठ नेतृत्वाने दिल्लीतील जनतेच्या आकांक्षा पूर्ण करण्याची जबाबदारी माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्यावर सोपवली आहे. ते पूर्ण करण्यासाठी मी अहोरात्र मेहनत घेईन. विकसित दिल्लीचा संकल्प प्रत्यक्षात आणण्यासाठी मी माझ्या मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांसह सर्वतोपरी प्रयत्न करेन, असे त्या म्हणाल्या.

रेखा गुप्ता म्हणाल्या, आज आम्ही सचिवालयात आलो आहोत आणि मुख्यमंत्री कार्यालयात पदभार स्वीकारला आहे. आज संध्याकाळी मंत्रिमंडळाची बैठक पार पडली आहे. विकसित दिल्लीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी सातत्याने काम केले जाईल. एकही दिवस वाया जाणार नाही. दिल्लीला दिलेले प्रत्येक आश्वासन आम्ही पूर्ण करू, असेही त्या म्हणाले.


दिल्लीचे मुख्यमंत्री

ब्रह्मप्रकाश हे दिल्लीचे पहिले मुख्यमंत्री होते. काँग्रेसचे ब्रह्मप्रकाश १९५२ ते १९५५ या काळात मुख्यमंत्री होते. त्यानंतर गुरमुख निहाल सिंग यांचा क्रमांक लागला. १९५५ ते १९५६ या काळात त्यांनी सिंहासनाची धुरा सांभाळली. १९९३ मध्ये भारतीय जनता पक्षाने विजय मिळवला. त्यावेळी पक्षाला तीन वेळा मुख्यमंत्री बदलावा लागला होता. आधी मदनलाल खुराना, नंतर साहिब सिंह वर्मा आणि शेवटी सुषमा स्वराज यांना मुख्यमंत्री करण्यात आले. या काळात भाजपने पहिली महिला मुख्यमंत्री दिली. त्यानंतर, काँग्रेसने भाजपचा पराभव केला शीला दीक्षित यांना मुख्यमंत्री केले. शीला दीक्षित या तीन वेळा मुख्यमंत्री होत्या. काँग्रेसवर भ्रष्टाचाराचे आरोप करत आम आदमी पार्टीचे अरविंद केजरीवाल यांनी दिल्लीची तख्त जिंकले. अरविंद केजरीवाल हे दोन वेळा मुख्यमंत्री झाले. त्यांच्यावर झालेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे त्यांना पद सोडावे लागले. त्यांनी आतिशी यांना मुख्यमंत्री केले. भाजपने आपचा पराभव करत पुन्हा एकदा दिल्लीत सरकार स्थापन केले आहे.

### दहावीची परिक्षा ...

असून राज्यातील ७०१ केंद्रांतील संपूर्ण स्टाफ बदलण्यात आला आहे. त्यामध्ये पुणे १३९, नाशिक ९३, नागपूर ८६, मुंबई १८, कोल्हापूर ५४, लातूर ५९ या विभागाचा समावेश करण्यात आला आहे. तर राज्यातील परीक्षा केंद्रावर जिल्हा प्रशासनामार्फत ड्रोन कॅमेराव्दारे निगराणी राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# शाहरुख खानवर आली भाड्याने घर घेण्याची वेळ?



**मुंबई :** बॉलीवुडचा बादशाह शाहरुख खान मुंबईतील एका भागात एक अपार्टमेंट भाड्याने घेतलं आहे. परंतु शाहरुख खानने नक्की घर भाड्याने का घेतलं? याच्या चर्चा सोशल मीडियावर रंगत आहेत.

त्याने घेतलेला अपार्टमेंट हे मुंबईतील प्रसिद्ध एरिया पाली हिलमधील आहे. या बिल्डिंगचे मालक हक भगनानी परिवार आहे. माहितीनुसार शाहरुखने हे अपार्टमेंट रकुलप्रीत सिंह याच्या पती जैकी भगनानी यांच्याकडून भाड्याने घेतलं आहे. या फ्लॅटचं महिन्याच भाडं हे 11.54 लाख रुपये आहे. तर दुसऱ्या फ्लॅटचं भाडं 12.61 लाख रुपये इतकं आहे.

दोन्ही फ्लॅट मिळून शाहरुखने दर महिन्याला 24.15 लाख रुपये भाडं देणार आहे. वर्षभरात जवळपास 2.9 कोटी रुपेय शाहरुख या घरांसाठी भाडं देणार आहे. हे दोन्ही घरं तीन वर्षांसाठी घेण्यात आले आहेत. यासाठी 8.67 करोड रुपयांचं डिपॉजिटपण भरण्यात आलं आहे.

एका अपार्टमेंटचा सिक्युरिटी डिपॉजिट 32.97 लाख इतका आहे. तर दुसऱ्या फ्लॅटचं डिपॉजिट 36 लाख रुपये आहे. 14 फेब्रुवारीला शाहरुखने घर भाड्याने घेतले आहे. यासाठी त्याने 2.22 लाख रुपयांची स्टॅम्प ड्युटी भरली आहे.


### चौकशीची जाहीर नोटीस

जावक क्रमांक/६३७/२०२५
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,पुणे
सार्वजनिक न्यास नोंदणी
कार्यालय, पुणे, मंगलदास पोलीस चौकी
मागे, ४५/२ कै. बी. एस. ढोले पाटील मार्ग, वाडीया
कॉलेजसमोर, पुणे

एस. आर. एन. क्रमांक: PUN / 35056/18/24
फेरफार अहवाल /अर्ज क्रमांक. 1046/2024
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक जीव मंडल निता फाउन्डेशन बाबत |
न्यासाचा पत्ता :- हरी निवास, गायकवाड निवास,, पुणे, पुणे शहर, पुणे शहर
अर्जदार - मोनिका बुद्धिमान चेत्री,
सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, पुणे, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, 1950 चे कलम 19 अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:-
(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील | अंदाचे मुल्य |
|---|---|---|
| 1. | By Cash | ५०००.०० |

(अ) जंगम मिळकत :- रोख रु.5000/- मात्र
( अक्षरी रुपये पाच हजार मात्र फक्त)

| अ.क्र. | शहर किंवा गांव | सी.एस. किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्रमांक | क्षेत्र | मूल्यांकन | मूदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.00 |

(ब) स्थावर मिळकत :- रोख रु. 0/- मात्र
( अक्षरी रुपये मात्र फक्त)
सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी
कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे (. समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.
ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक 29-01-2025 रोजी दिली |
प्रत:- 1. उपरोल्लेखीत मालमत्तेवर डकविणेसाठी.
2. न्यासाचे कार्यालयावर डकविणेसाठी
3. स्थानिक दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीसाठी.
4. या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर डकविणेसाठी.
5. (इतर असल्यास उल्लेख करावा..)
{टिपः आवश्यक / तेथे खुण करावी}

शिक्का

**अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय**
**पुणे**

### चौकशीची जाहीर नोटीस

जावक क्रमांक/६३६/२०२५
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,पुणे
सार्वजनिक न्यास नोंदणी
कार्यालय, पुणे, मंगलदास पोलीस चौकी
मागे ४५/२ कै. बी. एस. ढोले पाटील मार्ग, वाडीया
कॉलेजसमोर, पुणे

एस. आर. एन. क्रमांक: PUN / 24804/18/24
फेरफार अहवाल / अर्ज क्रमांक. 854/24
सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक तमन्ना एज्युकेशन अँड सोशल वेलफेअर फाऊंडेशन बाबत | न्यासाचा पत्ता :- प्लाट नं. 16, फेस 2, हीन्जेवदी पुणे, पुणे, पुणे शहर, पुणे शहर-
अर्जदार : प्रभाकर विठ्ठल शेट्टी,
सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, पुणे, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, 1950 चे कलम 19 अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:-
(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील | अंदाचे मुल्य |
|---|---|---|
| 1. | By Cash | ५०००.०० |

(अ) जंगम मिळकत :- रोख रु.5000/- मात्र
( अक्षरी रुपये पाच हजार मात्र फक्त)

**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | शहर किंवा गांव | सी.एस. किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्रमांक | क्षेत्र | मूल्यांकन | मूदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.00 |

(ब) स्थावर मिळकत :- रोख रु. 0/- मात्र
( अक्षरी रुपये मात्र फक्त)
सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.
ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक 22-01-2025 रोजी दिली.
प्रत:-
1. उपरोल्लेखीत मालमत्तेवर डकविणेसाठी.
2. न्यासाचे कार्यालयावर डकविणेसाठी
3. स्थानिक दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीसाठी.
4. या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर डकविणेसाठी.
5. (इतर असल्यास उल्लेख करावा..)
{टिपः आवश्यक √ तेथे खुण करावी}

शिक्का

**अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय**
**पुणे**



नळ स्टॉप मधील एसएनडीटी कॉलेजच्या समोरील बस स्टॉप जवळ अनअधिकृत फूड मॉल उभारण्यात आला होता . त्याच्यावर आज अतिक्रमण विभागाने कारवाई केली.

## तोपर्यंत कलम ३७० परत आणणे शक्य नाही

**नवी दिल्ली :** जोपर्यंत केंद्रात नरेंद्र मोदी सत्तेत आहेत तोपर्यंत जम्मू-काश्मीरमध्ये कलम ३७० परत आणता शक्यता नाही, असे जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी म्हटलं आहे. मुख्यमंत्रीपदाची सूत्रे ओमर अब्दुल्ला यांनी स्वीकारल्यानंतर त्यांचे केंद्र सरकारशी असलेले संबंध अधिक जवळचे झाल्याचे मानले जाते आहे. मात्र केंद्र सरकारने दिलेली आश्वासने पूर्ण केली नाहीत तर त्यांचे सरकार केंद्रासोबतच्या संबंधांचे पुनर्मूल्यांकन करू शकते, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. एका मुलाखतीत त्यांना प्रश्न विचारण्यात आला की, नरेंद्र मोदी भारताचे पंतप्रधान आहेत तोपर्यंत जम्मू आणि काश्मीरमध्ये कलम ३७० पुनर्संचयित होण्याची शक्यता आहे का? यावर त्यांनी उत्तर दिले की, जोपर्यंत दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार आहे तेपर्यंत जम्मू-काश्मीरला विशेषाधिकार देणारे कलम ३७० पुनर्संचयित केले जाणार नाही.



शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने आयोजित स्वराज्यरथ उत्सवात पहिल्यांदाच सहभागी झालेला अंजिक्यतारावीर किल्लेदार मानाजीराव साबळे यांचा रथ आकर्षणाचा केंद्र ठरला. स्वत: छत्रपती खा. उदयनराजे भोसले यांनी स्वराज्यरथाचे उद्‌घाटन केले.

## माणिकराव कोकाटे यांना न्यायालयाचा दणका

**नाशिक :** राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांना न्यायालयाने मोठा दणका दिलाय. माणिकराव कोकाटे आणि त्यांचे भाऊ सुनील कोकाटे यांना नाशिक जिल्हा न्यायालयाने २ वर्षांची शिक्षा ठोठावली आहे. माणिकराव कोकाटे यांना २ र्षांचा कारावास आणि ५० हजारांच्या दंडाची शिक्षा न्यायालयाने सुनावली आहे. १९९५ साली कागदपत्रांच्या फेरफार आणि फसवणूक केल्याचा आरोप माणिकराव कोकाटे यांच्यावर केला होता. माजी मंत्री तुकाराम दिघोळे यांनी या प्रकरणी याचिका दाखल केली होती. आता नाशिक जिल्हा न्यायालयाने माणिकराव कोकाटे यांना शिक्षा ठोठावली आहे. त्यांच्या विरोधात माजी मंत्री तुकाराम दिघोळे यांनी याचिका दाखल केली होती. यात त्यांनी माणिकराव कोकाटे यांच्यावर १९९५ साली कागदपत्रांची फेरफार आणि फसवणूक केल्याचा आरोप केला होता.



शिवजन्मोत्सव सोहळ्यामध्ये गडावर भाषण करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घातलेली ही पगडी आणि आवेश पूर्ण भाषण याचा फोटो आज मोस्ट ट्रेंडिंग फोटोग्राफ होता.

## लोकपालच्या आदेशाला सर्वोच्च स्थगिती

**नवी दिल्ली :** लोकपालने उच्च न्यायालयाच्या विद्यमान न्यायाधीशांविरुद्धच्या तक्रारीची सुनावणी करणे ही एक अतिशय त्रासदायक बाब आहे, असे स्पष्ट करत लोकपालच्या आदेशाला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली. तसेच या मुद्द्यावर केंद्र सरकारला नोटीस बजावली आहे. उच्च न्यायालयाच्या एका विद्यमान न्यायाधीशाविरुद्धच्या तक्रारीची लोकपालांनी सुनावणी केली. या प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून दखल घेतली. उच्च न्यायालयाचे न्यायाधीश भारताच्या लोकपालाच्या अधिकारक्षेत्रात येतात की नाही या मुद्द्यावर सुनावणी केली. यावेळी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती बी. आर. गवई, न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती अभय ओक यांच्या खंडपीठाने खंडपीठाने उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांविरुद्धच्या तक्रारीची सुनावणी लोकपाल करत असल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. तसेच ही एक अत्यंत त्रासदायक बाब असल्याचे म्हटले आहे.

# साखरेचे दर आणखी कडाडणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मागील एका महिन्यात भारतातील साखरेच्या किंमतीत ६.५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. खराब हवामान आणि साखर निर्यातीमुळे साखरेचा तुटवडा निर्माण झाला आहे. त्यामुळे साखरेच्या किंमतीत आणखी वाढण्याची शक्यता आहे. साखर हा सर्वसामान्यांच्या दैनंदिन जीवनशैलीचा महत्त्वाचा भाग असल्याने येणाऱ्या काही महिन्यात साखर महागणार असल्याची शक्यता वर्तवण्यात आल्याचे वृत्त आहे.

व्यापार आकडेवारीनुसार, एस - ३० ग्रेडच्या साखरेसाठी महाराष्ट्रातील साखर कारखान्याच्या किंमती १७ फेब्रुवारीपर्यंत प्रतिक्विंटल प्रति ३ हजार ७९० रुपये आहेत. ही किंमत एका महिन्यापूर्वी प्रतिक्विंटल ३ हजार ५६५ रुपये आणि दोन महिन्यांपूर्वी प्रतिक्विंटल ३ हजार ३८० रुपये होती. मागील वर्षाच्या तुलनेत साखरेच्या किंमती ६.३ टक्क्यांनी वाढल्या आहेत आणि गेल्या दोन महिन्यांत १२ टक्क्यांनी साखरेच्या किंमतीत वाढ झाली आहे.



उद्योगाच्या अंदाजानुसार असे दिसून आले आहे की, १५ फेब्रुवारीपर्यंत भारताचे साखर उत्पादन दरवर्षी पेक्षा १२ टक्क्यांनी घटले आहे. प्रतिकूल हवामान आणि दोन वर्षानंतर साखर निर्यात पुन्हा सुरू झाल्याने साखर उत्पादनात कमतरता निर्माण झाली आहे. तसेच साखरेच्या उत्पादनात घट झाल्यामुळे साखर पुरवठा कमतरता निर्माण झाली आणि साखरेच्या किंमती वाढवल्या. कमी ऊस उपलब्धता आणि साखर कारखाने लवकर बंद झाल्यामुळे साखरेच्या किंमतीवर परिणाम झाला होता.

देशातील साखर कारखाने साधारणत: ऑक्टोबर ते मे अथवा जूनपर्यंत म्हणजे ४ ते ६ महिने सुरू असतात.

यावर्षी उसाच्या तुटवड्यामुळे यापूर्वीच बहुतांश साखर कारखाने बंद झाले आहेत. गेल्यावर्षी ५०५ साखर कारखान्याच्या तुलनेत यंदा केवळ ४५४ साखर कारखान्यांनी गाळप सुरू सुरू केले. १ फेब्रुवारीपर्यंत उसाअभावी ७७ साखर कारखाने बंद झालेत तर मागील वर्षी केवळ २८ साखर कारखाने बंद झाले होते. याच काळात गेल्यावर्षी ४७७ कारखाने सुरू होत, तर सध्या ३७७ साखर कारखान्यांचा गाळीत हंगाम अद्याप सुरू आहे.

### साखर उत्पादनात मोठी घट

● नॅशनल फेडरेशन ऑफ कोऑपरेटिव्ह शुगर फॅक्टरीच्या आकडेवारीनुसार, आतापर्यंत बंद झालेले बहुतेक साखर कारखाने महाराष्ट्र आणि कर्नाटक या भारतातील दोन शुगर उत्पादक राज्यांतील आहेत. एनएफसीएसएफ आणि भारतीय साखर आणि बायो-एनर्जी मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन यासह काही उद्योग संस्थांनी मागील वर्षाच्या तुलनेत २०२४-२५ मध्ये साखर उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता व्यक्त केली आहे. एनएफसीएसएफच्या आकडेवारीवरून असे दिसून आले आहे की, १५ फेब्रुवारीपर्यंत साखर उत्पादन १९७.६५ लाख टन होते, गेल्यावर्षी याच तारखेला २२४.७५ लाख टन होते, असे देखील नॅशनल फेडरेशन ऑफ कोऑपरेटिव्ह शुगर फॅक्टरीने स्पष्ट केले आहे.



# ब्रेथ अनालायझर विश्वासार्ह नाही

## पाटणा उच्च न्यायालयाचा निर्णय

ब्रेथ अनालायझर यंत्राच्या अहवालातून व्यक्तीने दारु पिली आहे की नाही, याचा कोणताही ठोस पुरावा मिळत नाही. त्यामुळे केवळ ब्रेथ अनालायझर (श्वास विश्लेषक)अहवालाच्या आधारे दारू बंदी कायद्याअंतर्गत दाखल केलेला गुन्हा बेकायदेशीर ठरतो, असा निर्णय पाटणा उच्च न्यायालयाने दिला आहे.



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पाटणा :** २०१६ पासून बिहार राज्यात दारूबंदी कायदा लागू आहे. किशनगंजमध्ये राहणाऱ्या नरेंद्र कुमार राम यांच्याविरुद्ध दारुबंदी कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. नरेंद्र कुमार राम यांना पोटाच्या संसर्गासाठी सुमारे १५ दिवसांपासून होमिओपॅथिक औषध घेत होते. होमिओपॅथिक औषधात असलेले अल्कोहोल ब्रेथ अनालायझरने शोधून काढले. यामुळे चुकीचा अहवाल आला. उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांनी त्याचे रक्त आणि लघवीची चाचणी न करताच त्याच्याविरुद्ध एफआयआर दाखल केला. तसेच त्यांनी कोणते असामान्य वर्तन केले याचाही एफआयआरमध्ये उल्लेख नव्हता. ही कारवाई रद्द करण्यात यावी, अशी मागणी करणारी याचिका नरेंद्र कुमार राम यांनी पाटणा उच्च न्यायालयात दाखल केली होती. यावर न्यायमूर्ती विवेक चौधरी यांच्यासमोर सुनावणी झाली.

याचिकाकर्त्यांचे वकील शिवेश सिन्हा यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या पाच दशकांच्या जुन्या निकालाचा हवाला देत म्हटले आहे की, रक्त, मूत्र किंवा असामान्य वर्तन या अहवालाचे समर्थन होत नाही तोपर्यंत तोंडाची दुर्गंधी पोटात अल्कोहोलच्या उपस्थितीचा ठोस पुरावा मानत नाही. याचिकाकर्त्यावर सुमारे पंधरा दिवसांपासून होमिओपॅथिक औषधांनी पोटाच्या संसर्गावर उपचार सुरू होते, असा युक्तीवाद केला.

या प्रकरणी पाटणा उच्च न्यायालयाने आपल्या निर्णयात म्हटले की, "ब्रेथ अनालायझर यंत्राचा अहवाल पूर्णपणे बरोबर नाही. हे यंत्र व्यक्ती दारू पिला आहे की नाही हे दर्शवते;पण हा ठोस पुरावा नाही. केवळ या अहवालाच्या आधारे कोणालाही दोषी ठरवता येणार नाही."वैद्यकीय तपासणीशिवाय ब्रेथअलायझर चाचणी खटल्यासाठी आवश्यक असलेल्या पुराव्याच्या मर्यादेची पूर्तता करत नाही आणि त्यामुळे एफआयआर रद्द करण्यात येत असल्याचेही न्यायमूर्ती विवेक चौधरी यांनी स्पष्ट केले.

### वैद्यकीय चाचण्या देखील आवश्यक

● पाटणा उच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे ज्यांच्याविरुद्ध केवळ श्वास विश्लेषक चाचणीच्या आधारे गुन्हा दाखल करण्यात आला आहे त्यांना दिलासा मिळू शकतो. यामुळे यापुढे बिहार पोलिसांनाही सावधगिरी बाळगावी लागेल. आता फक्त तोंडातून दारूच्या वासावर एफआयआर दाखल करता येणार नाही. इतर पुरावे देखील गोळा करावे लागतील. जसे आरोपीचे असामान्य वर्तन, रक्त आणि मूत्र चाचणी अहवाल. या निर्णयामुळे बिहारमधील दारूबंदी कायद्याच्या अंमलबजावणीत बदल केला जाण्याची शक्यताही व्यक्त होत आहे.

# काँग्रेस करणार संघटनात्मक बदल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** विविध राज्यांच्या विधानसभा निवडणुकीत सतत पिछाडीवर पडल्यानंतर काँग्रेसने आता संघटना मजबूत करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. यासाठी पक्षात तळागाळापासून ते वरच्या पातळीपर्यंत बदल करणार आहे. पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना पारंपारिक पद्धती सोडून नव्या दमाने कार्यकर्त्यांशी जोडण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यासोबतच पदाधिकाऱ्यांच्या जबाबदाऱ्याही निश्चित केल्या जातील. जबाबदारीला न्याय न देणाऱ्या पदाधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई केली जाणार आहे, काँग्रेस सरचिटणीस आणि राज्य प्रभारींच्या बैठकीत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी स्पष्टपणे तशा सूचना दिल्या तसेच महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मतदार यांद्यांमधील फेराफेरीबद्दल बोलताना राज्यभर आंदोलन करण्याचे निर्देश राज्य प्रभारी रमेश चेन्नीथला यांना दिले.

काँग्रेसच्या 'इंदिरा भवन' या नव्या पक्ष मुख्यालयात पक्षाध्यक्ष खर्गे, राहुल गांधी यांच्या उपस्थितीत पक्षाचे सर्व सरचिटणीस आणि राज्य प्रभारींची बैठक बोलावण्यात आली होती. या बैठकीत मल्लिकार्जुन खर्गे म्हणाले



की, पक्ष मजबूत करण्यासाठी अनेक वेळा लोकांना घाईघाईत पक्षात सामील केले जाते मात्र ज्यांची विचारसरणीत स्पष्ट नाही ते कठीण काळात पळून जातात. 'खरे घसरले आणि खोटे चालले' ही एक जुनी म्हण आहे. आपण अशा लोकांपासून दूर राहिले पाहिजे, असे खर्गे म्हणाले. पक्षात जबाबदारीची गरज अधोरेखित करताना त्यांनी सांगितले की, सर्व सरचिटणीस आणि प्रभारी त्यांच्या राज्यांमधील संघटना आणि निवडणूक निकालांसाठी जबाबदार असतील. कार्यकारिणीच्या गेल्या दोन बैठकांमध्ये संघटनात्मक निर्मितीवर चर्चा झाली. त्या संदर्भात अनेक निर्णय घेण्यात आले आहेत. लवकरच आणखी काही निर्णय घेतले जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# दादर परिसरात ५ किलो ड्रग्ज जप्त

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबई गुन्हे शाखेच्या युनिट ९ नं दादर परिसरातील एका गेस्टहाऊसवर छापा टाकून ५ किलो एमडी ड्रग्ज जप्त केले. आंतरराष्ट्रीय बाजारात या ड्रग्जची किंमत सुमारे १० कोटी रुपये असल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणात पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली. जहांगीर शाह आलम शेख (रा. मुंबई) आणि सेनोल शेख (रा. पश्चिम बंगाल) अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. गुन्हे शाखेचे पथक एमडी ड्रग्ज प्रकरणाचा अधिक तपास करत आहे.

बुधवारी डीआरआयनं जप्त केले ५.४४ कोटींचे कोकेन- गुप्तचर माहितीच्या आधारे, महसूल गुप्तचर संचालनालय (डीआरआय) मुंबईनं बुधवारी मुंबई विमानतळावरून भारतात अंमली पदार्थांची तस्करी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या कांगोच्या महिला नागरिकाला आरोपीला एनडीपीएस कायद्यांतर्गत अटक केली होती. आरोपीला दंडाधिकाऱ्यांसमोर हजर करण्यात आल्यानंतर आदेशानुसार जवळच्या सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले, असे अधिकाऱ्यांनी सांगितलं. प्रवाशाकडील ५४४ ग्रॅम कोकेन असलेले १० कॅप्सूल जप्त करण्यात आले. त्याची बाजारात ५.४४ कोटी रुपये किंमत आहे.



लेबनॉन

उद्‌ध्वस्त लेबनॉन : लेबनॉनमधील कफर किला या दक्षिण लेबनॉनमधील गावातून, इस्रायली सैन्याने माघार घेतली असली, तरी या भागाचे इस्रायलने केलेल्या माऱ्यात मोठे नुकसान झाले आहे.

# आणखी चार लाख लाडक्या बहिणी ठरल्या अपात्र




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** लाडक्या बहिणीबाबत एक महत्त्वाची आणि मोठी बातमी समोर येतेय. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेला महाराष्ट्रात अभूतपूर्व असा प्रतिसाद मिळालाय. या योजनेमुळे महायुतीचे सरकार सत्तेत पुन्हा आल्याचं म्हटल्यास वावगं ठरणार नाही. कारण ही ऐतिहासिक योजना महायुतीसाठी गेमचेंजर ठरल्याचे बोलले जातेय. दरम्यान, या योजनेच्या माध्यमातून १५०० रुपये लाडक्या बहिणीच्या खात्यात देण्यात आलेत. तर निवडणुकीपूर्वी आमचे जर पुन्हा सरकार आले तर आम्ही १५०० ऐवजी २१०० रुपये देऊ, अशी महायुतीने घोषणा केली होती. सुरुवातीला ज्या महिलांनी अर्ज दाखल केले होते. त्या सर्व महिलांच्या खात्यात १५०० रुपये टाकण्यात आले. मात्र, आता निवडणुकीनंतर मागील एक दोन महिन्यांपासून या लाडक्या बहीण योजनेत कटाक्षाने आणि बारकाईने निकष पाहिले जात आहेत. काही दिवसांपूर्वी लाडक्या बहिणीत पाच लाख महिलांना विविध निकषामुळे अपात्र ठरवण्यात आले होते. तर आता आणखी चार लाख महिलांना विविध निकषात बसत नसल्यामुळे त्यांना अपात्र ठरवण्यात येणार आहे. यामुळे आता या योजनेतून अपात्र महिलांची संख्या नऊ लाखापर्यंत पोहोचली आहे. परिणामी सरकारचे या एका योजनेतून ९४५ कोटी रुपये वाचणार आहेत.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेतून काही दिवसांपूर्वी पाच लाख महिलांना या योजनेतून अपात्र ठरवल्यानंतर आता या योजनेत सरकारकडून नवे निकष लागू केले जाणार आहेत.

### फेब्रुवारीच्या हप्त्याची प्रतीक्षा

● महायुतीचे सरकार आल्यानंतर मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेचे दोन हप्ते लाडक्या बहिणींना देण्यात आलेत. विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुतीने जर आम्ही पुन्हा सत्तेत आलो तर लाडक्या बहिणींना १५०० रुपयांऐवजी २१०० रुपये देण्याचे आश्वासन दिले होते. त्यामुळे २१०० रुपये लाडक्या बहिणींना कधीपासून मिळणार? असा सवाल लाडक्या बहिणीतून उपस्थित केला जातोय. फेब्रुवारी महिना संपत आला तरी अजूनही या महिन्यातील हप्ता लाडक्या बहिणींना मिळाला नाही. त्यामुळे फेब्रुवारी महिन्याचा हप्ता कधी येणार? या प्रतीक्षेत लाडक्या बहिणी आहेत.

» Selected

## लहानग्यांना देखील छत्रपतींबद्दल आदर आणि आस्था



**लोणी-धामणी :** शिरदाळे (ता. आंबेगाव ) येथील शाळकरी मुलांनी गावातून मिरवणूक काढत केली शिवजयंती साजरी. संबंध महाराष्ट्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यात आली. थोरामोठयांसह सर्वांनीच ज्याला जसे जमेल तसे महाराजांच्या जयंती निमित्त कार्यक्रम घेण्यात आले. मात्र शिरदाळे येथील लहान मुलांनी एक शक्कल लढवत अनोख्या पद्धतीने शिवजयंती साजरी केली. ओम जगदीश रणपिसे, ऋत्विक सरडे, ओम देविदास रणपिसे, प्रतीक तांबे, सुदर्शन भोर, ऋषभ सरडे, शिवम रणपिसे, अंश सरडे, नचिकेत तांबे, तनिष्का रणपिसे, ऋतू मिंडे, तेजस मिंडे, रिद्धी तांबे, कनिष्का तांबे या सर्वांनी यात सहभाग घेतला. या बालकांनी महाराजांबद्दल दाखवलेला हा आदर सन्मान नक्कीच कौतुकास पात्र आहे.

## दुभाजक काढल्याने जेजुरी हद्दीत शुन्य अपघातांची नोंद

**सासवड :** पुणे पंढरपूर पालखी महामार्गावर वाहने सुसाट धावत असून, अपघाताचे प्रमाण धोकादायक पद्धतीने वाढले आहे. त्यावर



ठिकठिकाणी दुभाजक खुले असल्यामुळे मोठ्या प्रमाणावर अपघात होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर शिवरी ते निरा या दरम्यानचे रस्ता दुभाजक बंद करण्याचा निर्णय घेतला गेला. यामुळे गेल्या एक महिन्यात जेजुरी पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये अपघातांची शून्य नोंद दाखल झाली असली, तरी वाहतुकीचे नियम हे सर्वांनी पाळले पाहिजेत, असे जेजुरी पोलीस स्टेशनच्या पोलिस सहाय्यक निरीक्षक दीपक वाकचौरे यांनी सांगितले. बेलसर फाट्यावर १६ जानेवारी रोजी पारगाव येथील तिघांचा अपघाता मध्ये मृत्यू झाला होता. यानंतर सर्व दुभाजक बंद करण्याचा धाडसी निर्णय जेजुरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे यांनी घेतला. यामुळे अपघाताचे प्रमाण घटले आहे.

## महिलेचा विनयभंग करत कारची धडक

**शिक्रापूर :** पिंपळे जगताप ता. शिरुर येथील तेजस टाकळकर हा गावातील एका महिलेचा वारंवार पाठलाग करत होता, सायंकाळच्या सुमारास महिला घरासमोर भांडी धूत असताना तेजस एका कारमधून महिलेच्या घरासमोर आला, त्याने महिलेच्या मनास लज्जा निर्माण होईल, असे वर्तन करत तिचा विनयभंग केला. त्यानंतर परत जात असताना त्याने जाणीवपूर्वक महिलेच्या अंगावर कार आणून महिलेला ठोस देऊन अपघात करत महिलेला जखमी केले. घडलेल्या प्रकाराबाबत पीडित महिलेने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलीसांनी तेजस दत्तात्रय टाकळकर (रा. पिंपळे जगताप, ता. शिरुर) याचे विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## शिरूर नगरपरिषदेबाबत कठोर भूमिका



**शिरूर :** शिरूर नगरपरिषदेच्या घनकचरा व्यवस्थापनातील वायुप्रदूषण व गंभीर त्रुटींवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने आता कडक भूमिका घेतली आहे. शहरातील वायू प्रदूषणाच्या वाढत्या तक्रारींमुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने नगरपरिषदेवर कठोर निर्देश जारी केले. १५ दिवसांत उपाययोजना न केल्यास कायदेशीर कारवाई होईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या तपासणीत अनेक धक्कादायक बाबी उघड झाल्या आहेत. मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष महिबूब सय्यद, शिरूर प्रवासी संघाचे अध्यक्ष अनिल बांडे, मनसेचे शिरूर तालुका संघटक अविनाश घोगरे, मनसेचे शहराध्यक्ष आदित्य मैड व मनसेचे सचिव रवि लेंडे यांनी दि. २७ जानेवारी रोजी म्युनिसिपल सॉलिड वेस्ट साइटवरील प्रदूषणाच्या तक्रारी नोंदवल्या. त्यानंतर तक्रारीची दखल घेत दि. २८ जानेवारी रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ पुणेच्या अधिकाऱ्यांनी स्थळ पाहणी केली असता अनेक गंभीर बाबी समोर आल्या. त्यामध्ये कचऱ्याचे योग्य प्रकारे व्यवस्थापन नाही. अवैज्ञानिक पद्धतीने कचरा टाकला जात आहे. काही ठिकाणी घनकचऱ्याचे जाळणे सुरूच आहे. वायू प्रदूषणामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

# ७६ कोटी खर्चून १ टीएमसी गाळ काढणार

### घोड व चासकमान परिक्षेत्रात पाणी वाहतूकीचा वाढणार वेग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वाघोली :** घोड आणि चासकमान या दोन्ही प्रकल्पांच्या सुधारणा व देखभाल कार्यात गती येणार असून, लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना अधिकाधिक फायदा मिळणारं असल्याचे आमदार ज्ञानेश्वर कटके यांनी सांगितले. यावेळी अनेक महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. कालव्यांची दुरुस्ती करावी घोड प्रकल्पाच्या कालव्यांची सध्या दुरवस्था झाल्याने त्याच्या दुरुस्तीची गरज असल्याचे आमदारांनी नमूद केले. त्यासाठी आम्ही प्रयत्नशील असल्याचे आमदार कटके यांनी माहिती देताना सांगितले.

घोड व चासकमान प्रकल्पांच्या सुधारणा, देखभाल व दुरुस्तीविषयी आमदार ज्ञानेश्वर कटके यांनी कार्यकारी संचालक अतुल कपोले यांच्यात बैठक संपन्न झाली. धरणातील गाळ हटवण्याची मागणी आमदार कटके यांनी केली.

घोड प्रकल्प १९६० साली पूर्ण झाल्याने आता त्याला ६० वर्षांहून अधिक काळ लोटला आहे. गाळ सर्वेक्षण अहवालानुसार धरणात सुमारे १ टीएमसी गाळ साठलेला असून, त्यामुळे धरणाची पाणी साठवण्याची क्षमता वाढवण्यासाठी हा गाळ काढण्याची मागणी आमदारानी केली.

शासन स्तरावर याबाबत धोरणात्मक निर्णय घेतला जाणार असल्याचे कार्यकारी संचालकांनी सांगितले.

महाराष्ट्र सिंचन सुधार प्रकल्पांतर्गत ७६ कोटी रुपये मंजूर झाले असून, काही महिन्यांतच कालव्यांच्या दुरुस्तीचे काम सुरू होणार असल्याचे कार्यकारी संचालकांनी सांगितले. घोड नदीवरील कोल्हापुर पद्धतीच्या बंधाऱ्यांची गळती दुरुस्ती करा अशा सूचना आमदारांनी केल्या. आवश्यक लोखंडी बर्गे देण्यात येतील आणि दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्याचे कार्यकारी संचालकांनी सांगितले. कालव्यातील गाळ काढून पाणी वाहतुकीची क्षमता वाढविण्याची सूचना केल्यानंतर यांत्रिकी विभागाच्या यंत्र सामग्रीद्वारे हे काम हाती घेतले जाणार आहे.

पुढील आवर्तन टेल टू हेड पद्धतीने चालवण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, त्यासाठी आवश्यक प्रशासकीय यंत्रणा आणि साधनसामग्री पुरवली जाणार आहे. न्हावरे, निर्वी आणि निमोणे शाखांसाठी स्वतंत्र कार्यालये उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.





घोड व चासकमान प्रकल्पांच्या सुधारणा संदर्भात बैठकीत अधिकारी यांना निवेदन देताना आमदार ज्ञानेश्वर कटके.

> बैठकीत घेतलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयांमुळे घोड आणि चासकमान प्रकल्पांच्या सुधारणा व देखभाल कार्यात गती येणार असून, लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना अधिकाधिक फायदा मिळणार आहे. घोड व डिंभे उजव्या कालव्यांच्या आवर्तना दरम्यान होणारा अनधिकृत पाणी उपसा तसेच कालवा फोडण्याच्या घटनांवर कठोर कारवाई करावी.
> -ज्ञानेश्वर कटके, आमदार

### शेवटच्या टप्प्याचे अस्तरीकरण

● डिंभे धरणाचा उजवा कालवा ११३ किमी लांबीचा असून, त्यातील शेवटच्या १२-१३ किमी लांबीत अस्तरीकरण नाही. त्यामुळे कालवा पूर्ण क्षमतेने चालू शकत नसल्याचे आमदारांनी निदर्शनास आणून दिल्यानंतर कार्यकारी संचालकांनी सांगितले की, या कालव्याच्या शेवटच्या भागाच्या कॉंक्रीट अस्तरीकरणासाठी शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला असून, लवकरच त्यास मंजुरी मिळेल.

# सासवड येथे शिवजयंती उत्साहात

### शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्यास हजारो शिवप्रेमींनी पुष्पहार अर्पण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** अखंड हिंदुस्थानचे आराध्य दैवत, श्रीमंतयोगी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती सासवड व परिसरात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. येथील शिवतीर्थ चौकातील शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्यास हजारो शिवप्रेमींनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. विविध किल्ल्यांवरून आणलेल्या शिवज्योतींचे देखील या ठिकाणी स्वागत करण्यात आले.

सासवड नगरपालिका आणि शिवस्मृती प्रतिष्ठान यांच्या वतीने माजी आमदार संजय जगताप व नगरपालिकेचे मुख्याधिकारी डॉ कैलास चव्हाण यांनी शिवरायांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. माजी नगरसेवक अजित जगताप, विजय वढणे, मनोहर जगताप, पुरंदर मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ प्रविण जगताप, विश्वजित आनंदे, नंदूबापू जगताप, अमोल क्षीरसागर, सागर जगताप यांसह पालिकेचे अधिकारी पायल पोमण, जावेद मुल्ला, निखिल कांचन, संकेत नंदवंशी, गजानन नरवाडे, स्वप्नील सुर्यवंशी, सुवर्णा ठोके, ज्ञानेश्वर कामठे यासह पालिकेचे अधिकारी कर्मचारी व मोठ्या संख्येने शिवप्रेमी या प्रसंगी उपस्थित होते. माजी आमदार संजय जगताप यांनी जयंती निमित्ताने सासवडच्या वैभवात भर घालणाऱ्या शिवसृष्टी हे ऐत्याहासिक दालन सर्वांसाठी खुले कर्ण्यात आल्याचे सांगितले. सायंकाळी उशीरा शिवतीर्थ चौकात बाल शिवव्याख्याती राजगौरी विलास टिळेकर हिच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

दरम्यान, सासवड येथील भाजप कार्यालयात देखील शिव प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.



# काळेवाडी-रुई रस्त्याचा दर्जा खालावला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी देवकर :** खासदार सुप्रिया सुळे यांच्या लोकसभा मतदार संघातील इंदापूर तालुक्यातील प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतील सुरू असलेल्या काळेवाडी-रुई या रस्त्याच्या कामाच्या दर्जाबाबत साशंकता व्यक्त होत आहे.

दळणवळणाच्या दृष्टीने महत्वाच्या असणाऱ्या आणि राष्ट्रीय महामार्गाला जोडणाऱ्या रस्त्यावरून अनेक वाहनांची येजा होत असते. ठिकठिकाणी पडलेल्या खड्ड्यांमुळे या ठिकाणी अनेक लहान मोठे अपघात घडले होते. नुकतेच खासदार सुप्रिया सुळे यांच्या संकल्पनेतून प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतून लाखो रुपये खर्चून सदर रस्त्याचे काम सुरू करण्यात आले; परंतु रस्त्याच्या कामाचा दर्जा सुरुवातीपासूनच खालावलेला असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी होत्या. मात्र, संबंधित अधिकाऱ्यांनी आणि ठेकेदाराने कामाचा दर्जा सुधारण्यासाठी कोणतीच पावले उचलली नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. तसेच रस्त्याच्या अनेक निकृष्ट बाबी वापरण्यात येत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. त्यामुळे संबंधित रस्त्याचे काम उत्तम दर्जाचे होणे अपेक्षित असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. दरम्यान, रस्त्याच्या कामाबाबत इंदापूर येथील प्रधानमंत्री ग्राम सडक योजना कार्यालयातील उपअभियंता कोमल घोगरे यांना संपर्क केला असता त्यांनी फोन ला उत्तर दिले नाही.



# खेडमधून दहावीचे ५ हजार २९५ विद्यार्थी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** शुक्रवारी (दि. २१) इयत्ता दहावीच्या शालान्त परीक्षा सुरु होत आहेत . १८ मार्च पर्यत या परीक्षा होणार आहेत. खेड तालुक्यातील १३ आणि शिरुर तालुक्यातील पाबळ तसेच आंबेगाव तालुक्यातील पेठ परीक्षाकेंद्र मिळुन १५ परीक्षा केंद्रावर ५२९५ विद्यार्थी दहावीची परीक्षा देणार आहेत. परीक्षा केंद्राचे संपूर्ण नियत्रंण राजगुरुनगर येथुन होणार आहे. परीक्षा केंद्रावर प्रश्नपत्रिकासह उत्तर पत्रिका साहित्य ने-आण करण्यासाठी रनर सोबत पथके तैनात करण्यात आली आहेत. तसेच काँपीमुक्त अभियान, परीक्षा केंद्रावर कोणताही अनुचित प्रकार घडु नये याकरीता चार फिरत्या पथकांची पाहाणी राहणार आहे. या पथकामध्ये तहसीलदार ज्योती देवरे यांच्या सह विविध विभागाचे प्रमुख अधिकारी परीक्षा केंद्राना परीक्षाकाळात दररोज भेटी देऊन दक्ष राहणार आहेत. प्रत्येक केंद्रावर पोलीस बंदोबस्त तैनात ठेवण्यात आला असुन परीक्षाकेंद्रावर आरोग्य पथकासह, पाणी, विजेची सुविधा तयार ठेवण्यात आल्याची माहिती परीक्षा कस्टोडियन तथा खेड पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी अमोल जंगले यांनी दिली.

सध्या वातावरणात उष्णता वाढु लागल्याने ग्रामीण भागातील परीक्षार्थी विद्यार्थ्यांनी परीक्षाकेंद्रावर किमान एक तास अगोदर उपस्थित राहावे. काही आजाराबाबत विद्यार्थ्यांना त्रास होत असेल तर पालकांनी परीक्षाकेंद्रावर परीक्षा काळात उपस्थित राहावे तसेच याबाबत पुर्वकल्पना परीक्षाकेंद्रावरील पर्यवेक्षकांना देण्याचे आवाहन गटशिक्षणाधिकारी अमोल जंगले यांनी केले आहे.

## तीर्थक्षेत्र देहू...

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



आळंदी

श्री छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती देहू नगरपंचायतचे वतीने उत्साहात साजरी करण्यात आली. देहू नगरपंचायत मुख्याधिकारी निवेदिता घार्गे, नगराध्यक्षा पुजा दिवटे, नगरसेविका स्मिता चव्हाण, गटनेते योगेश परंडवाल यांच्यासह देहू येथील विविध सेवाभावी संस्थांचे पदाधिकारी यांचे हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

# दारुल उलुम मौलानाचे स्पेशल ऑडिट; धर्मदाय आयुक्ताचा याचिकेवर निकाल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** मदरसा दारुल उलुम मौलाना युनूसिया या संस्थेचे सरकारकडून स्पेशल ऑडिट करण्यात येणार आहे. बारामतीतील सामाजिक कार्यकर्ते सोहेल शेख यांच्या तक्रारींवर आणि उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने मदरसा दारुल उलूम मौलाना युनिसियाचे धर्मदाय आयुक्ताने स्पेशल ऑडिटचे आदेश दिले आहेत. संस्थेच्या बँक खात्यात मोठ्या प्रमाणात मोठ्या रक्कमेची उलाढाल केल्याचे निदर्शनास येत असल्याने स्पेशल ऑडिटचे आदेश देण्यात आले आहे.

कुठल्याही संस्थेत आर्थिक अपहार, देणगी रक्कमेचे चुकीचा वापर निर्दर्शनात येता धर्मदाय आयुक्त हे तक्रारदार यांच्या पुराव्याचे आधारे तक्रार मध्ये तथ्य आढळ्यास, सहाय्यक धर्मदाय आयुक्त आणि निरीक्षक अहवालाच्या आधारे त्या संस्थेचे महाराष्ट्र पब्लिक ट्रस्ट अधिनियम कलम ३३(४) च्या तरतुदीनुसार स्पेशल ऑडिटचे आदेश देतात. ॲड सुशांत प्रभुणे यांनी तांत्रिक बाबी उच्च न्यायालयाच्या समोर मांडल्या. शेख यांची तक्रारीमध्ये तथ्य दिसून आले. सदर मदरसा दारुल उलुम मौलाना युनूसिया मध्ये मोठ्या प्रमाणात पैस्याची उलाढाल झालेली आहे व ह्या कारणावरून सदर संस्थेचे होणार सरकार कडून २ महिन्यात स्पेशल ऑडिट होणार आहे.



### महाराष्ट्रातील १० नगरपालिकांचा या उपक्रमात समावेश

# बारामती येथे 'नक्शा' प्रकल्पास प्रायोगिक प्रारंभ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** केंद्र शासनाने शहरी भूअभिलेखांचे डिजिटायझेशन करण्यासाठी देशातील १५२ नगरपालिकांमध्ये "नक्शा" प्रकल्प प्रायोगिक तत्त्वावर सुरू केला आहे. महाराष्ट्रातील १० नगरपालिकांचा या उपक्रमात समावेश असून बारामती नगरपरिषद क्षेत्रात आजपासून या प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाली असून, शहराच्या हद्दीतील संपूर्ण ५२ चौरस किलोमीटर भूभागांचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे.

केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी मध्यप्रदेशातील रायसेन येथे "नक्शा" (राष्ट्रीय भौगोलिक माहिती आधारीत शहरी भूमापन) प्रकल्पाचा शुभारंभ केला. बारामती येथील जळोची नगरपरिषद सभागृहात या कार्यक्रमाचे दृकश्राव्य प्रक्षेपण करण्यात आले.

यावेळी सर्वे ऑफ इंडिया अधिकारी भुपेंद्र परमार, उपविभागीय अधिकारी बारामती वैभव नावडकर, जिल्हा भूमी अधीक्षक सूर्यकांत मोरे,मुख्याधिकारी महेश रोकडे, भूमी अभिलेख उपअधीक्षक संजय धोंगडे, उपमुख्यमंत्री यांचे विशेष कार्य अधिकारी बाळराजे मुळीक, नितीन हाट्टे आणि माजी नगरसेवक व ग्रामस्थ उपस्थित होते. आधुनिक भौगोलिक माहिती प्रणाली (जीआयएस) आणि ड्रोन सर्वेक्षणाच्या मदतीने भूमापन प्रक्रिया सुधारली जाईल. यामुळे सुधारित नकाशे तयार करून व त्यांची मालकी बाबत हक्क चौकशी करून अधिक अचूक भूअभिलेख तयार करता येतील. अचूक भूअभिलेख निर्माण झाल्यामुळे भूमालकीशी संबंधित वाद कमी होतील. जमिनीची पत वाढेल, नगरपालिकेला शहरी विकास आराखडे तयार करताना जीआयएस तंत्रज्ञानाचा उपयोग होईल. मालमत्तांच्या खरेदी-विक्री व्यवहारांमध्ये स्पष्टता राहील आणि अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण ठेवता येईल.

> अचूक भूअभिलेख निर्माण झाल्यामुळे भूमालकीशी संबंधित वाद कमी होतील. जमिनीची पत वाढेल,नगरपालिकेला शहरी विकास आराखडे तयार करताना जीआयएस तंत्रज्ञानाचा उपयोग होईल. मालमत्तांच्या खरेदी-विक्री व्यवहारांमध्ये स्पष्टता राहील आणि अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण ठेवता येईल. स्थावर मालमत्तेचा अद्ययावत नकाशा उपलब्ध झाल्याने कर आकारणी अधिक प्रभावी होईल.
> - संजय धोंगडे, उपअधीक्षक भूमी अभिलेख

### पथदर्शी प्रकल्प

● पंढरपूर, बारामती, कुळगाव बदलापूर, शिर्डी, वरणगाव, कन्नड, बुलढाणा, खोपोली आणि मुत्तीजापूर या १० शहरांमध्ये या प्रकल्पाचा पथदर्शी प्रयोग होणार आहे. "नक्शा" प्रकल्पामुळे शहरी भूअभिलेख व्यवस्थापनात आमूलाग्र बदल होईल. आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने भूविकास प्रक्रिया अधिक पारदर्शक, वेगवान आणि अचूक होईल. केंद्र सरकारच्या या उपक्रमामुळे नागरीकांना अधिक सक्षम सेवा मिळेल आणि शहरी नियोजन अधिक सुकर होईल.

#रा

# जेजुरीत शिवजयंती उत्साहात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** श्री मार्तंड देवसंस्थान जेजुरी न्यासाकडून बुधवारी छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त ऐतिहासिक शहाजीराजे व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भेटीचे समूह शिल्पाच्या ठिकाणी पुष्पवृष्टी करून मानवंदना देण्यात आली.

श्री मार्तंड देवसंस्थानच्या वतीने दर वर्षी शिवजयंती निमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. बुधवारी शिवजयंतीचे औचित्य साधून खंडोबा मंदिरात व गडकोटमध्ये फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. तसेच श्री खंडोबा मंदिर गडकोटामध्ये शिवशंभु मर्दानी आखाडा, कोल्हापूर यांच्या शिवभक्तांनी शिवकालीन मर्दानी खेळांचे सादरीकरण केले. यावेळी देवसंस्थानचे विश्वस्त ॲड. पांडुरंग थोरवे, पोपट खोमणे, मंगेश घोणे, ॲड. विश्वास पानसे, देवसंस्थानचे माजी विश्वस्त संदीप जगताप व सुधीर गोडसे, पुजारी सेवेकरी वर्गाचे गणेश आगलावे, सामाजिक कार्यकर्ते रवींद्र जोशी, सुरेश उबाळे, महेश उबाळे, विठ्ठल सोनवणे, विक्रम माळवदकर, शैलेश राऊत आदी गावकरी, मानकरी उपस्थित होते.





ढोकसांगवी, ता.शिरुर येथे शिवजयंती साजरी करण्यात आली.

## ढोकसांगवीत शिवजयंती उत्साहात साजरी

**कारेगाव :** ढोकसांगवी, ता.शिरुर येथे स्व. आबासाहेब पाचंगे माध्यमिक विद्यालय येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यालयाचे मुख्याद्यापक बाळासाहेब सोनवणे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य गणेश पाचंगे, युवा सेनेचे जिल्हा समन्वयक गोवर्धन पाचंगे,उद्योजक हर्षल पाचंगे यांसह विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते. मुख्याध्यापक सोनवणे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य आणि इतिहास याबद्दल सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना दिली. महेश धुमाळ यांनी आभार मानले. दरम्यान,रांजणगाव गणपती, कारेगाव,निमगाव भोगी, सोनेसांगवी, वाघाळे, वरुडे, गणेगांव खालसा, खंडाळे, पिंपरी दुमाला व बाभूळसर खुर्द या गावात शिवजयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली.

## शिरुर तहसील कार्यालयात ‘धरणे’

**शिक्रापूर :** शिरुर तहसील कार्यालयात अनेक वेळा भ्रष्टाचाराच्या घटना समोर येत असून, यापूर्वी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे छापे सुद्धा झालेले आहेत. अनेकदा तहसीलदार, नायब तहसीलदार, मंडलाधिकारी वतलाठी हे मनमानी करुन त्यांच्या काही एजंटच्या माध्यमातून नागरिकांना शासकीय कामासाठी पैशांची मागणी करतात. अन्यथा, नागरिकांना हेलपाटे मारायला भाग पाडत असल्याचे समोर आले असल्याने, शिरुर तहसील कार्यालयातील मनमानी कारभार व भ्रष्टाचार विरोधात भारतीय जनता पार्टी उद्योग आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष संजय पाचंगे हे ४ मार्च पासून धरणे व उपोषण आंदोलन करणार असल्याची माहिती एका पत्रकान्वये उद्योग संजय पाचंगे यांनी दिली आहे.



## काठापूर बुद्रूक येथे केबल चोरी

**लोणी-धामणी :** काठापूर बुद्रुक (ता. आंबेगाव ) येथील पांडुरंगवस्ती या ठिकाणी दोन विहिरीवरील दोन मोटारींची केबलची चोरी झाल्यामुळे ऐन उन्हाळ्यात शेतकऱ्यांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. केबल चोरी झाल्याने मोटारी बंद राहणार आहेत. त्यामुळे शेतकरी वैतागला आहे. नदीकाठच्या मोटारींच्या केबल चोरीच्या घटना होत असताना, विहिरीवरच्या मोटारिंच्या केबल चोरी होऊ लागल्याने शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण आहे. काठापुर बुद्रुक येथील पांडुरंगवस्ती या ठिकाणचे शेतकरी अनिल दत्तात्रय जाधव व विष्णू सखाराम जाधव यांच्या विहिरीवरील विज पुरवठा करणाऱ्या केबलची चोरी झाली असून, दोन शेतकऱ्यांची सुमारे ४० फूट लांबीच्या केबल चोरी झाली आहे. या शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले असून, नवीन केबल आणेपर्यंत मोटारी बंद राहिल्याने पिकांना पाणीपुरवठा करण्यासाठी अडथळे निर्माण झाला आहे. परिणामी उन्हाळ्याच्या दिवसात केबल चोरी झाल्याने शेतकऱ्यांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.

## जिजाऊ भवन येथे शिवजयंती उत्साहात



**बारामती :** येथील बारामती तालुका मराठा सेवा संघ आणि जिजाऊ सेवा संघ यांच्या संयुक्त विद्यमाने सालाबाद प्रमाणे शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली, यावेळी बारामतीचे प्रांताधिकारी वैभव नावडकर यांच्या हस्ते शिवप्रतिमेला आणि माता जिजाऊ यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले. याप्रसंगी जिजाऊ सेवा संघाचे अध्यक्ष नामदेवराव तुपे, जिजाऊ सेवा संघाच्या अध्यक्षा स्वाती ढवाण, बारामतीचे तहसीलदार गणेश शिंदे, बारामती नगर परिषदेचे मुख्याधिकारी महेश रोकडे, एमआयडीसी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी हनुमंत पाटील यांच्यासह शिवभक्त बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिवजयंती उत्सव कार्यक्रमां मध्ये लहान मुलां-मुलींनी शिवाजी महाराजांच्या जीवन कार्यावरील आपले विचार व्यक्त केले. रयत शिक्षण संस्थेचे माजी प्राचार्य सूर्यकांत भालेराव यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनातील विविध गुणवैशिष्ट्यां बाबतची माहिती विशद केली व जिजाऊ सेवा संघाच्या महिलांनी पाळणा सादर केला.

# जवळेतही शिवजयंती सोहळा

## शिवनेरी (ता. जुन्नर) वरून आणली शिवज्योत



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** जवळे (ता. आंबेगाव) येथे शिवजयंती सोहळा उत्साहात संपन्न झाला. यावेळी शिवशंभो प्रतिष्ठानचे सर्व सभासद निरंजन शिंदे, पंढरी टाव्हरे, उत्तम शिंदे पाटील, अमोल शिंदे, तुषार टाव्हरे, राहुल गावडे, निलेश गायकवाड, दत्तात्रय गायकवाड, गणेश शिंदे, स्वप्निल टाव्हरे, गणेश टाव्हरे, दिलीप येलभोर, प्रेम गायकवाड, सुहास शिंदे, यश गायकवाड या युवकांनी शिवनेरी (ता. जुन्नर) वरून शिवज्योत आणली. या शिवज्योतीची गावातून ढोल, ताशा व डीजेच्या तालावर भव्य मिरवणूक संपन्न काढण्यात आली. यानंतर ग्रामपंचायत समोर उपस्थित सर्व मान्यवर ग्रामस्थांच्या हस्ते गणेश पूजन, शिवज्योत पूजन करून, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे पूजन सरपंच वृषाली उत्तम शिंदे पाटील व महिला भगिनींच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शालन सोनवणे, सुरेखा खालकर, शैला गावडे, वैशाली वायकर, संध्या वाळुंज, शशिकला गावडे, सुनंदा शिंदे व महिला भगिनी, लहान मुले मोठ्या संख्येने सहभागी झाली होती.

यामध्ये स्वरूप लायगुडे यांने छत्रपती शिवाजी महाराजांची वेशभूषा परिधान करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जवळेचे विद्यार्थी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांविषयी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी गावातील सर्वच आजी-माजी पदाधिकारी उपस्थित होते. सर्वांचे शिवशंभो प्रतिष्ठानच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उत्तम शिंदे पाटील यांनी केले.

## भाजप युवा मोर्चाच्या जिल्हा अध्यक्षपदी गणेशभाऊ कवडे



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**ओतूर :** भारतीय जनता पक्षाच्या पुणे जिल्हा युवा मोर्चाच्या कार्यकारी अध्यक्षपदी श्री क्षेत्र ओझर येथील युवा कार्यकर्ते आणि विघ्नहर गणपती देवस्थान ट्रस्टचे माजी अध्यक्ष गणेश कवडे यांची नियुक्ती करण्यात आली असून, याबाबतचे पत्र प्रदेशाध्यक्ष तसेच महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते नुकतेच त्यांना देण्यात आले.

या प्रसंगी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ,प्रदेश महामंत्री आमदार विक्रांतदादा पाटील, प्रदेश महामंत्री राजेश पांडे, महाराष्ट्र प्रदेश युवा मोर्चाचे अध्यक्ष अनुप मोरे, पिंपरी चिंचवड शहराचे शहराध्यक्ष आमदार शंकर जगताप, भाजप जिल्हाध्यक्ष शरद बुट्टे पाटील, भाजप नेत्या विधानसभा प्रमुख आशाताई बुचके, पुणे शहराध्यक्ष धीरज घाटे, जिल्हा सरचिटणीस ताराचंद कराळे, जिल्हा सरचिटणीस संजूभाऊ रौंदळ, जिल्हा सरचिटणीस आशिष माळवदकर, उपजिल्हाध्यक्ष भगवान घोलप, तालुकाध्यक्ष संतोषनाना खैरे, डॉ. पंजाब कथे, दिलीप गांजळे उपस्थित होते. ग्रामीण भागातील सामान्य युवकाला ही संधी दिल्याबद्दल गणेश कवडे यांनी सर्व वरिष्ठांचे धन्यवाद व्यक्त केले.

भारतीय जनता पक्षाचे जे ब्रीद वाक्य आहे 'प्रथम राष्ट्र,नंतर पक्ष,शेवटी स्वतः ' याप्रमाणे कार्य करणार असल्याची ग्वाही यावेळी त्यांनी दिली.कार्यक्षेत्रात युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष अनुपजी मोरे आणि पुणे जिल्हा अध्यक्ष शरदभाऊ बुट्टे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली युवा मोर्चाचे संघटन मजबूत करण्यासाठी आणि भारतीय जनता पक्षाचे विचार तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी सर्वांना सोबत घेऊन सर्वांच्या सहकार्याने काम करणार असल्याचे ते म्हणाले.

## पद्मश्री नामदेव ढसाळ रणांगणावर लढणारा कवी होता

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** पद्मश्री नामदेव ढसाळ हा काचेच्या बंगल्यात एसीत बसून लिहिणारा कवी नव्हता. तर तो आयुष्यच्या रणांगणावर लढणारा कवी होता. असे प्रतिपादन ज्येष्ठ कवी व समीक्षक केशव सखाराम देशमुख यांनी राजगुरुनगर येथे केले.

पद्मश्री नामदेव ढसाळ जयंती निमित्त महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या राजगुरुनगर शाखा व स्व प्रा नानासाहेब गोरडे सार्वजनिक ग्रंथालय तर्फे दिल्या जाणाऱ्या विविध वाङ्मय पुरस्कारांचे वितरण नुकतेच करण्यात आले. या प्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. शिव व्याख्याते गुलाबराव वळसे, साहित्यीक अरुण बोऱ्हाडे, ॲड. सतिश गोरडे, पुरुषोत्तम सदाफुले, डी. के. वडगावकर व साहित्य परिषदेचे अध्यक्ष संतोष गाढवे यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

याप्रसंगी धनाजी घोरपडे, सचिन शिंदे, किरण भावसार, भारत सातपुते, संतोष आळंजकर, डॉ. राजेंद्र माने यांना साहित्य पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. तर पिंपरी येथील महात्मा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ पांडुरंग भोसले यांच्या जीवन गौरव पुरस्कारासह बाळासाहेब सांडभोर, राजन जांभळे, सुनंदा थिगळे, महेंद्र भारती, के.डी. सरोदे, वंदना वाघचौरे, अतुल गार्डी, आनंद वाव्हळ यांना विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले. कवी बाबाजी शिंदे, लखण जाधव, धर्मनाथ पवळे यांनी संयोजन केले. प्रा. कविता कडलग यांनी सूत्रसंचालन केले, तर मधुकर गिलबिले यांनी आभार मानले.



राजगुरुनगर येथे नामदेव ढसाळ जयंती निमित्त साहित्यिकांचा सन्मान करताना मान्यवर.

# नागरिक आणि प्रशासनात यांच्यात सुसंवाद हवा




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** अधिकारी आणि नागरिक यांच्या मध्ये सुसंवाद असला पाहिजे. तातडीने कोणताही निर्णय घेणे अडचणीचे ठरते. प्रश्न, समस्या सुटणार आहेत. मात्र त्यासाठी मर्यादित अवधी देणे आवश्यक आहे. तुम्ही विश्वास ठेवा, आम्ही विश्वासाने काम करू, असा विश्वास खेडच्या तहसीलदार ज्योती देवरे यांनी लोकशाही दिनाच्या निमित्ताने उपस्थित नागरिकांना दिला.

खेड पंचायत समितीच्या राजा शिव छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिन साजरा झाला. यावेळी उपस्थित नागरिकांशी संवाद साधताना तहसीलदार ज्योती देवरे बोलत होत्या. गटविकास अधिकारी विशाल शिंदे, चाकणचे पोलिस निरीक्षक नाथा घार्गे, खेडच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक स्नेहल राजे, सहाय्यक सहकारी दुय्यम निबंधक सचिन सरसमकर, निवासी नायब तहसीलदार मदन जोगदंड, नायब तहसीलदार राम बीजे, नायब तहसीलदार रवींद्र मोरे, कृषी अधिकारी नंदू वाणी, पशुवैद्यकीय अधिकारी योगेश शेळके, महिला बाल विकास अधिकारी अनिकेत पालकर, दुय्यम निबंधक वंदना पोळ, सुनील परदेशी, म्हाळुंगेचे उप निरीक्षक पोपट काळे,महावितरण चे उपअभियंता उत्तम मंचरे, नितीन परदेशी, सुनील कोळी, राहुल लामखेडे यांच्यासह बांधकाम, वन विभाग, चाकण आळंदी नगर परिषद अधिकारी,तालुक्यातील विविध प्रश्न घेऊन आलेले नागरिक मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.

ॲड गणेश सांडभोर, प्रकाश पाचारणे, प्रशांत नगरकर, राजेंद्र सुतार, सतीश चांभारे, सिद्धेश कर्नावट, दत्तात्रय साबळे, अमित टाकळकर, भिकाजी गाढवे, यशवंत पवळे, रमेश बोडसे यांनी वाहतूक समस्या मांडल्या.

“ पुढील लोकशाही दिन भीमाशंकर येथे होणार असून तालुक्यात इतरही गावांमध्ये लोकशाही दिन कार्यक्रम घेतला जाईल. सामाजिक शांतता बिघडवणाऱ्या व्यक्तीवर कारवाई करण्याचा अधिकार आहे. त्याची अंमलबजावणी केली जाईल. राजगुरूनगर परिषद हद्दीतील समस्या सोडवण्यासाठी नगर परिषदेने तात्काळ कार्यवाही सुरु करावी.

**-ज्योती देवरे,**
तहसीलदार, खेड

# सफाई कामगारांच्या सन्मानासाठी...

**कचरा वेचणाऱ्या महिला, सफाई कामगार यांच्या कामाचं महत्त्व वादातीत आहे. ते स्वच्छतेचे, पर्यावरणाचे पाईक आहेत. पण या समुदायाला योग्य तो सन्मान मिळत नाही. त्यांना साधी सुरक्षाही मिळत नाही. त्यांच्या घरात मूलभूत सोयींचीही वानवा असते. ही परिस्थिती नलिनी शेखर यांना बोचत होती. शहरांच्या स्वच्छतेत मोलाची भर घालणाऱ्या या कामगारांसाठी काहीतरी करण्याच्या इच्छेतून 'हसिरू दल' ही संस्था सुरू झाली.**



'पर्यावरणाचे पाईक' असा 'हसिरू दल' या कन्नड शब्दाचा अर्थ. आपला परिसर आणि पर्यायाने शहर स्वच्छ ठेवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात ते सफाई कामगार. मात्र त्यांच्या कामाची दखल घेतली जात नाही. हे लोक झाडूने रस्ता झाडत असतात. घराघरातला कचरा गोळा करतात. पण त्यांचा मान काही राखला जात नाही. सफाई कामगारांनी संप केला किंवा काही दिवस सुट्टी घेतली तर परिसरात घाण साचलेली असते. एवढं होऊनही त्यांच्या कामाचं मोल कोणाच्या लक्षात येत नाही. समाजातला हा घटक उपेक्षित रहातो. असंख्य अनोळखी चेहरे आपल्यासाठी झटत असतात आणि आपण मात्र त्यांना साधा सन्मानही देऊ शकत नाही.

बंगळूरूच्या नलिनी शेखर यांना ही बाब खटकत होती. सफाई कामगाराचं रोजंदारीवर चालणारं काम, त्यांच्या घरातली मूलभूत सुविधांची वानवा याची त्यांना खंत वाटायची. समाजातली ही दरी कमी करण्यासाठी त्यांनी 'हसिरू दल' या सफाई कामगारांसाठी काम करणाऱ्या सेवभावी संस्थेची स्थापना केली. २०११ मध्ये ही संस्था सुरू झाली. कचरा वेचणाऱ्यांच्या सुरक्षेसाठी तसंच त्यांना मुख्य प्रवाहात सामावून घेण्यासाठी ही संस्था काम करते. आजवर या संस्थेने दहा हजार सफाई कामगारांच्या आयुष्यावर प्रभाव टाकला आहे. दर आठवड्याला या संस्थेचे कार्यकर्ते सफाई कामगारांच्या जवळपास चार हजार कुटुंबांना भेटी देतात.


**मानिनी ||**

कचरा व्यवस्थापनाचे नियम अस्तित्त्वात येण्याआधीपासूनच नलिनी कचरा वेचणाऱ्यांसोबत काम करायच्या. घनकचरा व्यवस्थापनविषयक कायदा येण्याच्या सात वर्षं आधी म्हणजे १९९३ मध्ये त्यांनी कचऱ्याच्या विभागणीबाबत सफाई कर्मचाऱ्यांशी संवाद साधला होता. लग्नानंतर त्या काही काळ पुण्यात वास्तव्यास होत्या. त्यावेळी एसएनडीटी विद्यापीठात प्राध्यापिका असताना सफाई कामगार हा आपल्या समाजातला सर्वात दुर्लक्षित घटक असल्याचं त्यांच्या लक्षात आलं आणि या घटकाच्या कल्याणासाठी काम करण्याचा विचार त्यांच्या मनात आला. अनेक लहान मुलंही कचरा वेचण्याचं काम करत असल्याने नलिनी यांनी त्यांच्या आयुष्यात बदल घडवण्यासाठी कंबर कसली.

'हसिरू दल'ने सफाई कामगारांच्या आयुष्यात बदल घडवला आहे. त्यांच्या मुलांना शिक्षण देण्यासाठी ही संस्था झटते. त्यांच्या प्रयत्नांमुळे बंगळूरू महानगरपालिकेचे कचरा व्यवस्थापनासाठीचे वर्षाला ८४ कोटी रुपये वाचतात. सफाई कामगारांनी स्वावलंबी व्हावं, त्यांना उद्योजकतेचे धडे मिळावेत यासाठीही ही संस्था प्रयत्नशील आहे. 'हसिरू दल'ला आपला आवाका वाढवायचा आहे. देशभरातल्या सफाई कामगारांपर्यंत पोहोचायचं आहे. समाजातल्या या दुर्लक्षित घटकासाठी कार्यरत असणाऱ्या नलिनी शेखर याचं कार्य वाखाणण्याजोगं आहे.

**लिप केअर ||**

## जपा ओठांचं सौंदर्य



ओठांना फक्त थंडीतच जपायचं असं नाही तर प्रत्येक ऋतूत त्यांची काळजी घ्यायला हवी. ओठांवरची त्वचा खूप पातळ आणि नाजूक असते. तिचा उन्हापासून बचाव व्हायला हवा. यासाठी किमान ३० एसपीएफ असणाऱ्या लिप बामचा वापर करा. ओठांमध्ये नैसर्गिक तेल नसल्यामुळे त्यातला ओलावा टिकवण्यासाठी बाह्य उपाय करावे लागतात. झोपण्याआधी मेक अप रिमूव्हरने लिपस्टिक काढून टाका. रात्रभर ओठांना ओलावा देणारा लिप बाम लावा. ओठांवरून वारंवार जीभ फिरवू नका. यामुळे ओठ अधिक कोरडे पडतात.

**स्मार्ट टिप्स ||**

## साड्यांचा असाही वापर

जुन्या साड्यांचं काय करावं, हा प्रश्न महिलांना कायमच भेडसावत असतो. काही जणी या साड्यांचा पंजाबी ड्रेस किंवा इव्हिनिंग गाऊन शिवतात. हे प्रकारही ट्राय करून झाले असतील तर या साड्यांचा थोडा हटके वापर करता येईल. कल्पनाशक्ती



लढवून साड्यांपासून सुंदर पडदे तयार करा. रंगीबेरंगी साड्यांचा वापर करून तुम्ही घराची रंगत वाढवू शकता. साड्यांच्या छान बेडशीट्स करता येतील. यामुळे तुमच्या बेडरुमला रॉयल लूक मिळेल. कलात्मकता असेल तर साड्यांपासून छान कलाकृती तयार करता येतील. साड्यांपासून लँप शेड, कुशन कव्हर, टेबल मॅटही तयार करता येतील.

**लाईफस्टाईल ||**

## भाज्या ठेवा ताज्या



मैत्रिणींनो, आपण एकाच वेळी बऱ्याच भाज्या आणतो. या भाज्यांचा ताजेपणा टिकवून ठेवण्यासाठी बरेच उपाय केले जातात. फ्रीजमध्ये ठेवल्यानंतर भाज्यांना सुरकुत्या पडतात. त्या शिळ्या दिसू लागतात. अशावेळी त्यांचा ताजेपणा टिकवून ठेवण्यासाठी विविध उपाय करता येतील. हिरव्या पालेभाज्या कागदावर किंवा फडक्यावर पसरवून ठेवा. त्यांची पानं एकमेकांपासून लांब ठेवा. भोपळी मिरची, वांगी, काकडी या भाज्या सुती कापडात किंवा पिशवीत ठेवा. बटाटे लसणासोबत ठेवल्याने बराच काळ ताजे रहातात. टॉमेटो प्लास्टिक पिशवीत ठेऊन पिशवीला छोटी छिद्र पाडा.

# कसं निवडायचं सिरम

क्लिंजर आणि मॉईश्चरायझरच्या मधला टप्पा म्हणजे सिरम. त्वचेची काळजी घेण्यासाठी आणि उजळवण्यासाठी सिरमचा वापर करायला हवा. बाजारात वेगवेगळ्या प्रकारची सिरम उपलब्ध आहेत. त्यामुळे कोणतं सिरम घ्यायचं, असा प्रश्न पडणं अगदी साहजिक आहे. त्यातच महाग म्हणजे चांगलं का, हा प्रश्न स्वत:लाच विचारून बघा. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे आपल्या त्वचेच्या पेशी पुनरूज्जीवीत व्हायला कमीत कमी २८ दिवसांचा काळ लागतो. आसपासचं वातावरण आणि जीवनशैली यामुळे हा कालावधी वाढूही शकतो. त्यामुळे स्कीन केअर प्रोडक्टचा प्रभाव जाणून घेण्यासाठी ते महिनाभर तरी वापरायला हवं. आपल्या त्वचेनुसार योग्य सिरमची निवड कशी करावी, याबाबत...

**स्किन केअर ||**

✽ कोरडी त्वचा असलेल्यांनी हायअॅल्युरॉनिक ॲसिडवालं सिरम निवडावं. या ॲसिडमुळे त्वचेतलं पाण्याचं प्रमाण कमी होत नाही. त्वचेतला ओलावा टिकून राहतो.

✽ उन्हाशी संपर्क, चुकीची जीवनशैली तसंच अनुवांशिक कारणांमुळे त्वचा काळवंडते. अशा वेळी 'क' जीवनसत्त्व असलेली म्हणजे एल ॲस्कॉर्बिक ॲसिड असलेली सिरम वापरावीत. या घटकामुळे तुमची त्वचा उजळते.

✽ अँटी एजिंग क्रीम्समुळे त्वचा पहिल्यासारखी झाली नाही तरी त्वचेचं तारूण्य आणि तजेला टिकून राहण्यास मदत होते. त्वचेचं तारूण्य टिकवण्यासाठी नाईट सिरम वापरा.



✽ संवेदनशील त्वचा असलेल्यांनी ड्राय ऑईल ट्राय करावं. त्यात कोल्ड प्रेस्ड सुपरफुड सीड ऑईल्स असणं गरजेचं असतं. हलकी सिरम वापरावीत.

✽ सर्वसामान्य त्वचेचं वरदान लाभलं असेल आणि त्वचेचा पोत अधिक सुधारावा असं वाटत असेल तर ग्लायकोलिक ॲसिडवाली सिरम वापरावी. अशा सिरममुळे मृत त्वचा दूर होते. यामुळे त्वचेवरची छिद्रं बंद होत नाहीत.



सध्या बऱ्याच समारंभांमध्ये वेलकम ड्रिंकने पाहुण्यांचं स्वागत केलं जातं. विविध प्रकारचे ज्यूस, सरबतं, फ्रूट पंच यांची रेलचेल असते. घरगुती कार्यक्रमात किंवा सहज घरी आलेल्या पाहुण्यांच्या स्वागतासाठी तुम्हीही वेगवेगळ्या पेयांचा शोध घेत असाल. अशावेळी गारेगार किवी स्मूदी पाहुण्यांची रसना तृप्त करू शकते. साधी, सोपी आणि झटपट होणारी ही रेसिपी तुम्हीही करून बघा.

**रसगंधा ||**

**साहित्य:** २-३ किवी फ्रूट, ५० ग्रॅम खडीसाखर, पाव लीटर दूध, कोणत्याही फ्लेवरचं आईस्क्रीम, सजावटीसाठी चेरी, स्ट्रॉबेरी, सुकामेवा, किवीचे पातळ काप यापैकी काहीही.

**कृती:** किवी फळाची सालं काढून घ्या. ज्यूसरच्या भांड्यात किवी, दूध, खडीसाखर आणि आईस्क्रीमचा गोळा घाला. फिरवून घ्या. हे सगळे घटक एकजीव होऊन छान शेक तयार व्हायला हवा. आता ही स्मूदी एका भांड्यात किंवा जारमध्ये काढून घ्या. ग्लासमध्ये ओता. चेरी, स्ट्रॉबेरीचे तुकडे, सुक्यामेव्याचे काप, ब्लॅकबेरी, किवीचे पातळ काप यापैकी कशानेही सजावट करा. किवी या फळात अनेक आरोग्यदायी घटक असतात. यातल्या फायबरमुळे लवकर भूक लागत नाही. रक्तातल्या साखरेचं प्रमाणही किवीमुळे नियंत्रणात रहातं. यामुळे किवी स्मूदी हा हेल्दी आणि टेस्टी ऑप्शन आहे.



# चलती ट्रेंडी टॉप्सची

छानसा टॉप तुमचा संपूर्ण लूक बदलून टाकतो. योग्य ॲक्सेसरीज आणि बॉटम कॅरी करून तुम्ही उठून दिसू शकता. सोबर टॉप्सपासून स्टायलिश टॉप्सपर्यंत प्रचंड व्हरायटी तुम्हाला पहायला मिळते. अशाच काही हटके टॉप्सवर नजर टाकू या.

**स्टाईल स्टेटमेंट ||**

✽ भरजरी आणि टेक्स्चर्ड पॅटर्नची आवड असेल तर तुम्ही नक्षीकाम केलेले टॉप्स निवडू शकता. बॉटमवर त्याच रंगाचा टॉप घालता येईल किंवा ड्युअल टोनही कॅरी करता येईल.

✽ पिवळ्या रंगाच्या टॉप्सची कायमच चलती असते. या रंगात स्टायलिश पॅटर्न्सची निवड करा. वेगवेगळे कट्स ट्राय करा.

✽ फ्लेअर्ड किंवा घेरवाले टॉप्स हा सुद्धा मस्त ऑप्शन आहे. वेगवेगळे प्रिंट्स, स्ट्राईप्स, चेक्समध्ये खेळा. स्लीव्हजचे वेगळे पॅटर्नही ट्राय करा.

✽ साध्या प्लेन व्हाईट टॉपलाही स्टायलिश बनवता येईल. ट्रेंडी गळे, नव्या जमान्याच्या स्लीव्हज असणारे व्हाईट टॉप्स निवडा.

✽ थोडा बोल्ड लूक आवडत असेल तर ऑफ शोल्डर कट्सवाले टॉप्स घ्या. डेनिम्स, शॉर्टस, स्कर्ट किंवा ट्राउजर्सवर ते घालता येतील.

# जबाबदार कर्मचारी बना

ऑफिसमध्ये तुम्ही समर्पित भावनेने काम करता. कामाच्या वेळा पाळता, सहकाऱ्यांशी तुमचे चांगले संबंध असतात. एवढ्या गुणांवरून तुमची गणना चांगल्या कर्मचाऱ्यांमध्ये होऊ शकते का? खरं तर नाही. कारण ऑफिसमध्ये काही नियम पाळावे लागतात. योग्य वर्तणूक असावी लागते. प्रत्येक ऑफिसमधलं वातावरण वेगळं असतं. स्टार्टअप्स, कॉर्पोरेट विश्वात कर्मचाऱ्यांची विशेष काळजी घेतली जाते. त्यांना मोकळीकही असते. मात्र काही गोष्टींचं पालन केलं तर तुमचा सन्मान अधिक वाढू शकतो. ऑफिसमधल्या काही एटिकेट्सविषयी...

**एटिकेट्स ||**

✽ प्रत्येकाची वैयक्तिक स्पेस जपायला हवी. सहकाऱ्यांच्या खाजगी बाबीत फार लक्ष घालू नये. त्यांना वैयक्तिक प्रश्न विचारू नयेत. एखाद्या मैत्रिणीला मिठी मारणं आवडत असेल तर दुसरीला अशी जवळीक नको वाटत असेल. प्रत्येकाचं व्यक्तिमत्त्व वेगळं असतं. त्यामुळे ऑफिसमधल्या प्रत्येक सहकाऱ्याचं निरिक्षण करून त्यांच्यासोबत कसं वागायचं हे ठरवा.

✽ ऑफिस हे मैत्री करण्याचं उत्तम ठिकाण असतं. विविध विषयांवर गप्पा मारता येतात. मात्र काही विषय ऑफिसच्या भिंतींबाहेर ठेवणंच योग्य असतं. कोणत्याही जाती किंवा धर्मावर शेरेबाजी करू नका. वैयक्तिक अपमान होईल असे विनोद करू नका. वैयक्तिक अडचणींची चर्चा ऑफिसमध्ये नकोच. राजकीय, धार्मिक टिपणी टाळा. वरिष्ठांबाबतही फार चर्चा करू नका. यामुळे तुम्हाला कोणी कंटाळवाणं समजणार नाही तर जबाबदार कर्मचारी म्हणून तुम्ही ओळखल्या जाल.



✽ स्टार्ट अप्स, कॉर्पोरेट जगतात ड्रेसकोड्चं बंधन नसतं. पण फार कॅज्युअल कपडे घालू नयेत. ऑफिसमध्ये कपड्यांबाबत नियम नसले तरी आपण फार भडक दिसणार नाही याची काळजी घ्यावी. कपड्यांच्या निवडीमुळे तुमची प्रतिमा खराब होऊ शकते. वरिष्ठ, व्यवस्थापनावर चुकीचा प्रभाव पडतो. ही बाब पुरुष आणि महिला अशा दोहोंनाही लागू पडते.

✽ स्मार्टफोनचा मोह टाळा. ऑफिसमध्ये गरजेपुरता फोन वापरा. मोबाईल डाटा बंद करून ठेवा. शक्य असेल तर फोन ड्रॉवरमध्ये ठेऊन द्या. फोन सायलंट मोडवर ठेवा. यामुळे तुमच्या सहकाऱ्यांना त्रास होणार नाही. तसंच कामंही झटपट होतील.



बाजारात विविध प्रकारचे फेस मास्क मिळतात. मात्र आपल्या गरजेनुसार आणि त्वचेच्या प्रकारानुसार त्याची निवड करायला हवी. फेस मास्क निवडताना कोणत्या गोष्टींकडे लक्ष द्यायला हवं याविषयी...

# तंत्र फेस मास्क वापराचं

उद्देशानुसार फेस मास्कचा प्रकार बदलतो. म्हणजे त्वचेला ओलावा देण्यासाठी, मृत त्वचा काढण्यासाठी, त्वचा उजळवण्यासाठी वेगळा फेस मास्क वापरायचा असतो. त्यामुळे फेस मास्क लाऊन आपण काय साधणार आहोत, हे आधी समजून घ्या. त्वचेला ओलावा द्यायचा असेल तर मॉईश्चरायझिंगचे घटक असणाऱ्या फेस मास्कचा वापर करा. चेहरा उजळवायचा असेल तर क जीवनसत्त्व किंवा कॉजिक ॲसिडयुक्त फेस मास्क निवडा. मृत त्वचा काढण्यासाठी रेटिनॉल किंवा अ जीवनसत्त्व असणारा फेस मास्क विकत घ्या. फेस मास्कमधले प्रमुख घटकच त्यात शोषले गेलेले असतात. इतर फक्त नावालाच असतात. दुसरं म्हणजे फेस मास्ककडून वास्तववादी अपेक्षा ठेवा. त्यानुसार त्यातले घटक निवडा.

**ब्युटी टॉक ||**

कोरडी त्वचा असणाऱ्यांनी क्रीम किंवा शीट मास्क वापरावा. यामुळे तुमच्या त्वचेला अतिरिक्त ओलावा मिळतो. तेलकट त्वचा किंवा मुरुमांचा त्रास असेल मड किंवा क्ले मास्कची निवड करावी. यामुळे तुमचा चेहरा नितळ दिसू लागतो. क्ले मास्क अतिरिक्त तेल शोषून घेतो. पण त्याचा अतिवापर टाळावा. त्वचेवरची रोमछिद्र उघडण्यासाठी चारकोल फेसमास्क वापरता येईल. संवेदनशील त्वचा असेल तर नैसर्गिक घटकांनी बनवलेला फेस मास्क वापरा. मास्क चेहऱ्यावर फार वेळ ठेऊ नका. सुरूवातीला मास्क २० मिनिटं ठेवा. मग हळूहळू वेळ वाढवा. शीट किंवा नाईट मास्क आठवड्यातून एकदा वापरायचे असतात. हायड्रेटिंग मास्क आठवड्यातून तीन किंवा चार वेळा वापरता येतात. फेस मास्क वापरण्याआधी चेहरा क्लिंजिंग क्रीमने स्वच्छ धुवून घ्या. यामुळे चेहऱ्यावरची मृत त्वचा, धूळ निघून जाईल आणि फेस मास्क अधिक परिणामकारक ठरेल.



# रिकाम्या पोटी काय खावं?

महिला फिटनेसच्या बाबतीत दक्ष झाल्या आहेत. उत्तम आरोग्यासाठी तसंच वजन कमी करण्यासाठी सकाळी उठल्यावर रिकाम्या पोटी पौष्टिक असं काहीतरी खाण्याचा सल्ला बरेच तज्ज्ञ देतात. काही धने-जिऱ्याचं पाणी प्यायला सांगतात तर काही लिंबू आणि मध घालून पाणी पिण्याचा सल्ला देतात. अशा वेळी सकाळी उठल्यानंतर नेमकं काय खावं, याबाबतचं मार्गदर्शन...

✽ रात्री भिजवलेले मेथीदाणे सकाळी रिकाम्या पोटी चावून खा. यामुळे पोटाच्या तक्रारी आणि गुडघेदुखीची समस्या दूर व्हायला मदत होईल.

✽ फळांमध्ये तुम्ही सफरचंद खाऊ शकता. सफरचंदात क जीवनसत्त्व कमी प्रमाणात असलं तरी अँटीऑक्सिडंट्स आणि फ्लेवोनाइड्स भरपूर प्रमाणात असतात. रिकाम्या पोटी खाल्ल्याने सफरचंदातले हे घटक शरीरात उत्तम प्रकारे शोषले जातात.

✽ रिकाम्या पोटी दोन लसूण पाकळ्या चावून खा. यामुळे तुम्हाला भरपूर ऊर्जा मिळते. लसणातल्या औषधी घटकांमुळे अनेक विकारांपासून बचाव होतो.

✽ सकाळी उठल्यानंतर ओवा घातलेलं पाणी प्या. यामुळे पोटाचे विकार चार हात लांब रहातील. तसंच वजन कमी होण्यासोबतच मधुमेहालाही दूर ठेवता येईल. ओव्यामुळे हृदयविकारालाही आळा बसू शकतो. महिलांच्या आरोग्यासाठी ओवा गुणकारी समजला जातो.

**हेल्थ टॉक ||**

✽ सकाळी उठल्यानंतर रिकाम्या पोटी चहा-कॉफी पिणं टाळा. चहापेक्षाही सकाळी कॉफी पिऊ नका. चहा-कॉफीमुळे शरीरात ॲसिडची निर्मिती होते. कॉफीतल्या कॅफेनमुळे पोटाचा अल्सर होऊ शकतो.


✽ रिकाम्या पोटी टॉमेटो खाऊ नये. यात ॲसिडचं प्रमाण जास्त असल्यामुळे त्रास होऊ शकतो.

✽ रताळंही रिकाम्या पोटी खाऊ नये. यातल्या पेक्टिन आणि टॅनिनसारख्या घटकांमुळे गॅस्ट्रिक ॲसिडची समस्या वाढते.

✽ सकाळी उठल्यानंतर अनेक जणी केळं खातात. मात्र हे चुकीचं आहे. केळ्यातलं मॅग्नेशियम शरीरातल्या कॅल्शियम आणि मॅग्नेशियमचं संतुलन बिघडवतं.

✽ रिकाम्या पोटी दही खाऊ नये. यामुळे पोटात गोळे येणं, पोटदुखी अशा समस्या उद्भवू शकतात.

# माझं काही चुकतंय का?



आठ महिन्यांपूर्वी माझं लग्न झालं. आमचं अरेंज मॅरेज आहे. माझे पती आणि सासू-सासरे खूप प्रेमळ आहेत. पण मी वरचेवर माझ्या आईवडिलांना भेटू नये, असं माझ्या सासूबाईंचं मत आहे. माझं त्यांना भेटायला जाणं सासूबाईंना आवडत नाही. आमचं नुकतंच लग्न झाल्याने मी जास्तीत जास्त वेळ सासरी घालवावा असं त्यांना वाटतं. दुसरीकडे मला माझ्या आई-वडिलांची खूप आठवण येते आणि दर वीकेंडला त्यांना भेटण्याचा माझा प्रयत्न असतो. दुर्दैवाने सासरे आणि पतीचा सासूबाईंना पाठिंबा आहे. हे सर्व जण माझ्यात अपराधीपणाची भावना जागवत आहेत. मी काय करू?

– वैवाहिक जीवन प्रसंगी

**समुपदेशन ||**

आव्हानात्मक असू शकतं. पण तू काही गोष्टी करू शकतेस. आईवडिलांची आठवण येत असल्याचं तू पतीला स्पष्टपणे सांग. नव्या घरात रुळायला थोडा वेळ लागणार असल्याचंही त्यांना सांग. आधी तुझ्या अपेक्षा नवऱ्याला सांग. मग सासूबाईंशी मोकळेपणाने बोल. तुझ्या नव्या कुटुंबासोबत चांगला वेळ घालव. त्यांना समजून घे. यामुळे तुझे त्यांच्याशी चांगले संबंध प्रस्थापित होतील. एकमेकांना समजून घेणं सोपं जाईल. गरज लागली तर समुपदेशकांनाही भेट. आईवडिलांची आठवण येणं आणि त्यांना भेटायला जाणं यात काहीच गैर नाही. मुलगी म्हणून तू तुझी जबाबदारी पार पाडायला हवी. त्यामुळे अपराधीपणाची भावना मनातून काढून टाक.



## किरण नवगिरेची वादळी खेळी

महाराष्ट्राच्या संघाकडून खेळणाऱ्या पुण्याच्या किरण नवगिरेला आज महिला प्रीमिअर लीगमध्येसलामीवीर म्हणून बढती दिली गेली. यूपी वॉरियर्सचे प्रतिनिधित्व करणाऱ्या किरणने या संधीचं सोनं केलं आणि दिल्ली कॅपिटल्सच्या गोलंदाजांचा समाचार घेतला. तिच्या फटकेबाजीमुळे यूपी संघाने दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध त्यांचा पॉवर प्लेमधील आतापर्यंतचा सर्वोच्च स्कोअर नोंदवला. यूपी वॉरियर्सने पॉवरप्लेमध्ये ६६ धावा केल्या. नवगिरेने डावाची सुरुवात अत्यंत जिद्दीने केली आणि जगातील सर्वोत्तम गोलंदाजांपैकी एक असलेल्या मॅरिझाने कॅपला सलग दोन चौकार मारले.तिने शिखा पांडेलाही दोन चौकार मारले आणि वॉरियर्सला चांगली सुरुवात करून दिली. ३० वर्षीय खेळाडू तिच्या बॅकफूटवर चांगला खेळ करत होती. किरणने २७ चेंडूंत ६ चौकार व ३ षटकार खेचून ५१ धावांची वादळी खेली केली. त्यानंतर श्वेता सेहरावत (३७) व चिनेल हेन्री ( नाबाद ३३) यांनी चांगली फटकेबाजी करताना संघाला २० षटकांत ७ बाद १६६ धावांपर्यंत पोहोचवले.

# टीम इंडीयाची विजयी सुरुवात

## शुभमन गिलची शतकी खेळी : मोहम्मद शमीच्या ५ विकेट्स

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क






**दुबई :** चॅम्पियन ट्रॉफी साठी मंगळवारी सुरु झालेल्या साखळी फेरीतील भारताचा पहिला सामना काल बांगलादेशविरुद्ध खेळला गेला. टीम इंडिया ने लौकिकाला साजेस खेळ करत बांग्लादेशावर विजय मिळवत चॅम्पियन ट्रॉफी च्या दिशेने विजयी सुरुवात केली.

चॅम्पियन्स ट्रॉफीच्या दुसऱ्या सामन्यात बांगलादेशने भारताला २२९ धावांचे लक्ष्य दिले. गुरुवारी दुबईमध्ये बांगलादेशने फलंदाजीचा निर्णय घेतला. ३६ धावांत ५ विकेट गमावूनही संघाने ४९.४ षटकांत २२८ धावा केल्या. तौहीद हृदॉयने शतक झळकावले. त्याने ११८ चेंडूत १०० धावांची खेळी केली. झाकीर अली ६८ धावा करून बाद झाला.

भारताने १५ षटकांनंतर एक विकेट गमावून ८४ धावा केल्या आहेत. शुभमन गिल आणि विराट कोहली क्रीजवर आहेत. रोहित शर्मा ३६ चेंडूत ४१ धावा करून बाद झाला. त्याला तस्किन अहमदने रिशाद हुसेनच्या हाती झेलबाद केले.

रोहितने एकदिवसीय कारकिर्दीत ११ हजार धावा पूर्ण केल्या आहेत. त्याने २६१ डावात ही कामगिरी केली. विराट कोहलीनंतर सर्वात जलद ११ हजार धावा करणारा तो फलंदाज ठरला आहे. कोहलीने १४ हजार वनडे धावा केल्या.

तसेच शामीने आत्तापर्यंत अनेकदा आयसीसी स्पर्धांमध्ये शानदार कामगिरी केली आहे. त्याने आता चॅम्पियन्स ट्रॉफीमध्येही अशीच सुरुवात केली आहे. त्याने पुनरागमनात ५ विकेट्स घेण्याची कामगिरी केली आहे. या सामन्यात बांगलादेशने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. पण शमीने पहिल्याच षटकात बांगलादेशला मोठा धक्का दिला. त्याने सौम्य सरकारला शून्यावरच केएल राहुलच्या हातून झेलबाद केले. त्यानंतर मेहदी हसन मिराजलाही त्यानेच ५ धावांवर शुभमन गिलच्या हातून झेलबाद करत बांगलादेशला तिसरा धक्का दिला होता.

अक्षर पटेलनेही दिलेल्या धक्क्यांमुळे बांगलादेशची अवस्था ५ बाद ३५ धावा अशी झाली होती. पण नंतर तौहिद हृदोय आणि जाकर अली या दोघांनी दीडशे धावांची भागीदारी केली. पण अखेर शमीनेच ही जोडी तोडली. त्याने जाकर अलीला ४३ व्या षटकात बाद केले. शमीने या सामन्यादरम्यान वनडे कारकिर्दीत २०० विकेट्स पूर्ण केल्या आहेत. त्याच्या आता १०४ सामन्यांत २०२ विकेट्स झाल्या आहेत. जाकर अली त्याची २०० वी विकेट ठरली. त्याने १०४ वनडे सामन्यात २०० विकेट्स घेतल्या आहेत.

## मनप्रीत अँड जीजीज जॅग्वार्स संघाला सलग दुसऱ्या वर्षी विजेतेपद



**पुणे :** पुना क्लब लिमिटेडच्या वतीने अकराव्या पुना क्लब प्रीमियर लीग क्रिकेट २०२५ स्पर्धेत अंतिम फेरीत मनप्रीत उप्पल(१-८ व नाबाद ४६) याने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर गतविजेत्या मनप्रीत अँड जीजीज जॅग्वार्स संघाने फोर ओक्स सेलर्स संघाचा ८ गडी राखून पराभव करत विजेतेपद संपादन केले. पुना क्लब क्रिकेट मैदानावर पार पडलेल्या या स्पर्धेत अंतिम फेरीत प्रथम फलंदाजी करताना फोर ओक्स सेलर्स संघाने ६ षटकात ६बाद ८५ धावा केल्या. यात शिव किर्लोस्करने १६ चेंडूत ७ षटकाराच्या मदतीने ४७ धावा, तारिक परवानीने २१ धावा काढून संघाच्या डावाला आकार दिला. जॅग्वार्सकडून मनप्रीत उप्पल(१-८), अर्शद अकलकोटकर(१-१२), सिध्दांत धर्मा (१-१७) यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला. हे आव्हान मनप्रीत अँड जीजीज जॅग्वार्स संघाने ५.२ षटकात 1बाद ८८ धावा करून पूर्ण केले. सलामीचे फलंदाज भार्गव पाठक(२१धावा), सिद्धांत धर्मा(नाबाद ११) यांनी पहिल्या विकेटसाठी २० चेंडूत ३१ धावांची भागीदारी केली. भार्गव पाठक २१ धावा काढून बाद झाला त्यावेळी संघाला विजयासाठी १६ चेंडूत ५७ धावांची आवश्यकता होती. तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीस उतरलेल्या मनप्रीत उप्पलने ९ चेंडूत २ चौकार व ६ षटकाराच्या मदतीने नाबाद ४६ धावा काढून संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. त्याला सिद्धांत धर्माने नाबाद ११ धावा काढून साथ दिली. या जोडीने १२ चेंडूत ५७ धावा काढून संघाला विजय मिळवून दिला. अष्टपैलू कामगिरी करणारा मनप्रीत उप्पल सामन्याचा मानकरी ठरला. स्पर्धेतील विजेत्या संघाला करंडक अशी पारितोषिके देण्यात आली. स्पर्धेचे पारितोषिक वितरण पूना क्लब लिमिटेडचे अध्यक्ष गौरव गढोक, क्लबच्या क्रिडा विभागाचे अध्यक्ष तुषार आसवानी यांच्या हस्ते करण्यात आले.

## भारताच्या साकेत मायनेनी व रामकुमार रामनाथन यांचे विजय




**पुणे :** महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना(एमएसएलटीए) यांच्या वतीने व क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र सरकार, पीएमसी, पीसीएमसी आणि पीएमडीटीए यांच्या संलग्नतेने आयोजित पीएमआरडीए पुरस्कृत महा ओपन एटीपी चॅलेंजर १०० पुरुष टेनिस स्पर्धेत मुख्य ड्रॉमध्ये दुसऱ्या फेरीत व्हॅलेंटीन वॅचेरोट, अॅलेक्सिस गॅलार्नौ, दलिबोर सेव्हर्सिना, इलिया सिमाकिन यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून आगेकूच केली. दुहेरीत भारताच्या साकेत मायनेनी व रामकुमार रामनाथन यांनी दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे बालेवाडी येथील टेनिस संकुलात सुरू असलेल्या या स्पर्धेत मुख्य ड्रॉमध्ये दुहेरीत पहिल्या फेरीत भारताच्या साकेत मायनेनी व रामकुमार रामनाथन या जोडीने बेल्जीयमच्या मायकेल गीर्ट्स व ग्रेट ब्रिटनच्या बिली हॅरिस यांचा ६-०, ६-४ असा पराभव करून आगेकुचक केली. साकेत व रामकुमार यांनी अवघ्या ५२ मिनिटांत मायकेल व बिली यांचे आव्हान संपुष्टात आणले. सामन्यात पहिल्या सेटमध्ये पहिल्याच गेममध्ये साकेत व रामकुमार यांनी मायकेल व बिली यांची सर्व्हिस भेदली. या सेटमध्ये साकेत व रामकुमार यांनी निर्विवाद वर्चस्व गाजवले. त्यांनी पुन्हा मायकेल व बिली यांची तिसऱ्या व पाचव्या गेममध्ये सर्व्हिस रोखली व स्वतःची सर्व्हिस राखत हा सेट ६-० असा एकतर्फी जिंकला. दुसऱ्या सेटमध्येदेखील साकेत मायनेनी व रामकुमार रामनाथन यांनी सुरेख खेळ केला.

### १६ वर्षाखालील टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत

## १५० हुन अधिक खेळाडू सहभागी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** एमएसएलटीए फर्ग्युसन कॉलेज पीएमडीटीए अखिल भारतीय मानांकन सुपर सिरीज १६ वर्षाखालील टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत देशभरांतून १५० हुन अधिक खेळाडूंनी आपला सहभाग नोंदवला आहे. ही स्पर्धा २२ ते २८ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत फर्ग्युसन कॉलेज टेनिस अकादमीत पार पडणार आहे.

स्पर्धेचे संचालक संग्राम चाफेकर यांनी सांगितले कि, स्पर्धेत महाराष्ट्र, तेलंगणा, तामिळनाडू, कर्नाटक, गुजरात, मध्यप्रदेश या ठिकाणांहून १५० हुन अधिक खेळाडू झुंजणार आहेत. ही स्पर्धा 16वर्षाखालील मुले व मुलींच्या एकेरी गटात होणार आहे. स्पर्धेतील विजेत्या व उपविजेत्या करंडक व प्रशस्तिपत्रक अशी पारितोषिके देण्यात येणार आहेत. स्पर्धेसाठी आयटीएफ व्हाईट बॅच रेफ्री वैशाली शेकटकर यांची निवड करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले.

खेळाडूंची मानांकन यादी खालीलप्रमाणे: मुले: १. मनन अग्रवाल(महा), २.आराध्य म्हसदे(महा), ३.मनन राय(मह), ४.वरद उंद्रे(महा), ५.वीरेन सूर्यवंशी(महा), ६.मलय मिंजरोला(गुजरात), ७. अगस्त्य चौधरी(गुजरात), ८.नीव गोगिया;

मुली: १.साजी जैन (मध्यप्रदेश), २.स्वानिका रॉय (महा), ३.ऋषिता पाटील (महा), ४.वृंदिका राजपूत (महा), ५.प्रार्थना खेडकर (महा), ६.नलयाझिनी के (तामिळनाडू), ७.मित्रविंदा सतीश (तामिळनाडू), ८.तेजस्वी मानेनी(तेलंगणा)

### मुलींमध्ये हुजूरपागा शाळेचे वर्चस्व; मुलांमध्ये आर्यन्स् वर्ल्ड स्कूल,

## न्यु इंग्लिश स्कूल, बीजेएस स्कूलला विजेतेपद!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** महाराष्ट्रीय मंडळाच्या चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्यावतीने आयोजित आणि कै. धनंजय दामले यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आंतर-शालेय आणि आंतर-महाविद्यालय 'ऑब्स्टीरेस' अडथळा सांघिक स्पर्धेत मुलींच्या तीनही गटामध्ये पी.एस. हुजूरपागा शाळेच्या लक्ष्मी रोड आणि कात्रजच्या संघांनी विजेतेपद मिळवून वर्चस्व गाजवले. मुलांमध्ये आर्यन्स् वर्ल्ड स्कूल (बिबवेवाडी), न्यु इंग्लिश स्कूल रमणबाग आणि भारतीय जैन संस्था (बीजेएस) स्कूल, वाघोली या संघांनी आपापल्या गटाचे विजेतेपद संपादन केले.

मुकूंदनगर येथील महाविद्यालयाच्या मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेच्या मुलींच्या इयत्ता तिसरी ते चौथी गटात पी.एस. हुजूरपागा, लक्ष्मी रोड संघाने १० मिनिटे ४५.५० सेकंद अशी वेळ नोंदवून विजेतेपद मिळवले. संघाच्या श्रावणी चव्हाण, आरोही शिंदे आणि तनिष्का जाधव यांनी सर्वोत्तम वेळ नोंदवली. इयत्ता पाचवी ते सातवी गटामध्ये हुजूरपागा, कात्रज शाळेच्या संघाने २१ मिनिटे २७.५० सेकंद अशी वेळ नोंदवली. मानसी ढेबे, समृद्धी शिवतारे आणि श्रावणी अंगोळकर यांची कामगिरी अव्वल ठरली. इयत्ता आठवी ते दहावी गटात हुजूरपागा स्कूल, लक्ष्मी रोड संघाने ५२ मिनिटे १३.२० सेकंद अशी अव्वल वेळ नोंदवून विजेतेपद मिळवले. संघाच्या आर्या दरेकर, नेहा गायकवाड आणि उर्वी गुजर यांची कामगिरी निर्णायक ठरली. प्रीथी शिर्के, आदिती मोहीते आणि आकांशा पवार यांनी आपापल्या गटामध्ये वैयक्तिक सर्वोत्कृष्ट वेळ नोंदवून पारितोषिक मिळवले.

मुलांमध्ये इयत्ता तिसरी ते चौथी गटात आर्यन्स् वर्ल्ड स्कूल, बिबवेवाडी संघाने पहिला क्रमांक मिळवला. संघाने १० मिनिटे ३२.३० सेकंद वेळ नोंदवली. इयत्ता पाचवी ते सातवी गटात न्यु इंग्लिश स्कूल रमणबाग संघाने १९ मिनिटे ०५.५० सेकंद वेळ नोंदवून विजेतेपद मिळवले. इयत्ता आठवी ते दहावी गटामध्ये बीजेएस स्कूल, वाघोली संघाने ३५ मिनिटे ५६.२० सेकंद वेळ नोंदवून विजेतेपद संपादन केले. मल्हार निजामपुरकर, प्रज्योत देशमुख आणि ज्ञानेश्वर डोके यांनी यांनी आपापल्या गटामध्ये वैयक्तिक सर्वोत्कृष्ट वेळ नोंदवून पारितोषिक मिळवले.

## राजा शिवछत्रपती क्रिकेट स्पर्धा उत्साहात

**खेड :** खेड तालुका पदवीधर प्राथमिक शिक्षक व केंद्रप्रमुख संघटनेच्या वतीने आंबेठाण, ता.खेड येथील क्रीडा संकुल मध्ये राजा शिवछत्रपती क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत ३०० प्राथमिक शिक्षक खेळाडूंनी सहभाग नोंदवला अशी माहिती पदवीधर प्राथमिक शिक्षक व केंद्रप्रमुख संघटनेचे जिल्हाध्यक्ष शांताराम नेहेरे आणि तालुकाध्यक्ष नारायण करपे यांनी दिली. क्रिकेट स्पर्धेचे हे ५ वे वर्ष आहे. खेड तालुक्याचे माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र मंडळाचे सदस्य नितीन गोरे, माजी सभापती अंकुश राक्षे , बाळकृष्ण वाटेकर, शिवसेना चाकण शहर प्रमुख महेश शेवकरी, उद्योजक दत्ता गवते, सरपंच सुनिल काळोखे,दिनेश ठाकूर, दत्तात्रय शिनगारे, हनुमंत कलवडे, संतोष कुंभार, मारुती दिघे, नामदेव गायकवाड आदींसह संघटनेचे सर्व पदाधिकारी, शिक्षक पत संस्था संचालक, कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. खेड तालुक्यातील ३०० शिक्षकांनी या क्रिकेट स्पर्धेत सहभाग घेतला. तालुक्यातील सर्व शिक्षक संघटनेचे पदाधिकारी, शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

- प्रथम क्रमांक - जय मल्हार रायडर्स
- द्वितीय क्रमांक - हुतात्मा राजगुरू फायटर
- तृतीय क्रमांक - माऊली चॅलेंजर्स
- चतुर्थ क्रमांक - भीमाशंकर वॉरियर्स/ मॅन ऑफ द सिरीज आणि फायनल मॅन ऑफ द मॅच - अतुल क्षीरसागर/ उत्कृष्ट फलंदाज - योगेश कोकणी/ उत्कृष्ट गोलंदाज - अनिल नाईकरे
- उत्कृष्ट यष्टीरक्षक - मंगेश शेंडे

## १० वर्षाखालील मुलांची आंतरक्लब क्रिकेट स्पर्धा : विजय क्रिकेट ॲकॅडमीची 'विजयपूर्णता'!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पुणे :** ट्वेन्टीफोर स्पोटर्स मॅनेजमेंट तर्फे आयोजित 'रायझिंग स्टार करंडक' १० वर्षाखालील मुलांच्या आंतरक्लब क्रिकेट स्पर्धेत विजय क्रिकेट ॲकॅडमी संघाने सीएसआर स्पोटर्स संघाचा चार गडी राखून पराभव केला आणि स्पर्धेचे विजेतेपद संपादन केले.

सिंहगड रोड येथील कोद्रे फार्म्स क्रिकेट मैदानावर झालेल्या या स्पर्धेत अंतिम सामन्यामध्ये विहान ताकवले याची अष्टपैलु खेळी विजय ॲकॅडमीसाठी 'विजयपूर्ण' ठरली. पहिल्यांदा फलंदाजी करताना सीएसआर स्पोटर्स संघाने १५ षटकामध्ये ६ गडी गमावून ९० धावांचे आव्हान उभे केले. सीएसआर संघाकडून विवान दांगट (२३ धावा), चेतन रेड्डी (१९ धावा) आणि विदीत रायकर (१६ धावा) यांनी धावांचे योगदान देत संघाचे आव्हान उभे केले. हे लक्ष्य विजय क्रिकेट ॲकॅडमीने १४.३ षटकात व ६ गडी गमावून पूर्ण केले. संघाला विजयी पथावर नेताना विहान ताकवले याने ३० धावांची, मानव सोळंकी याने २० धावांची आणि अनिश धायगुडे याने नाबाद १४ धावांची खेळी करून संघाचा विजय साकार केला.

स्पर्धेचे पारितोषिक वितरण कोद्रे फार्म्सचे निकीत कोद्रे, महेश इंगवले, विकास साठे आणि सचिन महाडीक यांच्या हस्ते करण्यात आले. स्पर्धेतील विजेत्या विजय क्रिकेट ॲकॅडमी आणि उपविजेत्या सीएसआर स्पोटर्स संघांना करंडक आणि मेडल्स् देण्यात आली. स्पर्धा संचालक आणि ट्वेन्टीफोर स्पोटर्चे संचालक उदय म्हात्रे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

## गतविजेत्या मुंबईवर स्पर्धेबाहेर होण्याचे संकट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** रणजी ट्रॉफी स्पर्धेच्या उपांत्यफेरीच्या सामन्यात विदर्भने गतविजेत्या मुंबई संघाला तगडे आव्हान दिले आहे. विदर्भाने दुसऱ्या डावात ९ बाद २९२ धावा उभारल्या ज्यामध्ये विदर्भाच्या यश राडोठने १५१ धावांची दीडशतकी खेळी केली, तर अक्षय वाडकरने अर्धशतक ठोकले. दोघांच्या मोठ्या खेळीच्या मदतीने विदर्भाने मुंबईसमोर ४०६ धावांवचे लक्ष्य ठेवले आहे. त्यामुळे मुंबई संघावर आता स्पर्धेबाहेर होण्याचे संकट ओढावले आहे.

मुंबईच्या फलंगदाजांना पहिल्या डावात विदर्भाला प्रत्युत्तर देण्यात यश आले नाही. सलामीवीर आकाश आनंदने शतक ठोकले. पण अजिंक्य रहाणे (१८), सूर्यकुमार यादव (०), शिवम दुबे (०) सारखे भारतीय फलंदाज स्वस्तात बाद झाले. मुंबईचा पहिला डाव विदर्भाने २७० धावांवर गुंडाळला व सामन्यात ११३ धावांची आघाडी घेतली.

काल दिवसाअंती पर्यंत दुसऱ्या डावात ४ बाद १४७ धावा उभारत २६० धावांची आघाडी घेतली होती. राठोडने अर्धशतक पूर्ण होते व तो ५९ धावांवर खेळत होता. तर वाडकर ३१ धावांवर नाबाद होता. आज राठडोने अर्धशतकाचे रूपांतर शतकात केले, वाडकरनेही आपले अर्धशतक पूर्ण केले. पण ८२ व्या षटकात ५२ धावांवर त्याला माघारी परतावे लागले.

## कबड्डी संघ ७१व्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत सहभागी होण्यासाठी कटक येथे रवाना

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** महाराष्ट्र कबड्डी संघ ७१व्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत सहभागी होण्यासाठी कटक, ओरिसा येथे रवाना झाला आहे. पुण्यातील बालेवाडी येथील श्री छत्रपती शिवाजी स्टेडियममध्ये सराव शिबिर पूर्ण केल्यानंतर, छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त बाणेर येथील महाराजांच्या स्मारकाचे दर्शन घेऊन संघाने आपल्या प्रवासाला सुरुवात केली.

राष्ट्रीय कबड्डी स्पर्धा २१ ते २३ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत ओडिशाच्या कटक येथील जे. एन. बंदिस्त क्रीडा संकुलात होणार आहे गतवर्षी अहमदनगर येथे झालेल्या ७०व्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्र संघाने कांस्यपदक मिळवले होते. यावर्षी संघात अनुभवी आणि तरुण खेळाडूंचा समावेश असून, सुवर्णपदकाचे लक्ष्य ठेवून संघ मैदानात उतरणार आहे. आकाश शिंदे यांच्याकडे कर्णधारपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. संघ व्यवस्थापक म्हणून सचिन शिंदे आणि मुख्य प्रशिक्षक म्हणून प्रताप शेट्टी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे सरकार्यवाह बाबुराव चांदेरे यांनी संघाला शुभेच्छा देताना सांगितले की, "निवड समितीने संघ निवड करताना उत्कृष्ट संघ निवडला असून सराव शिबिरात संघाने उत्कृष्ट तयारी केली आहे, संघ संतुलित असून आम्हाला विश्वास आहे की यंदा महाराष्ट्र संघ सुवर्णपदक मिळवेल."

### मुलींच्या गटात हरियाणाच्या आराधना तेहलन हिला दुहेरी मुकुट

## महाराष्ट्राच्या लक्ष्य त्रिपाठीला विजेतेपद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना (एमएसएलटीए) यांच्या वतीने आयोजित १९व्या रमेश देसाई मेमोरियल राष्ट्रीय १२ वर्षाखालील टेनिस स्पर्धेत मुलींच्या गटात हरियाणाच्या आराधना तेहलन हिने एकेरी व दुहेरी या दोन्ही गटात विजेतेपद पटकावत दुहेरी मुकुट संपादन केला. मुलांच्या गटात महाराष्ट्राच्या लक्ष्य त्रिपाठी याने विजेतेपद पटकावले.

जीए रानडे टेनिस कोर्ट या ठिकाणी पार पडलेल्या या स्पर्धेत एकेरीत अंतिम फेरीत मुलांच्या गटात चौथ्या मानांकित महाराष्ट्राच्या लक्ष्य त्रिपाठीने दिल्लीच्या तिसऱ्या मानांकित नयन खत्रीचा ६-1, ६-४ असा पराभव करून विजेतेपद पटकावले. १२ वर्षीय लक्ष्य हा बिर्ला ब्रेनीयास शाळेत सहावी इयत्तेत शिकत असून डेक्कन जिमखाना येथे प्रशिक्षक संदीप कीर्तने यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करतो.

मुलींच्या गटात अंतिम लढतीत अव्वल मानांकित हरियाणाच्या आराधना तेहलन हिने बाराव्या मानांकित महाराष्ट्राच्या त्रिशा भोसलेचा ६-२, ६-४ असा पराभव करून विजेतेपदाला गवसणी घातली. आराधना आरपीएस इंटरनॅशनल स्कुलमध्ये सातवी इयत्तेत शिकत आहे.

स्पर्धेतील विजेत्या व उपविजेत्या जोडीला करंडक, प्रशस्तिपत्रक अशी पारितोषिके देण्यात आली. स्पर्धेचे पारितोषिक वितरण एमएसएलटीएचे अध्यक्ष भरत ओझा, यस बँक लिमिटेडच्या इन्स्टिट्यूशनल बिझनेस, महाराष्ट्र व गोवा विभागाच्या मुख्य श्वेता गखर, यस बँक लिमिटेडच्या इन्स्टिट्यूशनल बिझनेस मुंबईच्या क्लस्टर हेड सीब्रता पाणीग्रही आणि यस बँक लिमिटेडच्या कुलाबा शाखेचे व्यवस्थापक अमित इंद्राळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी एमएसएलटीएचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज वैद्य, आयटीएफ सुपरवायझर वैशाली शेकटकर आदी मान्यवर उपस्थित होते.

#रा